3

साडरा समर्थ.

# कन्यापदपांसु

अथवा

वऱ्हाडांतील सुप्रसिद्ध सत्पुरुष

## श्रीगुलाबराव महाराज यांचें चरित्र.

सुहृत्प्राप्ति प्रकरण.

—ऽ*ऽ—

रज पांचवा.

तस्मात्सर्वप्रयत्नेन मत्प्रियां शरणं व्रजेत् ।
आश्रित्य मत्प्रियां रुद्र मां वशीकर्तुमर्हसि ॥
—पद्मपुराण—


प्रकाशक व प्रकाशनाचें ठिकाण.

नारायण रघुनाथ केकरे बी. ए. एल्. एल्. बी. हरदा सी. पी.

मुद्रक.

शंकर नरहर जोशी, चित्रशाळा छापखाना, सदाशिव पेठ, पुणें सिटी.

किंमत १ रुपाया.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# मनोगत.

काहीं अकल्पित कारणानें श्रीमहाराजांच्या चरित्राचें हें पांचवें प्रकरण आरंभींच छापून आज प्रसिद्ध करण्याचा योगायोग यावा ही अदृश्य दैवी शक्तीची एक विशेष घटना होय असें माझ्या भर्सभोळ्या समजुतीला वाटत आहे. कारण कीं घराचा उंबरठा जसा घरांतील व घराबाहेरील वस्तू दाखविणारा मध्यवर्ती असतो, तद्वत् महाराजांच्या नवप्रकरणात्मक विस्तृत चरित्राच्या पूर्वोत्तर खंडांचें स्वरूप दाखविणारें हें पांचवें सुद्धां प्रकरण मध्यवर्ती स्थल आहे. यापूर्वींचीं पहिलीं चार पूर्वखंडांचीं प्रकरणें छापायला घेतलीं आहेत व तीं लवकरच वाचकांच्या हातीं पडतील. उत्तर खंडाचीं पुढील चार प्रकरणें अजून लिहून व्हावयाचीं आहेत. तींही लवकरच तयार करून वाचकांस देण्याचा विचार आहे. तावत्कालपर्यंत दोन्ही खंडांतील एकंदर चरित्रविषयाचें धोरण या एकाच प्रकरणावरून समजून येणारें असल्यामुळें सांप्रदायिक व इतर सकळ सज्जनांच्या अवलोकनार्थ हें प्रकरण सादर करीत आहों.

श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ.

# विषयानुक्रम.

सुहृद्वर्णन.—सुहृत्प्राप्ति पृ०—४. महाराजांची शिक्षणपद्धति—६. गुरुलक्षण—९. भक्तिसुधेचें संतर्पण —१२. गुरुशिष्यसंबंध—१८. महाराजांची नित्यनैमित्तिक चर्या—२२. महाराजांची उत्सवमयचर्या.२९ मंडळीचा सत्वोत्कर्ष—४०. स्तुतिकुसुममालिका—४२. शिक्षणदशेचा आरंभ—५४. सत्वचतुष्टय—५९. धर्म म्हणजे गुरुशुश्रूषण— ६४. वृत्तिनिरीक्षण—७०. पूर्वोपलब्धपारहारदोषदर्शक पत्र—७६. श्रवणविधि—८५. श्रवणानंदानें समाधि—८७. अंधश्रद्धा व शास्त्रदृष्टि—८९. शिष्याची मानन्यदीनता—९२. शिष्याच्या मनाचें दमन करणें हीच खरी संतकृपा—९७. निरहंकार सेवा—१०३. शिष्याच्या अंतर्निष्ठेची कसोटी—१११. प्राचीन गुरुशिष्यपद्धति—११३. महाराजांची वृत्तिविद्या—१२०. सुहृत्प्राप्तिसिद्धि.—१२४. सुहृत्प्राप्तीचा उपाय—१२७. व्यवहारांत समतोलता व परमार्थात एकतानता—१२८.कामनेचें धार्मिक प्रेमांत रूपांतर—१३१.सुहृत्प्राप्तींत उत्पन्न होणारा अवगुण व तो टाळण्याचा उपाय—१३३. श्रीगुरूचे जन्मकर्म दिव्य असतात—१३५. महाराजांच्या उपदेशाचें धोरण—१३६. सुहृत्प्राप्तीचें मुख्य प्रयोजन—१४०. मंडळीचा स्वार्थत्याग—१४३. बाबाजी महाराज—१४८.

श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ

# सुहृत्प्राप्ति प्रकरण. रज ५ वा.

—•—

श्लोक.

अहेतुः पक्षपातो यस्तस्य नास्ति प्रतिक्रिया ।
स हि स्नेहात्मकस्तन्तुरन्तर्भूतानि सीव्यति ॥

उत्तररामचरित.

अभंग

लेंकराचें हित । वाहे माउलीचें चित्त ॥१॥
ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभेवीण प्रीति ॥२॥
पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे ॥३॥
तुका म्हणे माझें । तैसें तुम्हां संतां ओझें ॥४॥

सुहृद्वर्णन—" गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् " ह्या श्लोकाच्या गीताभाष्यांत ' सुहृत् ' म्हणजे ' प्रत्युपकारानपेक्ष उपकारी ' असा अर्थ भगवान् पूज्यपाद शंकराचार्यांनीं केलेला आहे व जो इतका निरपेक्ष दयाळु असेल तोच खरा सद्गुरु होय. ह्याविषयीं आचार्यांच्या प्रश्नोत्तरमालेंत पुढील वचन आहे:—

स्वामी कोण गुरु हें सांगा होईन संशयोन्मुक्त ।
शिष्या जो तत्त्वज्ञ प्राणिहिताकारणें सदोद्युक्त ॥

जो तत्त्वज्ञ असून जीवांच्या हिताविषयीं सदा तत्पर असेल तोच खरा सद्गुरु होय. हें सर्व श्रुतिसंतांच्या वचनावरून सिद्ध आहे.

श्रीमहाराजांची मूर्ति वरील वर्णनाप्रमाणेंच सर्व सुहृत्प्रेमाचें स्थान व जीवमात्रांचें हृदय होय. याविषयीं त्यांचें बालध्यान व पूर्ववर्णन यांचें पुन्हां एक वेळ आपण स्मरण केलें पाहिजे. तें वर्णन असें:—महाराजांचा बालवेष, त्यांचें प्रसन्न वदन, शुकाचार्यांप्रमाणें मस्तकावरील कुरळ जावळें, गोड स्वभाव, विद्याविभूषित वाणी, खेळकरपणा, संतोषवृत्ति, अद्वितीय बुद्धिमत्ता, मधुर सामगायन, विनय सौजन्यादि शीलसंपत्ति, उत्कृष्ट व्यवहारनैपुण्य, इत्याद्यनेक सद्गुणामुळें नूतन सहवासी मंडळीला ते सुहृद, अभिनव शब्दसौष्टव व वेदार्थसागरांतून समर्पक वाक्यरत्नें निवडून काढण्याच्या प्राविण्यामुळें आप्त व अलौकिक भगवत्प्रेमामुळें आपले उद्धारक सद्गुरु वाटूं लागले.

श्रीमहाराजांच्या या अंतर्बाह्य स्वरूपाचें यथार्थ वर्णन " मानस ओळखिजे बोलें " या न्यायानें त्यांच्याच शब्दांनीं सांगणें योग्य होईल. म्हणून तीं त्यांचीं प्रसादवचनें येथें उतरून घेतों:—

" जेथुनी बोधगंगेचे उमाळे । गोविंद नामाचिया कल्लोळें । उठती ते कोंवळें । वदनकमळ ॥ तया दोहीं ओंठाचिया तीरीं । दोहीं कपोलांचिया अनुकरी । कृपाकटाक्षें विलसणारी । पुतळिका दोन्ही ॥ मुमुक्षुक्षुधेचा आवांका । पाहूनि द्रवली करुणांबिका ।

ते मार्गे पुढें रक्षावया देखा । द्विधा जाहली दोहिं नयनीं ॥ आर्तांचे उद्धारभगीरथ । तया श्रोत्र दाविति पथ । तंव दोन्ही अंबिका समर्थ । धांवती रक्षावया ॥ पुत्र घेईल एकटी अंबिका । हाचि मत्सर धरूनि निका । ओष्ठतीरांमधुनि सुरेखा । बोधगंगा निघे ॥ एकें एका विसंबतां । क्षणी विलंब होईल आर्त निववितां । म्हणूनि नयनीं अंबिका मुखीं सिता । एकवटल्या सोहंशिवीं ॥ कधीं आर्तांचें वांकडें वचन । नाहींच ऐकिलें म्हणून । दोहींकडे दोन्ही कर्ण । सुंदर आपण शोभती ॥ कीं समोरील आर्तांसाठीं । कृपावंत आहे दृष्टि । परी आडिलिया आर्तांसाठीं । पाहिजे कोणी ॥ म्हणोनि दोहींकडे दोघेजण । विचारी श्रोत्र बैसले आपण । भूतदयेचें भूषण । लेवूनि आंगीं ॥ तया कर्णनेत्रांची मैत्री । साधावया मध्यतंत्रीं । भृकुटिया पुरश्री । दिसती दोन्ही ॥ कां कृपादृष्टि चहूंकडे जाईल । मग आर्त कैंवी हा निवेल । म्हणूनि प्रतिबंध होईल । तरीच बरें ॥ मग दोन्ही कृपाकिरण सुरेख । आणि आर्तांवरीच जातील देख । हा उपकार मनीं धरूनि सम्यक । गगन ऊर्ध्वाश्रय घेती भृकुटी ॥ आणि तिहींचें एककारण । म्हणूनि एकचि अधिष्ठान । हें सुरेख निवत शोभन । कंठकमल ॥ जेथुनि करुणागंगा निर्झर । हृदयांबुनिधि अतिगंभीर । त्रिवलीललित शोभे उदर । अत्यंत साचार रम्य जें ॥ विरक्ताहि या सुंदर वेशा । निर्भय आलिंगिती दिशा । शेखीं बाल्यभाव पाहतां सरिशा । वस्त्राचि होती ॥ तीं विकीर्ण पाहुनी जावळें । अप्सरांचेंहि चित्त सोंवळें । होऊनि मातृपणाचे

सोडले । जती तयां ।। जसा देवांमाजीं गोविंद । तैसाचि शुभवर्ण प्रसिद्ध । शामसुंदर भक्तमोद । करुणावृंद अवतरला ।। तें तारुण्य परी सौमनास न कळे । सदानंदभरी हास्य सोकळें । कीं हें विश्वपुण्याचें ओतलें । एकचि अंग । × × जियांचिया स्पर्शेंकरोनी । विस्मया पावली फणिशिरमणिनी । कीं जेव्हां-पासुनी मी कृष्णविरहिणी । हा स्पर्श तैंपासुनी अपरिचित ।। कीं माझीच पाहूनि ग्लानी । परतोनियां आले कैवल्यदानी । ऐसें अनुमानुनी मनीं । आपणा धरणी धन्य म्हणे ।' आंगीं वैराग्य-तेज लखलखीत । चरणस्पर्शें मी सकाम शांत । कीं तीव्रत्वा कंटाळूनि संज्ञाकांत । तळवे आरक्त जाहला ।। नखीं शशांककोरी सुढाळ । जेथें स्नेहें खेळती आर्तभाळकमळ । वरी अभय द्यावया स्नेहाळ । सुकुमार पाणी ।। × × अगाध संतांची भूत-दया । जीवें विनटती दीन कार्या । निर्माय असोनि दीनाची माया । आश्चर्य स्वलाह्या हें वाटे ।। बोधावया मुमुक्षु जन । वाट पाहती रात्रंदिन । आसन भोजन आणि शयन । दीनाकारणें त्यागिती ।। बाह्यजनीं ज्यांच्या दृष्टी । ब्रह्मावांचून नाहीं सृष्टी । तथापि दीनास्तव होती कष्टी । हेंचि आश्चर्य वाटतें ।। निजात्मा-नुभवें करून । झाले देहासहित नारायण । तथापि प्रेमें करोनि भजन । तारिती दीन नवल हें ।। अस्तु.

**सुहृत्प्राप्ति**—फार प्राचीन कालांत या विदर्भ नगरीला एक-वेळ श्रीकृष्ण चरणरजाचा लाभ मिळाला होता. तेवेळीं भगवती रुक्मिणी देवीला शिशुपालप्रभृति परजनांच्या व श्रीकृष्णविरोधी

बंधुवर्गादि कौटुंबिक जनांच्या तावडींतून सोडविण्याकरितां श्री-कृष्णाचें आगमन या नगरींत झालें होतें. तोच प्रसंग आतांहि या विदर्भ नगरीवर होता. येथील पौरजनांची सद्बुद्धि रुक्मिणी थिऑसफीप्रभृति नाना पाखंडमतीय परजनांच्या व अंतस्थ कामादि शत्रुजनांच्या तावडींत सांपडली होती. तिची सोडवणूक करण्याकरितां श्रीमहाराजांचें आगमन होतांच श्रीकृष्णचरण-स्पर्शाचाच प्रसाद पुन्हां आपणांस मिळत आहे म्हणून ही विदर्भभूमि प्रमुदित झाली. मग वासुदेवराव मुळेप्रभृति मंडळी महाराजांच्या दर्शनानें स्वतःस धन्य मानून आपले उद्धारक सद्गुरु भेटले म्हणून हर्षित व्हावे यांत नवल काय? महा-राजांचे चरणरज त्यांस सहज लागतांच त्यांच्या वासनेचें बीज जें विषयध्यान तें जळून गेलें, व त्या जागीं सद्वासनेचा अंकुर उगवला, रामनामीं आवडी उपजली, कुतर्कांचा नाश झाला, व त्यांचा पुण्याशय नियतविपाकी झाला. महाराजांच्या ब्रह्मकर्म-समाधीस्थितीनें त्यांच्या संपूर्ण दोषांचें क्षालन झालें. महा-राजांच्या अखंड श्रीकृष्णप्रेमप्रवाहांत मंडळीचेंहि चित्त कृष्णाकार बनलें व त्यांचा संसारताप विझून गेला व महाराजांच्या भक्तिभा-ग्यप्रभावांत मंडळीचें दैन्य नाहींसें झालें. याप्रमाणें पाप, ताप, दैन्य महाराजांच्या भेटीनें नाहींसें होऊन महाराजांनीं मंडळीला तत्काळ आपणासारखें केलें, काळ वेळ कांहीं पाहिला नाहीं. याप्रमाणें ही करुणावत्सल सद्गुरुमाउली भेटतांच तिच्या सहवासांत मंडळीचा भाग्योदय होऊन त्यांनें सुख घडोघडीं वाढूं लागलें.

भगवान् श्रीकृष्णांनीं वेदाचें कार्पण्य मोडून गीतारूपानें त्याचा सर्व जगास लाभ करून दिला. व " सुहृदः सर्वभूतानां " हें आपलें वचन पूर्ण केलें. तीच भगवद्गीता " ज्ञानेश्वरी " रूपानें प्रगट करून ज्ञानेश्वर महाराजांनीं प्राकृत आर्त जनांसाठीं त्रिवेणी संगमाचा तीर्थराज निर्माण केला व " भलतेणें येथ सद्भावें नहावें। प्रयागमाधव विश्वरूप पहावें। येतुलेनि संसारासी द्यावें। तिलोदक॥ असें आपलें विश्ववात्सल्य प्रगट केलें. तेंच वेदाचें, गीतेचें, व ज्ञानेश्वरीचें रहस्य महाराजांनीं मधुराद्वैत शास्त्ररूपानें प्रगट करून संपूर्ण जगाला आपल्या वात्सल्यप्रेमांत बद्ध केलें. व भगवत्प्रेमांत चित्तवृत्ति रंगवून सगळा संसारच ब्रह्मरूप करण्याची अलौकिक शिक्षणपद्धति रूढ करून औदार्याचा कळस केला.

**महाराजांची शिक्षणपद्धति**— या आपल्या शिक्षणपद्धतीची उपपत्ति व कवळ्याहि संकटावस्थेंत जीवाच्या धर्मबुद्धीची स्वतंत्रता महाराज येणें प्रमाणें वर्णन करितात:—

आहार निद्रा भय मैथुन । प्राणिजातां समसमान । मनुष्याचें विशेषण । हें अधिकरण शिक्षेचें ॥ मी मनुष्य असें आपण । उच्च पश्वादिकांहून। ऐसें ज्याचें अंतःकरण । तो अधिकारी शिक्षणा॥ जैसें डाफ्यांतील पाणी । न्यावया दुसऱ्या स्थानीं । एक बांध भरोनी । टाकणें पडे ॥

तैसें आंगीं असतांहि मनुष्यपण । पाशव देश त्याहूनि निम्न । म्हणोनियां बुद्धिजीवन । तिकडेच धांवे ॥ मध्यें वचनादिकांचा बांध

घालोनी । उलट वळवावें बुद्धिपाणी । याचि उपपत्ती उभारणी । शिक्षणाची ॥

अशी शिक्षणाची उपपत्ति सांगून नंतर कशाहि संकटाच्या परिस्थितींत मनुष्याला धर्मबुद्धि स्वतंत्र राहूं शकते असें सांगतातः—

आपत्काळीं अर्थकाम । मिळवाया अतिदुर्गम । शरीर असमर्थ परम । ह्मणोनियां ॥ अहिंसादि शुभकर्म । आणि तैसे भागवत धर्म । केलिया मानसहि उपक्रम । सिद्ध होती ॥ म्हणूनि अत्यंत संकटीं । पडालेयाहि शुभकर्मासाठीं । स्वतंत्रता गोमटी । आहे जीवा ॥ संपत्काळीं त्याहोनि स्वतंत्र । संपद्धनें करों शके पवित्र । यालागीं शिक्षणपात्र । मानुष्याभिमानी ॥

शिक्षणरत्नाकर.

संसारांत कर्मपरतंत्रतेमुळें बुद्धि संशयग्रस्त झाली असतां आत्मशक्ति जागृत करून दैवी पौरुषाची सुगम दिशा दाखवून देण्याला परमार्थशिक्षण केवढें उपकारी आहे याची महाराजांनीं एका पत्रांत सुंदर नवीन मीमांसा केलेली आहे, ती येणेंप्रमाणें:—

" वृत्ति जेव्हां सत्ताविषयिणी असते तेव्हां सामान्य चेतनस्थ अविद्येमुळें परतंत्र होते व प्रारब्धादि पारतंत्र्यसामग्रीला उत्पन्न करिते. जेव्हां ती चितिविषयिणी असते तेव्हां विशेष चैतन्यामुळें अविद्येच्या विक्षेपांशनाशानें स्वतंत्र होते आणि प्रयत्नादि स्वातंत्र्यसामग्रींनां उत्पन्न करिते. जेव्हां ती आनंदविषयिणी असते तेव्हां तिला दोहींचेंहि खरें फल मिळतें. आतां, प्रवृत्तिमार्गांत सत्ताविषय

बलवान झाल्यास चितिविषयाची मदत कशी घ्यावी हें समजून घेण्याचेंच नांव शिक्षण आहे. ”

अनधिकाऱ्यास अधिकारी बनविणें हें महाराजांच्या शिक्षण-पद्धतीचें कौशल्य आहे. संपूर्ण जीवमात्र अखंड सुखेच्छेमुळें मुमुक्षु आहेत ही तिची उपपत्ति आहे. सुहृत्प्राप्ति हें तिचें रहस्य आहे. गुरुशिष्यसंबंध हें साधन आहे. वेदान्तचिंतन ही मर्यादा आहे. धर्म, प्रेम व त्यांतील गुर्वाज्ञापूर्वक व्यवस्था हें आद्यसूत्र आहे. वत्सलसंमित उपदेश ही अपूर्वता आहे. व बल, कौशल्य, आणि शुद्धि हें त्रिविध गौण प्रयोजन असून पूर्ण सुखस्वातंत्र्य हें मुख्य प्रयोजन आहे. या द्विविध प्रयोजनांचें लक्षण थोडक्यांत असें सांगितलें आहे:—

बल म्हणजे प्राप्त भोगाचे आघात सहन करून शुभ कर्म करीत रहाणें. हें शारीरशिक्षणसाध्य आहे. कौशल्य म्हणजे शुभाशुभविकारांचा योग्य उपयोग करणें. हें नीतिशिक्षणसाध्य आहे.

शुद्धि म्हणजे असद्वासना निःशेष जाऊन नेहमीं सद्वासना स्फुरणें. हिला धर्मशिक्षणाची आवश्यकता आहे. व शेवटलें मुख्य प्रयोजन स्वातंत्र्य म्हणजे सर्वविकारविनिर्मुक्त होऊन सहज भगवत्प्रेमांत रंगून जाणें. हें वेदान्ताच्या व भक्तीच्या शिक्षणानें साध्य होतें.

या शिक्षणपद्धतीच्या योगानें मंडळीची सुधारणा करण्याकरितां व त्यांच्या साह्यानें आपला मधुराद्वैत संप्रदाय वाढविण्याकरितां महाराजांनीं कशी खटपट केली व मंडळीला आपल्या वात्सल्य प्रेमांत

वश करून कसें ऋणी करून ठेविलें हें या प्रकरणांत पहावयाचें आहे.

गुरुलक्षण—हा शिक्षणक्रम यशस्वी करण्याकरितां शिक्षकाच्या अंगांत कोणकोणत्या गोष्टी अवश्य असल्या पाहिजेत तें महाराज सांगतात:—

" पूर्ण परमार्थाचा अनुभव, संसाराचा अविरोध; आणि दुसऱ्याला सुधारण्याची इच्छा ह्या तीन गोष्टी जर एखाद्या व्यक्तींत सांपडतील तर ती व्यक्ति गुरुशिष्यभार आपल्या शिरावर घेण्याला समर्थ आहे असें माझें स्पष्ट मत आहे; आतां असाच गुरु असावा ही गोष्ट कोणत्याहि ग्रंथांत जरी निरूपण केली नाहीं तथापि कार्य-कारणसंबंधानें ( Nethod of Concomittant variation ) सार्वत्रिक लक्षण होण्याला अशी एक व्यक्तीच परीक्षा आहे.

आतां वर केलेलें गुरुलक्षण आपण न्यायाच्या पद्धतीनें कसें जुळतें हें पाहूं. पूर्ण परमार्थाच्या टोंकावरच गेलेला केवळ गुरु असला तर त्याजकडे कोणी आपण होऊन गेलेला मुमुक्षूच लाभ करून घेऊं शकेल. स्वतः संसाराशीं विरोध असल्यामुळें तो महात्मा सांसारिक जनांनां मुमुक्षु करण्याची खटपट करणार नाहीं. बरें, परमार्थस्थिति आणि संसाराशीं अविरोध हे दोन गुण कायम असून दुसऱ्याला सुधारण्याची इच्छा हा तिसरा गुण नसला तर तो जीवन्मुक्तिसुख भोगूं लागेल; परंतु औदार्याचें काम त्याचे हातून होणार नाहीं. तसेंच संसाराशीं विरोध असून बाकीचे दोन गुण जर असले तर तोहि यथाधिकार उपदेश करण्याला समर्थ होत नाहीं.

आणि पूर्ण परमार्थाचा अनुभव नसला तर कांहींच उपयोग नाहीं; म्हणून वर सांगितलेल्या तीन गोष्टी शिक्षकाच्या अंगांत अवश्य असल्या पाहिजेत. परंतु संसाराशीं अविरोध म्हणून जो सांगितला तो मात्र मृगजलउष्णता न्यायें सत्यमिथ्यासंबंधी परस्परस्वस्मिन्विषमसत्ताक असावा लागतो. परंतु अलीकडे ही गोष्ट गुरुवर्गांतून अगदीं वगळली गेली आहे. शिष्यवर्गाला सांगितलेली गुरुभक्ति केवळ शिष्याच्याच माथ्यावर दडपून स्वतःची जबाबदारी न ओळखतां, कांहीं पारमार्थिक महात्म्यावांचून, चैन करणारा गुरुवर्ग कमी आढळत नाहीं. शिष्यावर जशी शिष्यधर्माची जबाबदारी आहे, तशी गुरूवरही कांहीं जबाबदारी आहे हें तत्त्व न कळल्यामुळेंच पुष्कळ पंथांचा धर्मनाशक व भयंकर परिणाम होत आहे.

**अलौकिक व्याख्यानमाला** पृ० ४८।४९वर सांगितलेल्या तिन्ही गोष्टी महाराजांच्या ठिकाणीं पूर्णपणें होत्या याविषयीं त्यांचें चरित्रच प्रमाण आहे. " अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च " ह्या श्लोकांत वर्णिलेलीं परमार्थचिन्हें त्यांच्या अंगीं उपजतच होतीं. व " स्वभावो भजनं हरेः " हें तर महाराजांचें पूर्ण स्वरूपलक्षणच होतें. म्हणून परमार्थाचा पूर्ण अनुभव त्यांना होता. सर्वसंगपरित्याग करून तपोवनांत प्रस्थान न करितां संसारांतच राहून संसाराच्या अडचणींस त्यांनीं तोंड दिलें व आपलें उत्तम व्यवहारनैपुण्य दाखविलें, यावरून संसाराशीं त्यांचा अविरोध दिसून येतो. व कुटुंबांतील माणसांची स्थिति सुधारण्याचा यत्न केला, धर्मपत्नीचें

संगोपन केलें, तिला शिक्षण देऊन तिची बुद्धि सुसंस्कृत केली व पारमार्थिक शिष्य नात्यानें तिची मोहवृत्ति नाहींशी करून तिला ज्ञानोपदेश केला, आपले इष्टमित्र व स्वज्ञातिबांधव यांसहि सन्मार्ग दाखवून त्यांस सुधारण्याची खटपट केली; व त्यांत फारसें यश आलें नाहीं म्हणून न कंटाळतां दुप्पट उत्साहानें स्वपत्नीसह उमरावतीस जाऊन अनधिकाऱ्यांस अधिकारी बनवून त्यांची बुद्धि वाढविण्याचा उपक्रम केला व "लोकहानौ चिंता न कार्या" या सूत्रांचेंच अवलंबन करून एकट्यानेंच जीवन्मुक्तिसुख भोगणें हें गौण आहे, हें परोपकाराचें तत्त्व सिद्ध करण्याकरितां आपला पूर्वीचा योगाभ्यास, धौतिबस्तिआदि योगक्रिया, पयोष्णीतीरचे ते सिद्धेश्वर, सोमतीर्थादि रम्य एकांत प्रदेश व तेथलें आपलें समाधिसुख व भजन, काला वगैरेंचा आनंद, आपला यथारुचि स्वैर संचार व यादृच्छिक अशनशय-नादि प्रकार इ. गोष्टींकडे दुर्लक्ष्य केलें व "मुजे क्या काम दुनि-यासे । मेरा श्रीकृष्ण प्यारा है" ही आपली भागवतधर्माची टेक कायम ठेवून जगाचे आघात सहन केले, केवळ परोपकारैकपरायण होऊन गुरुशिष्यभार आपल्या अंगावर घेतला, व मधुराद्वैताचा उत्कर्ष केला; इत्यादि गोष्टींवरून महाराजांचे ठिकाणीं दुसऱ्यास सुधारण्याची इच्छा हा तिसराहि गुण पूर्ण रीतीनें व्यक्त होतो.

आतां, "संसाराशीं अविरोध म्हणून जो सांगितला तो मात्र परस्पर स्वस्मिन्विषमसत्ताक असावा लागतो" हें तत्वहि महारा-जांच्या ठिकाणीं परमार्थपूर्णतेस्तव ओघानेंच सिद्ध होत आहे. याविषयीं ज्ञानेश्वरींत पुढील ओंवी आढळते:—"ह्मणोनि ब्रह्म

तेंचि कर्म । ऐसें बोधा आलें जया सम । तया कर्तव्याचि नैष्कर्म्य । धनुर्धरा"॥ या ओवीचें विशेष स्पष्टीकरण महाराजांच्या मियलीला महोत्सवांत १९७ व्या पृष्ठावर आढळतें तें असें:—" दयावान् पुरुषाला सर्व त्याग सहजच साधतो. परक्यावर दया केली असतां ज्याप्रमाणें खरा त्याग होतो त्याप्रमाणें दुसऱ्या कोणत्याहि उपायानें होत नाहीं. कारण विषयांचें ग्रहण रागानें होत असून त्यांचा परित्याग द्वेषानें होतो. ते दोन्हीहि न व्हावेत म्हणून सर्वांवर निरपेक्ष प्रीति करणाऱ्या पुरुषालाच सर्व त्याग मिळतो व त्यामुळें विश्वांत असूनहि अलिप्त राहतां येतें. व दुसरेहि दयेनें आपल्यासारखे करितां येतात म्हणून कर्मवाद हा दयेला घातक नसून उलट साधक आहे. "

अशा निरपेक्ष दयावान् सद्गुरूचें महत्व सुंदरदास वर्णन करितात:—

प्रीति प्रचंड लगे परब्रह्महि, और सबे कछु लागत फीको । शुद्ध ह्रदै मन होई सुनिर्मल, द्वैतप्रभाव मिटे सब जीको । गोष्टिरु ज्ञान अनंत चलेजहं, सुंदर जैसो प्रवाह नदीको । ताहिते जानिकरो निशिवासर, साधुको संग सदा अति नीको ॥

**भक्तिसुधेचें संतर्पणः**—असो. याप्रमाणें हें सुहृत्प्रेमाचें तत्त्व पूर्णपणें महाराजांच्या अंगीं बाणलें होतें. म्हणून भक्तिसुधेचें दिव्यान्नसंतर्पण त्यांनीं सुरु केलें. या धर्मकार्याला महाराजांची साध्वी पत्नी सौ. मनकराणिका आई यांचेंहि पूर्ण सहाय होतेंच. या

श्रीमान् यजमानांनीं चालविलेलें हें द्विजसंतर्पणाचें [illegible] सुरू होतांच 'वासुदेव मुळे' या आधाशी बुभुक्षितानें ह्या उभय यजमानांस आपल्या घरींच प्रस्थान करवून इष्टमित्रपरिवारांसह आकंठ भोजनाचा सपाटा चालविला. या प्रमाणें भक्तिसुधेचें निधान यदृच्छेनें वासुदेवराव मुळ्यांच्या येथें चालत येऊन त्यांच्या भाग्याचा सुदीन उगवला. या भाग्याचें वर्णन महाराजांच्या अभंगवाणीनेंच येथें केलें पाहिजे. तो अभंग असा:—

तोचि पैं म्हणावा उदेला सुदीन। पावती लोचन प्रकाशाचे ॥१॥ गुरु गृहीं येतो सुखाचा संसार। बंधु कांता पुत्र दास होती ॥२॥ नाहीं ऐसें सुख चवथ्या आश्रमीं। व्यर्थ होणें श्रमी न पडे कीं ॥३॥ गुरु आम्हां घेती स्वयें कडेवरी। आम्ही खांद्यावरी घेऊं तया ॥ ४ ॥ निवटिला भेद झाले एकरूप। ज्ञानेश्वरदीप हृदयांत ॥५॥

गाथा. अभंग १४६

या अभंगांतील वर्णनाप्रमाणें वासुदेवराव मुळ्यांची गृहस्थिति पालटून तिला नवीन स्वरूप आलें. राजस तामस द्रव्यांच्या क्रयविक्रयाचें जें एक दुकान किंवा मायिक व्यवहाराच्या घडामोडीची जी एक बाजारपेठ होती तेथें आतां नंदगोकुळांतला आनंद व भक्तीच्या नंदन वनांतील नयनमनोहर देखावा दिसूं लागला.

या भक्त्योद्यानांत "समर्थांचे पंक्ति भोजनें। तळिंल्या वरिल्या एक पक्वान्नें॥" या ज्ञानेश्वरी वचनाप्रमाणें खासा स्वारीच्या पंक्तीनें भक्तिसुधेचें मिष्टान्नभोजन सर्वांस सारखें मिळूं लागलें. हरि-

भाऊ केवले, श्रीनिवासशास्त्री, वासुदेवराव मुळे, नाना कविमंडन, गणपत खंडो भालेराव, गोविंदराव राजुरकर, व्यंकटेश नारायण देशपांडे, ही मंडळी तर नित्यावळीचीच होऊन बसली. व महाराजांनीं चालविलेल्या उदार कार्यास जीवापाड झटून नानाप्रकारें साह्य करूं लागली. कोणी लेखक, कोणी वाचक, कोणी व्यवस्थापक, कोणी टाळधारी इ० कामें एकेकानें वाटून घेतलीं. गंगाधर मुळे, गोविंद रामचंद्र भक्त, मारोती जोशी ही मंडळी परिचार कर्माला तत्पर झाली. वेदमूर्ति गोविंदशास्त्री पंचभाई यांनीं पौरोहित्य पत्करलें, वासुदेवराव मुळ्यांची बहीण जीजीबाई हीही या मंडळीला हातभार लावूं लागली. सिरसगांवची ताई व सौ. रंगुबाईहि पुढें या मंडळीला साह्य करूं लागल्या. परंतु एवढ्यानेंच या सर्वांस तृप्ति वाटत नव्हती, तर आपले दूरचे आप्तेष्टादिकहि या सुखाचे विभागी झाले पाहिजेत अशी यांना हाव उत्पन्न झाली. ठीकच आहे. उदाराच्या संगतीनें औदार्य आलेंच पाहिजे. " हें उदारपण स्वभावें । तुमचा प्रसादु. " या मंडळींतील कोणी कोणी दूरदूरच्या आपल्या स्वकीय जनांस पत्रें लिहून त्यांस आपल्या भाग्योदयाची शुभवार्ता कळविली. श्रीनिवासशास्त्रींनीं बाळापुरडीस--आपल्या थोरल्या चिरंजीवास--पत्रद्वारें हें वर्तमान कळविलें. वासुदेवराव मुळ्यांचे सहाध्यायी विठ्ठलराव केकरे हे मंडल्यास वकील आहेत त्यांस ही वार्ता कळली. हरदा येथें वासुदेवरावाचे वडील बंधु वेद० बाळकृष्णशास्त्री मुळे रहात असतात; या सर्वत्रांस हें वर्तमान विदित होऊन वेळांत वेळ काढून ही मंडळी उमरावती येथें जमूं

लागली. व " सहजें ब्रह्मरसाचें परगुणें । केलें अर्जुनालागीं नारायणें । कीं तेचि अवसरीं पाहुणे । पातलों आम्ही ॥ " या प्रसंगाचें त्यांनीं स्मरण करून दिलें.

पुढें या मंडळीसहि महाराज आपापल्या घरीं यावेत असें वाटूं लागलें. व महाराजांच्या लेखकवाचक मंडळीसह त्यांस ते आपापल्या गांवीं बोलावूं लागले. अशा क्रमानें कारंजा, नागपूर, चांदा, मंडला, रायपूर, बिलासपूर, हरदा, छिंदगांव, इ० ठिकाणीं महाराजांचें आगमन होऊन तेथल्या तेथल्या मंडळीस महाराजांच्या पावन पवित्र भगवल्लीलांचा लाभ मिळूं लागला. छिंदगांवची केकरे-मंडळी, हरदा येथील मंडळी, विशेषतः गंपुनाना, नारायण केकरे हे बंधुद्वय व त्यांचे सहाध्यायी दिनकर गोखले, यांशिवाय नारायणराव लष्करवाले, वामनराव चारवेकर, बाळकृष्णशास्त्री मुळे व त्यांचे धाकटे बंधु आत्मारामपंत मुळे, खंडेराव मजलीवाले इ० मंडळी, नागपूर येथील श्रीनिवासशास्त्री, बापूगडी प्रभृति मंडळी व त्यांचे आप्त दत्तात्रेय खापरे, नारायणराव पंडित आदिकरून मंडळी वासुदेवराव मुळ्यांची सहाध्यायी व मित्रमंडळी विठ्ठलराव केकरे, रघुनाथराव भगाडे, बापुराव जोशी, बिलासपूरची त्रिंबकराव देहनकर, दामोदरराव भावे प्रभृति मंडळी, रायपूर येथील चिंतामणराव तांबे, त्यांचे चिरंजीव बाबुराव तांबे व मित्र केशवराव बक्षी, बाळकृष्णराव केकरे, राजीमवाले, कुसरे प्रभृति वकील मंडळी; ही सगळी मंडळी महाराजांच्या निरूपणादिकांस अत्यंत लुब्ध होऊन होईल तेवढी सवड काढून श्रवणसुखाचा लाभ घेऊं लागली.

उमरावतीच्या वासुदेवरावप्रभृति मुळच्या मंडळींवर तर महाराजांनीं सारखा बोधामृताचा पाऊस पाडला. भगवंताचीं सगुण चरित्रें गाऊन त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहविले व त्यांच्या सर्व शंकाकुशंकांचें निरसन करून सुसंस्कार त्यांच्या मनावर दृढ करून दिले. तो प्रकार उमरावती प्रकरणारंभीं आलाच आहे.

या पवित्र विचारांच्या शुद्ध गंगाप्रवाहांत मनोमल क्षालन होऊन मंडळीच्या मनाला जें समाधान वाटलें त्याविषयीं आपली स्वतःची मनःस्थिति रा. रा. वासुदेवराव मुळे आपल्या एका पत्रांत येणेंप्रमाणें वर्णन करितात:—

"महाराजांची भेट होण्यापूर्वी खऱ्या धर्मासंबंधानें माझ्या पुष्कळ वेडगळ समजुती होत्या. त्यांचा उल्लेख केला असतां कितीहि जरी कागद लिहिले तरी पुरणार नाहींत. ' उथळ पाण्याला खळखळ फार ' या न्यायानें कित्येक उल्लू सुधारकांचे विचार, विचार कशाचे अनर्गल प्रलाप, ऐकूं येतात तशाच प्रकारची माझ्या मनाची स्थिति होती. फरक एवढाच कीं या उल्लू सुधारकांना आपलेच अनर्गल प्रलाप खरे वाटतात व मला मात्र तसें वाटत नसे म्हणून मी लोकांत त्यांचा उच्चार करीत नसें. कारण खऱ्याखोट्याची निवड मी लोकांच्या म्हणण्यावर केली नसून ती आपल्या मनाच्या स्थितीवर केली होती. मनाची खळखळ, मनाची खळबळ ज्या विचारांनीं थोडीबहुत तरी नाहींशी होते तोच विचार व तीच शांति. माझ्या मनाला जसा मनुष्य मला भेटावा असें वाटत होतें तसाच मनुष्य मला भेटला. व तसा मनुष्य मला भेटेल

असा एक मनानें ग्रहहि केला होता. असा मनुष्य भेटला नसता तर माझी स्थिति आजच काय झाली असती हें मला सांगतां येत नाहीं. अमरावतीनें मला अमर केलें असें मी आपलें मन साक्ष ठेवून सांगतों. खरें किंवा खोटें याला दुसरी साक्ष श्रीज्ञानेश्वरांचीच होय. तिसऱ्याची नाहीं व तिसऱ्याची आवश्यकताहि नाहीं. पूर्व-पुण्याईनें म्हणा किंवा वाटेल तें नांव द्या, त्यायोगें मला असा मनुष्य भेटला; त्यानें आपल्याकडून जें सांगावयाचें होतें तें माझ्या मनांत शिरून सांगितलें. माझ्या मनाला त्यायोगें समाधान वाटलें, वाटत आहे, व पुढेंहि वाटेल अशी खात्री आहे. दुसऱ्याचें समाधान कसें करावें एवढी मात्र शक्ति नाहीं हें मी आपणाला प्रांजलपणें सांगतों. त्याप्रमाणेंच मनाला अगदीं निश्चल स्थिति प्राप्त झाली नाहीं हेंहि खरें. परंतु आज जी स्थिति प्राप्त झाली आहे ती देखील प्राप्त होण्याकरितां किती जन्म घ्यावे लागले असते याचा नेम नाहीं. किती काल गेला असता याचें कोणी काय सांगावें? अजून महाराजांना मला किती सांगावयाचें आहे याचाहि थांग करवत नाहीं. माझ्या मनाची तयारी व स्थिति कशी आहे हेंहि मला सांगवत नाहीं. ' यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते । ' अशी जरी स्थिति आज नाहीं तथापि ती होईल असें मनाला वाटतें. "

याच पत्रांत थिआसफीच्या विचारांची वेदांत विचारांशीं तुलना करून वासुदेवराव मुळे लिहितातः—"थिआसफिकल सोसायटीसारख्या समाजांत मोठमोठाल्या थिआसफिस्ट लोकांचे घृणास्पद, लज्जास्पद अश्लाघ्य विचार ऐकल्यानें कोणत्या सुशील,

सुशिक्षित मनुष्याला लाज वाटणार नाहीं ? व तिचा संबंध वेदान्त विचाराशीं जुळविणें म्हणजे महत्पाप होय असें मला वाटतें. प्रार्थनासमाज, आर्यसमाज, व ब्रह्मसमाज या सर्व समाजांची तरी शुद्धाद्वैताच्या पुढें काय मातब्बरी आहे ? आपल्या विषयसेवनाला आड न येणारा धर्म सर्वांत उत्तम अशा प्रकारें ह्या लोकांची समजूत. तेव्हां असे कित्येक समाज जरी निघाले तरी हे खऱ्या Philosopher पुढें कोठें टिकाव धरूं शकतील ? तेव्हांच यांचा फडशा उडणार. "

सारांश, " मनाचा मार न करितां । इंद्रियांसी कष्ट न देतां । येथ मोक्ष असे आयिता। श्रवणाचि माजीं॥" अशा प्रकारची 'मनोमार्गगति.' महाराजांच्या सहवासांत मंडळीला प्राप्त झाली. महाराजांचे नाना प्रकारचे खेळ, बाळलीला, हास्यविनोद हीं पाहून मंडळीला श्रीकृष्णाच्या बाळलीलांची आठवण होत असे व या नित्य नूतन आनंदाच्या भरांत जेवणखाण, झोंप, वस्त्रप्रावरण या आवश्यक गोष्टींचें देखील त्यांस महत्व वाटत नसे यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

**गुरुशिष्यसंबंधः**—असा हा महाराजांच्या भक्तिज्ञानगंगेचा पवित्र प्रवाह आपल्या अद्भुत गतीनें मंडळीच्या अशुद्ध विचाराच्या ओहोळास आपल्याबरोबर घेऊन शुद्ध करीत जात असतांना अनायासेंच त्यांतून गुरुशिष्यसंबंध कसा निष्पन्न झाला याविषयीं महाराज म्हणतातः—" कांहीं नवजिज्ञासु लोक माझ्या युक्तीला

भाळल्यासारखे होऊन मजजवळ येऊन राहूं लागले आणि माझा त्यांचा लोभहि चांगला जमला. असे जे साधारणतः रहाणारे लोक हेच माझे अनुयायी किंवा शिष्यमंडळी म्हणून लोकांत समजली गेली. यांतील कित्येक लोकांनीं मला मंत्र मागितला. पण मी शूद्र असल्यामुळें तंत्रांत ब्राह्मणाला शूद्रापासून मंत्र घेण्याचें काम पडल्यास ब्राह्मणाचे हातून पिंपळाचे पानावर मंत्र लिहून द्यावा हा जो विधि आहे तसा मी करूं लागलों. "

अशा रीतीनें सहजासहजीं सुहृत्प्रेमामुळें मंडळीला लाभलेला गुरुशिष्यसंबंध दृढ करून जन्मोजन्मीं अधुरा द्वैताचा प्रसार करण्याचा अधिकार त्यांस प्राप्त व्हावा म्हणून हळुहळू वैराग्य शिकविण्याची महाराज खटपट करूं लागले. तथापि त्यांत महाराजांची वागणूक पित्रपणाचीच होती. गुरुत्वाची अधिकारवृत्ति त्यांस केव्हांहि शिवली नाहीं. " कोणाला चांगलें वागतां यावें म्हणून भलतेच खेळ करणें, बालवृत्तीनें रहाणें, कधीं कोणास प्रेमानें मांडीवर घेणें व कधीं अतिशय जोरानें रागावणें, थिआसफिस्टांची सरसकट निंदा करणें, वस्तुतः वैराग्य शिकविणें, " अशा रीतीची महाराजांची वागणूक होती. उमरावतीप्रकरणाच्या आरंभीं वासुदेवराव मुळे, श्रीनिवास शास्त्रीप्रभृतीस महाराजांनीं पाठविलेल्या पत्रांचा उल्लेख आलेला आहे त्यांत महाराजांची ही वागणूक उत्तम रीतीनें दृष्टीस पडते. तात्पर्य, ' शिष्याची जो नेघे सेवा। मानी देवासारिखें ॥ त्याचा फळे उपदेश। येरां दोष उफराटे ॥ ' हा न्याय

महाराजांच्या वागणुकींत स्पष्ट दिसून येतो. अशा रीतीनें स्वतः कांहीं खटपट न करितां एखादा महात्मा जेव्हां आपल्यावर प्रसन्न होऊन मित्रपणानें सर्व ज्ञान करून देतो तेव्हां त्याला सुहृत्प्राप्ति म्हणतात. व अनन्यगतिक सद्गुरुसेवेच्या आवडीनें " देईल गुरु-सेवा । इया बुद्धि पांडवा । शतजन्मांचा सांडोवा । करिती जे ॥" असा दृढ निश्चय ज्याला बाणतो त्यालाच ही सुहृत्प्राप्ति निश्चयें-करून प्राप्त होत असते. असो. ही सुहृत्प्राप्ति तुम्हांस झालेली आहे असें महाराजांनीं श्रीनिवास शास्त्री, वासुदेवरावमुळेप्रभृति कांहीं मंडळीस सांगितलें, व त्यांच्या सुधारणेविषयीं खटपट करूं लागले. ही महाराजांची खटपट श्रुतिसंतांच्या परंपरागत शीलास अनुरूपच होती.

देहत्रयाच्या निद्रामंदिरांत निद्रासुख घेत असलेल्या जीवांना चवथ्या मंदिरांत जागवून भक्तिसदनाचा मार्ग श्रुतिसंत दाखवून देत असतात. ' जागर्यायै चिरसुप्तानां श्रुतिरंबावत् ' ' या निशा सर्व-भूतांना तस्यां जागर्ति संयमी ' 'काय सांगूं मी या संतांचे उपकार। मज निरंतर जागविती । ' ' गस्त आली जागा लोक हो ! सोडा संसारधंदा ' इत्यादि श्रुतिसंतवचनें याविषयीं प्रमाण आहेत. कृतत्रेतादि कालविभागाहि याच नियमानें झाले आहेत. याविषयीं "कलिः शयानो भवति संजीहानस्तु द्वापरः । उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् ।" ही ऋग्वेदांतली शतपथ श्रुति प्रमाण आहे. याव-रून एवढेंच घ्यावयाचें कीं, संपूर्ण ब्रह्मांडाविभवाचे संत हे चक्रवर्ती

असल्यामुळें ' राजा कालस्य कारणम् ' या महाभारतवचनाप्रमाणें ते नेहमीं कोणत्याहि युगांत धर्मसेतूचें रक्षण करण्याकरितां अवतार धरून सत्ययुगाची प्रवृत्ति करितात, व प्रजेचें संरक्षण करीत असतात. कलिकालास आरंभ होतांच समस्त ऋषिवृंदांनीं नैमिषारण्यांत ब्रम्हसत्र सुरू करून कालाची गति कुंठित केली होती व भगवत्कथा प्रभावानें कृतकाल प्रगट केला होता अशी पुराणांतरीं कथा आहे. परंतु नाथतुकारामादि संतमंडळांनीं कलीच्या ऐनभरांत संसारांत जन्म घेतला व ' निवृत्तरागस्य गृहं तपोवनम् ' या वचनाप्रमाणें भगवद्भजनांत चित्त रंगलें असतां रागादि विकारहि भगवत्पर होऊन दोषनिधि असा हा संसारच नैमिषारण्य कसा बनत असतो ही भक्तीची अद्भुत किमया लोकांस शिकविली. ' अवघाचि संसार केला ब्रम्हरूप । विठ्ठल स्वरूप म्हणोनियां ॥ ' हा तुकाराममहाराजांचा अनुभव सर्वत्र प्रसिद्धच आहे.

महाराज तर आधींच ' पुनाति भुवनत्रयम् ' या अधिकारांतले. मग त्यांच्या श्रीकृष्णैकचर्येंत ' गोकुळींच्या सुखा । अंतपार नाहीं लेखा ॥ बाळकृष्ण नंदाघरीं । आनंदल्या नरनारी ॥ ' असा आनंद नांदूं लागून ' अगा मी एक लाणीचें खागें । मज येवों ये भलतेनि मार्गें । भक्ति कां विषयविरागें । अथवा वैरें ॥ ' ही शिकवण मनास लागावी व जीं इंद्रियें स्वाधीन ठेवतां ठेवतां योगिजनांच्या नाकीं नव येतात त्याच इंद्रियांस सहज महाराजांच्या सेवेचा लळा लागून संपूर्ण विषय भगवदर्पण करण्याचें

नैष्कर्म्यतत्व त्यांच्या सहज बोलानें मनावर ठसावें यांत काय मोठेंसें नवल आहे? एकनाथमहाराज म्हणतातः— 'संतांच्या सहज गोठी । त्याचि उपदेशाच्या कोटी । देहात्मता जीव गांठी । बोलासाठीं छेदिती ॥ '

ह्या महाराजांच्या सहज गोष्टी म्हणजे अर्थातच मंडळीचें मनरंजन करीत, हांसतखेळत, मनावर शिक्षणक्रमाचें दडपण पडूं न देतां, नाना बिकट साधनांचे सायास न करितां, सहज पचनीं पडेल असा, व इंद्रियांचें विषयचिंतन सुटून तीं सेवेंत लुब्ध होतील व शास्त्रचिंतन करण्याला मनाला मोकळिक करून देतील अशा प्रकारचा वत्सलसंवित उपदेश होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे 'योगेंवीण दाविती कैवल्य डोळां' या न्यायानें सहज मनाचा लय भगवत्प्रेमांत लागून जावा अशी महाराजांची नित्यनैमित्तिक चर्या बनली होती.

**महाराजांची नित्यनैमित्तिक चर्या**—महाराजांची वेणीफणी व शौचमुखमार्जन; त्यांची मृज्जलादिकांनीं गात्रशुद्धि व शौचाचारनिषेवण; महाराजांचा स्नानविधि व त्यांचें आसनवसन; श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांचें व श्रीकृष्णमूर्तीचें षोडशोपचारपूजन व तीर्थग्रहण; महाराजांनें पार्थिवलिंगार्चन, शिवपूजन व उच्च मधुर स्वरानें अपराधक्षमापन स्तोत्राचें पठण; पंचायतनदेवता, संप्रदायदेवता, प्रसिद्ध संतमंडळादि सर्वांसह मुख्य देवतांस नैवेद्यसमर्पण, व नंतर महाराजांचें भोजन; भोजनोत्तर देवतांस तांबूलसमर्पण,

तांबूलग्रहण व अन्नपाचनार्थ अगस्तिकुंभकर्णादिकांचें स्मरण; महाराजांची शतपावली व वामकुक्षीवर शयन; चक्कर, भोंवरा, कोयाळादि महाराजांच्या बालक्रीडा व फुगड्यापिंगा वगैरे विहरण; महाराजांचें लेखन, वाचन, पत्रव्यवहार व कथाकहाण्या वगैरे मनोरंजन; महाराजांचें भजन, कीर्तन, ग्रंथनिरूपण, त्यांचे वादसंवाद आणि समस्यापूरण; महाराजांचें कथापुराणश्रवण, देवदर्शन व ग्रंथपरिशीलन; महाराजांचा स्वेच्छानुसारी प्रवास व त्यांचें ग्रंथसंशोधन, ग्रंथसंपादन व ग्रंथसंरक्षण; महाराजांचें आळंदीवृंदावनप्रमुख तीर्थयात्रागमन, गुणी जनांपासून गुणग्रहण व प्रेमळ संतसज्जनांचा प्रेमसंपादन; महाराजांचें अनाथसंगोपन, दीनसमुद्धरण व गोविप्रप्रतिपालन; महाराजांचें गुरुशुश्रूषण व संतपूजन; गुरुवारीं पालखीचा उत्सव, द्वादशीचा काला व शिवकृष्णलीलादि गायनपूर्वक संप्रदायनियमांचें परिपालन; महाराजांचें मंगलस्नान व कुंकुमतिलकादि सौभाग्यचिन्हांचें धारण; वटसावित्री, मंगळागौरी, हरतालिका, रथसप्तम्यादि श्रीकृष्णपत्नित्वाला उचित अशीं स्त्रियांचीं व्रतें, व सोमवार, शिवरात्र, एकादश्यादि उपोषणें; विजयादशमीस पालखीची मिरवणूक, शमीपूजन व परत आल्यानंतर जळकुंभ घेऊन द्वारावर उभ्या राहिलेल्या सुवासिनी बायांस मंगलाशीर्वचन; व नंतर नवीन ग्रंथलेखन, ग्रंथअध्ययनाध्यापनादि कार्यारंभ; दिपवाळीचा श्रीकृष्णासह मंगलस्नानाचा समारंभ व गाणीं वगैरे; तिळसंक्रांतीचा तीळगुळ व परस्पर पतिपत्नींचे नामग्रहणादि प्रकार; महाराजांचा सपत्निक स्त्रीगीतांचीं गाणीं व श्रीतक्रीडापटाचा शास्त्रपद्धतीचा खेळ; इत्यादि

महाराजांची नित्यचर्या व अहोरात्र भगवद्गुणवर्णनाचा छंद; महाराजांचें वेदान्तनिरूपण व प्रेमपुलकयुक्त हरिनामाचा गजर; हा सगळा प्रकार मोठा चित्ताकर्षक व बोधप्रद होता. त्याच्या योगानें मनास महाराजांच्या सेवेचा लळा लागून भगवत्प्रेमकलेचें शिक्षण सहज कसें मिळत असे हें ज्याचें त्यालाच विचारलें पाहिजे.

प्रसंगविशेषीं प्रापंचिक जनांच्या विनंतीवरून त्यांच्या येथें महाराजांचें आगमन झालें असतां तेथली प्रपंचरचना तात्पुरती लुप्त होऊन महाराजांच्या सान्निध्यांत तेथें पुण्य क्षेत्राचा महिमा प्रगट होत असे.

उदाहरणार्थ, ज्या ठिकाणीं नेहमीं कचेरीची घाई, साहेबाचें बोलावणें, सावकाराचा तगादा, पाहुण्यांचें आदरातिथ्य, सोयऱ्याधायऱ्यांचे स्वागतसत्कार, सणावाराचे दिवस, स्त्रियांचे वस्त्रालंकार, मुलामुलींचें कोड पुरविणें, इष्टमित्रांचें चहापान व उपहारफराळ, नाटकें, सिनेमे व सर्कशीचे खेळ, लग्नामुंजीचे अहेर, जावायाचा रुसवाफुगवा, विहिणीव्याह्यांची मनधरणी, शेजाऱ्यापाजाऱ्यांचें तंटाभांडण, चोरासोरांची वर्दळ, ढेंकूण-पिसा-चिलटांचा त्रास, इत्यादि गोष्टी माणसाचें व्यर्थ आयुष्य हरण करून त्याला काळाच्या जबड्यांत लोटीत असावयाच्या; त्या ठिकाणीं गोवर्धनोत्सवाची घाई, महाराजांचें बोलावणें, पुराणनिरूपणांचा तगादा, शास्त्रीपंडितांचें आदरातिथ्य, संतसज्जनांचें स्वागत-सत्कार, भजनपूजनाचे दिवस, श्रीकृष्णाचे वस्त्रालंकार, विवेकवैराग्याचें कोड पुरविणें

व्रतोपवास करणारांचें दुग्धपान व निरशनफराळ, श्रौतक्रीडाविशेषादि खेळ, अहंकाराचा रुसवाफुगवा, दयाक्षमाशांति यांची मनधरणी, मानदंभादिकांचें तंटाभांडण, वृत्तिनिरीक्षणप्रसंगीं दुर्जय इंद्रियांची वर्दळ, खलदुर्जनपिशुनांचा त्रास इत्यादि सत्वशुद्धीचे चमत्कार दृष्टीस पडत; व कीर्तनाच्या जागेची तयारी करा, देवाचें मखर फुलांनीं गुंफा, पुष्पांचे हार व तुळसी घेऊन चला, दहीं-दुधाचीं भांडीं सांभाळा, उद्यां रंगपंचमी आहे, देवावर रंगप्रक्षेप करीत महाराज होरी वगैरे म्हणत आहेत, हरिभाऊ वगैरे मंडळी ती लिहून घेत आहेत, पुढें वसंतोत्सवाचा प्रसंग आहे, गोपींचा व श्रीकृष्णाचा रंगप्रक्षेपप्रसंग वर्णन होऊं लागला आहे. 'गोविंद राधे गोविंद' या भजनगजरांत काल्याचे कवळ मंडळीला महाराज देत आहेत, तो प्रसंग आटपून मंडळी झोंप घेण्याला पडतात तोंच योगवासिष्ठाचें, ज्ञानेश्वरीचें, किंवा भागवताचें निरूपण सुरू झालें म्हणून भराभर मंडळी डोळे चोळीत ऐकण्याला चालली आहे; अशा रीतीनें रात्र सरून पहाट होत आहे तोंच एकीकडे महाराजांच्या पार्थिवपूजेची गडबड चालली आहे, व दुसरीकडे महाराजांचें स्नान चालू असतांना कोणी रामपक्षीय व कोणी कृष्णपक्षीय बनून महाराजांसह विनोदकलह चालला आहे. कधीं गुरुवारची पालखी शुक्रवारच्या पहाटे पंचपंच उषःकालीं निघाली आहे, सर्व जीवांस मंगलकारक असा प्रभातवायु सुटला आहे, ज्ञानराजमाउलीचा गजर, मनोवृत्तीस चटकन ओढून घेणाऱ्या नवीन अभंगांची बहार, उदबत्त्यांचा घमघमाट, पुष्पहारांचा सुगंध,

दीपातींच्या प्रज्वलित ज्योति, प्रभातकालची प्रशांत सात्विक वेळ, श्रोतृवृंदाच्या प्रसन्न मनोवृत्ति, इ० भगवन्मय पुण्यचर्या व महाराजांचा हरिभजनप्रभाव मनास लुब्ध करीत असे.

एके वर्षी ( शके १८३३ ) दिवाळीस महाराजांचा मुक्काम माधान येथें त्यांच्या शिवमंदिरांत होता. तेव्हांचें मंगलस्नानप्रसंगाचें वर्णन पहा:— या वर्षी नरकचतुर्दशी शनिवारीं आली. पूर्वदिवशीं शिवरात्र होती. ते दिवशींची पार्थिवपूजा शनिवारीं पहाटे ४ वाजायला ७ मिनिटें कमी असतांना झाली. पूजा झाल्यानंतर महाराज शंकराच्या पूजेस गेले. तेथें शिवपूजन झाल्यावर नरकचतुर्दशीचें मंगलस्नान करण्याचें ठरलें. श्रीज्ञानेश्वरमहाराज, श्रीकृष्ण व शंकर यांना पुरुषसूक्ताच्या अभिषेकाची वरणी ब्राह्मणास ( त्रिपुरवारास ) दिली. ब्राह्मण व सुवासिन यांस भोजनार्थ आमंत्रण दिलें. ब्राह्मण मंडळीचीं व इतर मंडळींचीं स्नानें झालीं. पुढें महाराजांचा मंगलस्नानाचा समारंभ सुरू झाला. श्रीकृष्णमूर्तिसह महाराज झोंपाळ्यावर बसले. अक्षवान झाल्यावर मंगलकारक सुवासिनी बाया तैलाभ्यंग करूं लागल्या. वाजंत्री सुरू झाले. बंदुकांचे आवाज होऊं लागले. सखाराम आपांनीं भजनी मंडळी आणून भजनाची तयारी केली. त्र्यंबकरावांनीं वाजाची पटी लावली. तैलाभ्यंग झाल्यावर उटणें लावण्यास आरंभ झाला. श्रीकृष्णास मंत्रोक्त अभिषेक होऊं लागला. कांहीं सुवासिनी झोंपाळ्याचे दांड धरून उभ्या राहिल्या. प्रथम त्र्यंबक-

रावांनीं गाणीं म्हटल्यावर महाराजांचीं तात्कालिक नवीन गाणीं सुरू झालीं. सौ. दुर्गाआई, विशाखाआई स्वयंपाकाची घाई करूं लागल्या. पंडित पुरण वांटून देत होते. इकडे कृष्णराव मास्तर व दत्तुमामा गरम पाणी व गार पाणी देण्याच्या धांदलींत होते. ड्राइंग मास्तर व सिताराम मास्तर गाणीं लिहून घेत होते. मधून मधून महाराजांचा देवाशीं विनोदाचा प्रकार चालला होता. मध्यंतरीं महाराजांनीं रुद्राध्यायांतील "अग्निश्चमे घर्मश्चमे" व "गर्भाश्चमे वत्साश्चमे" हे चमकाचे ९–१० दोन अनुवाक म्हटले. स्नान संपण्याच्या सुमारास पांच सुवासिनी बायांनीं अक्षवाण करून एकीनें पांच वेळ पाणी ओंवाळलें. नंतर फुलांनीं देवाची दृष्टि काढली, व नूतन वस्त्रपुष्पें वाहून पूजन झाल्यावर स्वासीन ब्राह्मणासह महाराजांचें भोजन झालें. याप्रसंगीं महाराजांनीं म्हटलेलीं मंगलस्नानाचे वेळचीं गाणीं पुढें दिलीं आहेत:—

**गाणीं**—आजची उदयला आनंदाचा दिवस। घेऊनी बरोबरी क्रीडती श्रीनिवास॥ चाल सखू चालग। कृष्णाच्या बागामध्यें खेळूं गुलाल॥ योगीया कळेना करूनि प्राणायाम। तें ब्रह्म हातातळींग वाई। आमुच्या घनःश्याम॥ अमृताहुनी गोड बाई वाटते हरिनाम। मोक्षही आवडेना चित्तीं तो कृष्णकाम॥ मोहनगिरीधारी०

**यशोदावचनः**—धांगडी तुम्ही बाळा, बाळ माझा हा सकुमार। निगम ब्रह्मतनू यासी खेळवूं नका फार॥ मोहनगिरीधारी०॥

घेऊनी कृष्णनाम न जाय देहभाव। कर्म तें तरी मिथ्याग बाई। ज्ञानहि झालें वाव॥ तुमचें पोर बाई छळीत आम्हां सदाग। लाभलें आज हातीं प्रेमें बांधूं याचे पदाग॥ मोहन०॥ आणिक लेंकराला आवडे बहु थट्टाग। माझीया बाळालागीं शब्दाचा नाहीं वट्टाग॥ शब्दाच्या लक्षणेला तुमचा भेटे बाळ।

म्हणुनी गोपी आम्ही वाहतों कंठीं माळ ।। सच्चिदानंद तेहीं राहिले अलीकडे । तो बाळ बाई माझा तुम्हां कसा सांपडे ।। (किंवा) तुम्हास का सांपडे।। सच्चिदानंद शब्द वाच्यांश अलीकडे । लक्ष्यांश अन्वयानें सगुण ठायीं पडे ।। माझीया बाळासाठीं तपस्वी होती पिसे । तो बाई घडी घडी तुमच्या द्वारीं दिसे ।। योगीयां अभिमान स्वलिंग शरीराचा । भक्ताच्या चित्तीं बाई सेव्य ( किंवा सख्य ) भाव साचाग ।।

उपाय कोणी सांगा ठाऊक जरी तुम्हा ग । अखंड सर्व भावें बाई भेटावया मेघःश्यामग ।। चारहि पुरुषार्थ आधीं सांडावे ओवाळुनी ग : सुंदर श्यामतनु बाई सगुण ध्यानींमनीं ग।। बाई नयन प्रेमजळें अभिषेकावे कृष्णपाय ग । सगुण गुण गातां विसरावे ते चारी काय ग।। स्थावर पाषाणाच्या योनींत घेऊं जन्म ग। परंतु मागूं सदा बाई गोविंदपायीं प्रेम ग।।तुमचा मौन बाळ बाई बोलवया आम्ही नारी ग। प्रणव लक्ष्यार्थानें बाई प्रगटू हृदयकमळीं ग ।। निर्गुण जाणावया बाई ब्राम्हण श्रुतीवाणी ग । सगुण सुखासाठीं त्याचि पावल्या गोपीजन्म ग ।। सांगुनि कर्मकांड चित्त आधवें शुद्ध केलें ग । ज्ञानाच्या वचनानें जीव निर्गुणीं मिळविले ग ।। अन्वय भक्तिबळें तोडाया सर्व भेद । गोपिकारूपें बाई नारी झाल्या श्रुती-चारी ग ।। (पाठांतर) नारीमयचि झालें मन ग ।।

निर्गुण ज्ञानीयाचे समाधींत सांपडे ग । सगुण प्रेमळाचे बाई नाचत मागें-पुढें ग ।। मोहन० ।। श्रीकृष्णाबरोबरी खेळतां दिव्य झोले ग । मन हें ब्रम्हानंदें (किंवा)हृदय ब्रह्मानंदीं व्युत्थानकाळीं डोले ग। ईशान ईशान तत्पुरुष अघोर वामदेव ग । सखु गडणी । प्रार्थीने प्रार्थीते सद्योजाताकांत मिळावा वासुदेवग ।। सखुगडणी ।।

नमस्ते नमस्ते भगवते नमस्ते कपर्दिने ग। सखु०। हा एक हा एक वर द्यावा जपाया कृष्ण भजें ग ।। प्राण अपान व्यान अंतःकरणादिक ग । सखु०। माझें जें माझें जें सर्व कांहीं यज्ञ हा सर्व एक ग ।। मोकळया हृदयानें गोविंद आलिंगनीं । मिळतां प्रेमभावें आत्मैक्य सहजानी ।। गंगाजमना० ।। सोहळा चहूंकडे गोविंद वाणी गातां । आमुची प्रेमबळें देवाहीवरी सत्ता ।। गंगाजमना० ।। विषय विषय नाशीवंत होतांहि सत्यसंगग । सखु० ।। श्रीकृष्ण श्रीकृष्ण भजनानें नेती मोक्षास खोटें सोंग ग ।। सखु० ।।

म्हणुनी आम्हां कोणी पूजो अथवा ठेवो नांव ग । सखु०। आमुचा आमुचा अंतर्बाह्य गोविंद चरणीं भाव ग ॥ सखु० ॥

सद्गुरु सद्गुरु ज्ञानेश्वर तीर्थानें जाहलें न्हाण ग ॥ सखु० । कृष्णची कृष्णची देह झाले गेले थोर लहान ग ॥ सखु० ॥ अस्तु.

**महाराजांची उत्सवमय चर्या—** महाराजांची उत्सवमय चर्या तर खरोखरच अनुपम उत्साहजनक व भक्तिरसपरिपोषक होती. श्रीमहाराजांची तनु म्हणजे केवळ चालतीबोलती प्रयागतीर्थराज. ' जेथें पडे रजधुळी । तेथें करावी आंघोळी । ' असा त्यांचा चरणरजमहिमा. 'आगमोऽपः प्रजादेशः कालः कर्म च जन्म च । ध्यानं मंत्रोऽथ संस्कारो दशैते गुणहेतवः ॥ ' हीं श्रीमद्भागवतोक्त दशविध सत्वशुद्धीचीं साधनें ज्यांच्या सान्निध्यांत सदा हजर. ' जगीं तीव्र व्हाया मानसींचा भाव । करावे उत्सव वारंवार । ' अशा हेतूनें जेथें उत्सवांची योजना होत असते; " गडेहो ! आपण सर्व गोपी आहोंत अशी भावना करा, व श्रीमद्भागवतांतील कथेंत वर्णन केल्याप्रमाणें गोपकुमारींनीं कात्यायनि व्रत करून श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचा अधिकार मिळविला तसा आपणहि मिळवूं या. " या आश्वासनाची परिपूर्ति करण्याचें जेथें पूर्ण सामर्थ्य आहे अशा महाराजांच्या नानाविध उत्सवप्रसंगांचें कोठवर वर्णन करावें ?

हेमंत ऋतूचा समय, ' मासानां मार्गशीर्षोऽहं ' असा पुण्यपावन मार्गशीर्ष महिना, पयोष्णीचें सुंदर वाळवंट, आसमंतात अर्धचंद्राकार गतीनें वाहत असलेला जलप्रवाह, आकाशांत तारका

चमकत आहेत अशी मोठ्या पहाटेची वेळ, थंडी मी म्हणत आहे, वाळवंटांत शकोट्या पेट० हातांत कंदील घेऊन कात्यायनि अर्चनाचें साहित्य मांडून ठेवण्याकरितां मंडळीची धांवपळ सुरू आहे, इतक्यांत महाराजांचें स्नान होऊन गोपीवेशानें कात्यायनिपूजनास सुरुवात झाली आहे; सौ. रंगुबाई, मनकरणिकाआईप्रभृति स्त्रिया व मारोती, गंगाधर, हरिभाऊ, नानाप्रभृति परिचारक मंडळी पूजासाहित्य देण्यांत व स्तुतिस्तोत्र कथादि वाचण्यांत गढून गेलेली आहे. वेद. गोविंद शास्त्री पूजासंकल्पादि मंत्र सांगत आहेत; आरती, मंत्रपुष्प वगैरे होऊन तुळसी देवीस व सुवासिनी बायांस हळदकुंकु देणें, ब्राह्मण मंडळीस भूयसी दक्षिणा देणें वगैरे गोष्टींची गडबड चालली आहे; पूजन आटपल्यावर भागवत ज्ञानेश्वरीचें श्रवण होऊन नंतर वाचन लेखन ग्रंथनिरूपणादि नित्य कार्यक्रमास आरंभ होत आहे; कधीं वाळवंटांत उन्हाची तिरीप घेत निरशनाचा फराळ, कधीं वेणीफणी, कधीं ज्ञानेश्वरीचें निरूपण, कधीं शास्त्रचर्चा व मंडळीचें शंकासमाधान, कधीं स्त्रीगीतांचीं गाणीं तर कधीं तुंबडी, कधीं अलौकिक व्याख्यानमाला तर कधीं वैसर्ष्टाचें, कधीं सांख्य कारिकाचें तर कधीं योगसूत्रांचें निरूपण चाललें आहे; इकडे ब्राह्मण मंडळीच्या जेवणाखाणाची, त्यांच्या द्रोणपत्रावळीची, नतास येणाऱ्या मंडळीच्या उतरण्यासवरण्याची, सामान सुमान ठेवण्याची, फराळजेवणाची वगैरे व्यवस्था करणें, भाजीपाला दूधदहीं, तूप लोणी वगैरे सामान आणणें, रोगी तापकरी वगैरे मंडळीला औषधी उपचार करणें, तिकडे महाराजांच्या पुस्तकपार्सलांची, पत्रादि-

कांची वगैरे व्यवस्था पाहणें, इ० कार्यव्यवस्थेंत नानाजी कविमंडन गुंतून गेले आहेत; हरिभाऊ, व्यंकटराव प्रभृति लेखक वाचक मंडळी महाराजांचीं निरूपणें, आख्यानें व्याख्यानें व अभंगपदादि संग्रह लिहून घेऊन पुन्हां तीं नीट अक्षरांनीं लिहून ठेवीत आहेत. महाराजांची वेणीफणी, निरशनाचा फराळ वगैरे तयार करणें, मंडळीचें जेवणखाण, रोग्यांचें पथ्यपाणी व औषधकाढा इत्यादि गोष्टींत बायामंडळी गढलेली आहे; घांत्रेंपात्रें धुणें, पाणी आणणें, पहाटेचें गंधपुष्पादि पूजासाहित्य जुळवून ठेवणें, इ० कामांत गंगाधर, पंडित, मारोती ही मंडळी चूर झालेली आहे; तिकडे रात्रींचे बारा वाजल्यापासून किती वाजले किती वाजले म्हणून महाराज मधून मधून विचारीत आहेत; अशा रीतीनें सर्वांच्या चित्तवृत्ती उत्सवमय होत असत. व्रतसमाप्तीचा दिवस जवळ जवळ येत चालला म्हणजे तर ही उत्सवाची रमणीय कला 'उत्सवादुत्सवं यांति' या न्यायानें दिवसें दिवस विकास पावत असे.

काहं पापा क देवस्तदपि बत मतिस्तंपतिं नाथतेऽत:
कात्यायन्यार्चितालंदिपपितृचरणौहृत्सरोजे निधाय ।
अत्रागत्यास्मवंतो यदुपतितनवो दीनकारुण्यपुण्या:
गोपीपः प्राणनाथोस्तुतइति वचनैरशम्ममासादयंतु ॥ १ ॥

ह्या सुनम्र सुवर्ण श्लोकानें सुशोभित झालेल्या निमंत्रणपत्रिका सांप्रदायिक व परिचित मंडळीकडे रवाना होऊन मंडळी जमूं लागली म्हणजे सुंदर शृंगारलेल्या देवगृहापुढें ब्रह्मसत्रास आरंभ होत असे.

ब्रह्मसत्र म्हणजे सारख्या विद्येचे, सारख्या अधिकाराचे, व सारख्या शीलाचे पुरुष एकत्र जमून परस्परांविषयीं कमी अधिक बुद्धि न धरतां निरहंकारवृत्तीनें भगवच्चिंतन कथन व अन्योन्य प्रबोधन करून तत्वचिंतन करणारी सभा. या सभेंत वैदिक ब्राम्हणांचा वेदघोष प्रथम होऊन नंतर मंडळीचीं पुराणें, प्रवचनें, व्याख्यानें वगैरे होत असत. अध्यक्षस्थानीं महाराज राहून कांहीं वक्त्यांस विषय वगैरे नेमून देत असत.

समाप्तीचे दिवशीं कात्यायनीचे वाळवंटांत प्रवाहासमीप मोठा भव्य मंडप उभारला आहे, मंडळी सुस्नात होऊन मंडपांत वावरत आहेत, अध्वर्युस्थानीं गोविंदशास्त्री पंचनाई बसून याज्ञिक संबंधीं व्यवस्था करवीत आहेत. मंडळीला आचमन, स्तुतिस्तोत्रादिपठण, ऋत्विक कर्मादिकांच्या वरण्या " भारद्वाज गोत्रोत्पन्नां ज्ञानेश्वर-कन्या यजमानाहं " इ० संकल्पपूर्वक महाराज देत आहेत, वरण्या मिळालेली मंडळी मंडपांत आसनावर बसून विष्णुसहस्रनाम, भगवद्गीता, सप्तशती, हरिपाठ, रासपंचाध्यायी, यमुनाष्टक, अमृतानुभवादि आपआपले पाठ करण्यांत व जपजाप्यांत गढून गेलेली आहे; दुसरीकडे कोणी स्नानें करीत आहेत, कोणी धोतरें धूत आहेत, कोणी वस्त्रें वाळवीत आहेत, कोणी ओलींच नेसून लगबगीनें चालले आहेत, कोणी धाबळ्या, कोणी शाली पांघरून संध्यातर्पण, देवपूजा, पुरुषसूक्त, रुद्राध्ययनादि नित्यकर्म करीत आहेत; पलीकडे तंबूत प्रेक्षक मंडळीची गर्दी झालेली आहे. स्त्रिया,

स्तु० प्रा० पृ० ३०



श्रीमज्ज्ञानेश्वराचार्यकन्यकाचारुभाषिणी । गोपालश्यामचिन्मूर्तिप्रेमपर्यंकशायिनी ॥
मधुराद्वैतपीयूषसंप्रदानयशस्विनी । शरण्यासर्वभूतानांजननी मे प्रसीदतु ॥

पुरुष व मुलांनीं वाळवंट फुलून गेलेलें आहे. कोणी महाराजांचीं पुस्तकें, फोटो विकीत आहेत, कोणी तीं विकत घेण्याची गर्दी करीत आहेत; दुसरीकडे नारळाचें पोतें सुटून त्यांचा क्रयविक्रय होत आहे. इतक्यांत होमाची वेळ जवळ येऊन ऋत्विक मंडळीस स्नानार्थ सूचना होत आहे. व महाराजांचें स्नान होऊन अलंकारमंडित गोपीवेशानें श्रीकृष्णासह ते यजमानस्थानापन्न झालेले आहेत. ऋत्विक मंडळीहि होमवेदीला वेढून आहुत्या टाकण्यास सिद्ध आहे. एकसमयावच्छेदेंकरून कात्यायनी मंत्रोच्चारपूर्वक स्वाहाकारानें मंडपांतील वातावरण घुमून राहिलें आहे. पुढें अवभृथस्नानाचा रमणीय प्रसंग प्राप्त होऊन विपुल जलाशयांत मंडळी फेर धरून उभी आहे. मध्यभागीं श्रीकृष्णासह महाराज असून ' जय गोविंद राधे गोविंद ' ह्या भजनगजरांत मंडळी महाराजांवर पाणी उडवीत श्रीकृष्णाचें चरणोदक आंगावर घेत आहेत. अशा आनंदांत सगळ्यांचें अवभृथस्नान झाल्यावर होमास प्रदक्षिणा होऊन नंतर पूर्णाहुती, नैवेद्यसमर्पण, ब्राम्हणभोजन वगैरे झाल्यावर उत्सवाची सांगता होत असे.

उत्सवानंतर सवडीप्रमाणें मंडळी चार आठ दिवस महाराजांच्या सहवासाचा आनंद घेण्याकरितां रहात असत. भोजनाचे वेळीं मंडळींचे श्लोक, महाराजांचे नवीन श्लोक, गाणीं व ज्ञानराजमाउलींचें नामस्मरण, ह्यांची बहार होत असे. प्रसंगविशेषीं महाराजांच्या श्लोकांवर प्रश्नोत्तरांचीहि मौज होत असे. उदाहरणार्थ-शुक्लेश्वर वाठोडा येथील दैवज्ञ व्यंकटशास्त्री यांचीं प्रश्नोत्तरें पहा:—

**त्र्यंकटशास्त्री**—आर्या—मानसिं अतिभय वाटे कैं हें भवजलधितोय आटेल । परि तें सापेक्ष असे गुरुहृदयीं प्रेमपूर दाटेल ॥

**महाराज**— भवभय मुळींच नाहीं मृगजलसम व्यर्थ त्यास काय भिणें । तो यदुपति मनिं ध्यावा जो निजदासास ब्रम्हभान भिने ॥

**त्र्यंकटशास्त्री**— पुत्राचे वात्सल्यें स्वगृहिं धन सांगतो पिता आहे । परि तें करणे कोणीं असकृत् पुत्राहि विचारिता होय ॥

**महाराज**— पुत्र पिता हे दोन्ही एक म्हणुनी येथ सांगणें कोणा? । देश गृहांत जितुका तेवीं हृदयास नाहिंची कोणा ॥

त्र्यंकट०— उपदेशा करिति बहू परि पारंपर्यज्ञान येथ वसे । यास्तव वाटे मजला या मार्गी मी विकुंठकेलिं वसे ॥

**महाराज**— मीपण असें नसावें जेणें मिळतो जगीं उगा मान । परि हरिचे सुत व्हाया मी मी म्हणुनी असोचि अभिमान ॥

या त्रनसमार्गाच्या सुमारास एका प्रसंगास अवर्णनीय भरती येत असे. व तेवढ्याच एका गोष्टीस लुब्ध होऊन मुद्दाम वेळांत वेळ काढून दूरदूरची मंडळी महाराजांकडे येत असत. तो प्रसंग ह्मणजे महाराजांचें अमृतमधुर निरूपण.

सर्वांच्या चित्तवृत्ती एकाच विषयाकडे लागून गेल्या आहेत, महाराजांच्या मुखांतून आतां काय निघेल याची प्रत्येकजण वाट पहात आहे, ऐकलेले शब्द अनुभवास पटल्यामुळें वा! महाराज! वा! असें मार्मिक श्रोते ह्मणत आहेत, मधून मधून श्रुतिसंतांच्या

प्रमाणवचनांची छटा निरूपणाला विशेष खुलवून राहिली आहे, मार्मिक प्रसंगीं श्रोत्यांच्या नेत्रांतून अश्रुप्रवाह लोटत आहे, श्रोतृ-समूहांत कोणी प्रातःस्नान व संध्यापूजा आटपून निरूपण ऐकत बसले आहेत, कोणी अर्धीच पूजा सोडून, कोणी जप सोडून निरूपण ऐकण्याला तत्पर झाले आहेत, कोणी नुकतेंच स्नान करून भस्मोध्दूलन केलेले श्रवणार्थ थबकून राहिले आहेत, कोणी स्नानाच्या तयारीनें गंगेकडे जात असतांना तसेच निरूपण ऐकत उभे आहेत, कोणी अस्नातच बसले आहेत तर कोणी मुखप्रक्षालन करीत असतांना निरूपण हातचें जाऊं नये ह्मणून तसेच येऊन बसले आहेत; महाराजांची श्यामसुंदर मूर्ति मध्यभागीं प्रातःकाळची उन्हाची तिरीप अंगावर घेत वेत्रासनावर आरूढ होऊन मधून मधून मान व हात फिरविणें, "मा जेवतो पन मी" इ० बालविचेष्टितादि प्रकार करीत आहे, महाराजांच्या हृदयाला पान्हा फोडून भक्तिसुधाबोधाच्या धारा भाविक प्रेमळ वत्सांकरितां वाहविणारी श्रीनिवासशास्त्र्याची चतुर प्रश्नमालिका सुरू आहे, निरूपणाच्या ओघांत स्मृति व प्रत्यभिज्ञा, सत्य, असत्य व मौन, हिंसा व अहिंसा, इत्यादिकांचे सूक्ष्म भेद व रहस्यविवेचन ऐकून श्रोत्यांच्या चित्तवृत्ति प्रसन्न होत आहेत, असा हा एकंदर प्रसंग मोठा संस्मरणीय असे.

श्रावण-वद्यांतील श्रीकृष्णजन्माष्टमीचा उत्सवहि असाच अपूर्व रसोत्पादक व चित्ताकर्षक होत असे. कदलीस्तंभमंडित सुंदर वितान-युक्त व आम्रपल्लवादिकांनीं सुशोभित केलेलें देवस्थान, कमलादि

पुष्पांनीं सजवून उंच स्थानीं मांडलेलें देवाचें सुंदर मखर, दीपाचा चकचकाट, मधुर तुलसीपुष्प—दूर्वादिकांचा पूजासंभार, चांदीच्या पात्रांतून मांडलेलीं दधिदुग्धादि पंचामृतद्रव्यें व नैवद्याचे पदार्थ, एका बाजूला चाललेलें श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधाचें पारायण, व दुसरीकडे रुद्र, पुरुषसूक्त, विष्णुसहस्रनामाचें आवर्तन, मध्य-भागीं शुचिर्भूत होऊन गोपीवेशानें पूजा करीत असलेली महाराजांची मूर्ति, व पूजासाहित्य देणारे पंडितादि परिजन, देवाला पंचामृत-स्नान, सुगंधि तैलें, उटणीं, उष्णोदकादि उपचारपूर्वक मंगलस्नान व अभिषेक, नंतर सुंदर वस्त्रालंकारादि भूषणें व सुवासिक पुष्प-मालादि समर्पण, धूप दीप नैवेद्य तांबूल व आरत्यांचा थाट, मंत्र-पुष्पांजलि व गोपीगीतादि स्तोत्रांनीं उच्च व मधुर स्वरांत स्तवन, मध्यरात्रीं देवाची शय्या असा नवरात्राचा रोजचा पूजन-समारंभ असे.

जन्माष्टमीचे दिवशींची बहार कांहीं निराळी असे. यमुना, गोकुळ, मथुरेचा देखावा, मथुरेंतील जन्मोत्सव, गणपती, व्यास व सरस्वतीपूजन, पुरुषसूक्त मंत्रानें क्षीराब्धिवासी विष्णूचें स्तवन व गर्भस्तुति; मथुरेंतील जन्म झाल्यानंतर देवाला यमुनेंतून गोकु-ळांत नेणें; यमुनेंत दिवे, मत्स्य सोडणें; यमुनापूजन, यमुनेवर नारळ फोडणें, पुढें गोकुळांतील जन्मोत्सव, जन्माचा अध्याय वाचणें, जन्माच्या वेळीं गुढी उभारून साखर पान वांटणें, शकुनधागगी घेऊन दोन स्त्रियांनीं उभें रहाणें व त्यांनीं नंदाला पुत्र झाल्याचें वर्तमान सांगणें, महाराजांनीं देवकी होऊन नंदद्वारावर गाणीं म्हणणें,

वेश्येस नंदानें नजराणा देणें, वेश्येनें आरती ओवाळणें, नंतर नंदाकडून गर्गाचार्यांस पाचारण व त्यांचें आगमन, गर्गपूजन, गर्गाचार्यांनीं भागवताध्यायांतून जातक कथन करणें, व विशेष पुत्रलक्षणकथनार्थ स्वशिष्यानयन कथन, नंदानें पुत्राचें मस्तकावघ्राण करणें, पुत्रमुख पहाणें, सोन्याच्या मुदीनें श्रीकृष्णाच्या ओंठास सहद लावणें, नंतर नामचतुष्टयकरण व नामचतुष्टयपूजन, नंतर गर्गाचार्यांच्या आज्ञेनें शिष्यनात्यानें महाराजांनीं जातकनिरूपण करणें, पुढें देवाला न्हाऊं घालणें, पाळण्यांत घालून पांच नांवें ठेवणें, महाराजांनीं गाणीं म्हणणें, बालरक्षा, यशोदेनें विश्वरूपाचें ध्यान करणें, यशोदेच्या मांडीवर देवाला ब्राह्मणद्वारा अभिषेक, यशोदेच्या हातीं हळदकुंकू देणें, अक्षवान करणें, वगैरे सूतिकागृहांतील प्रकार, पुढें व्यासपूजन, गोप्रदान, बाळंतविडा वगैरे होईपावेतों सकाळचे पांच सहा वाजत असत. नंतर आरती, प्रसाद वगैरे झाल्यावर पारणें व काला होत असे. या प्रसंगींचीं महाराजांचीं गाणीं, पाळणे, जातकवर्णन, काल्याचे वेळचें निरूपण, श्रीकृष्णलीलावर्णन वगैरे मोठें अभिनव असून त्याच्या श्रवणानें प्रत्येकाचें अंतःकरण जणूं काय श्रीकृष्णाचें अवतारस्थानच बनत असे.

तसाच माघवद्यांतील महाशिवरात्रीचा उत्सव. रुद्राक्षभस्मधारणादि महाराजांची शिवदीक्षा, नवरात्रांत अकरा दिवस उपोषण, शंकरास एकादश रुद्रावर्तनपूर्वक अभिषेक व षोडशोपचार पूजन, नित्य

---

१ नक्षत्रनांव, मासनांव, जन्मनांव, व व्यावहारिक नांव हें नामचतुष्टय.

शिवलीलामृताचें साग्र पठण, महाशिवरात्रीचे दिवशीं रात्रभर शिवजागर, शिवसहस्रनामावळीनें बिल्वपत्रसमर्पण, चंदनानें व शुभ्र तंदुलाक्षतांनीं शिवलिंगाला मनोहर विलेपन, नाना पुष्पधूपदीपोपहारादि उपचारांनीं अर्चन व नंतर अपराधक्षमापनस्तोत्रादिकांनीं स्तवन, भजनकीर्तनाचा गजर व ' मंदिर माडी पुरेपुरे । घोडागाडी पुरेपुरे । खेतीवाडी पुरेपुरे । सोडुनि सगळें हरहरहरहर हरहर शंभो तूं म्हणरे ॥ ' इत्यादि शिवपर काव्यवाणीनें शिवभक्तीचें प्रबोधन आदिकरून सगळा प्रकार शिवभक्तीचा उत्कर्ष करून श्रीकृष्णध्यान दृढ करणारा होता. हें शिवकृष्णोपासनेचें रहस्य समस्त श्रुतिसंतपरंपरेनें चालत आलेलें आहे. प्रसिद्ध नेमळ श्रीकृष्णभक्त बिल्वमंगल यांचे पुढील उद्गार ऐका: —

" शैवा वयं न खलु तत्र विचारणीयं पचाक्षरीजपपरा नितरां तथापि । चेतो मदीयमतसीकुसुमावभासं स्मेराननं स्मरति गोपवधूकिशोरम् ॥ १ ॥ " तुलसीदास म्हणतात:—

" शंकरप्रिय मम द्रोही शिवद्रोही मम दास । ते नर करहिं कलपभरि घोर नरकमहँ बास ॥ सिवद्रोही मम भगत कहावा । सो नर सपनेहु मोहिं न पावा । संकरबिमुख भगति चह मोरी । सो नारकी मूढमति थोरी ॥ "

हें हरिहरोपासनेचें प्रक्रियामय रहस्य महाराजांनीं आपल्या ' संप्रदायसुरतरु ' फार चांगलें विशद केलें आहे.

एवंच पयोष्णीतीरचीं सिद्धेश्वर, सोमतीर्थादि विजनस्थानें असोत; माधान, सिरसगांव, चांदुरबाजारासारखे लघुग्राम असोत किंवा उमरावती, नागपूर, मुंबई, पुणें, कलकत्त्यासारखीं दाट वस्तीचीं शहरें असोत; महाराजांच्या निवासानें तीं सुकृतिजनांस सदा सेव्य अशीं पुण्य क्षेत्रें बनत; व गोविंदगुणगान, भगवन्मखमहोत्सव व भगवज्जनसहवास यांचा एकाच वेळीं तेथें लाभ मिळत असे.

असा लाभ जेथें मिळत नाहीं; तो इंद्राचा स्वर्गहि तुच्छ होय. याविषयीं श्रीमद्भागवतांत पुढील वचन प्रसिद्ध आहे:—' न यत्र वैकुंठकथा सुधापगा न साधवो भागवतास्तदाश्रयाः । न यत्र यज्ञेशमखा महोत्सवा देवेंद्रलोकोपि न वै स सेव्यताम् ॥ '

तात्पर्य, भगवज्जनांच्या सहवासावांचून भगवद्भजनांत केव्हांहि चित्त स्थिर व्हावयाचें नाहीं, हा नियम आहे. मोरोपंत म्हणतात:—' तुझें यशचि तारितें परि न केवळा तारवे । सहाय असिला असे तरिच शत्रुला नारवे । न भागवत भेटतां न घडतांहि तत्संगती । न अज्ञहृदयें तशीं तव यशोरसीं रंगती ॥ '

भगवज्जनांच्या रम्य भक्तिनिकेताचें मनोरम वर्णन ज्ञानेश्वर महाराज करितात:—' जेथ आराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे । वैराग्यासी दुणीन चढे । देखिलिया जें ॥ जो संतीं वसविला ठावो । संतोषासी सावावो । मना होय उत्सावो । धैर्याचा ॥ अभ्यासचि आपण यातें करी । हृदयातें अनुभव वरी । ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥ जया आड जातां पाथा । तपश्चर्या

मनोरथा । पाखांडियाही आस्था । समूळ होय ॥ स्वभावें वाटे येतां । जरी वरपडा जाहला अवचितां । तरी सकामही परी माघौता । निर्घो विसरे ॥ ऐसेनि न राहतयातें राहवी । भ्रमतयातें बैसवी । थापटूनि चेववी । विरक्तीतें ॥ हें राज्य वरि सांडिजे । मग निवांता येथेंचि असिजे । ऐसें शृंगारियांहि उपजे । देखत खेवो ॥ जें येणें-मानें वरवंट । आणि तैसेंचि अतिचोखट । जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ॥'

ज्ञानेश्वरी ६—११

**मंडळीचा सत्वोत्कर्ष**—सारांश, अशा नित्यनैमित्तिक उत्सवमय सहज चर्येत प्रथम प्रथम मंडळीच्याच मनोगतानें वागून व प्रसंग-विशेषीं आपल्या योगसामर्थ्याचा उपयोग करून महाराजांचा शिक्षणक्रम सुरु असतांना मंडळींचा सत्वोत्कर्ष होऊं लागला, त्यांची धर्मप्रवृत्ति वाढली, विषयांतून मन मुरडूं लागलें, सत्संगाची चटक लागली, पादुका व पार्थिवपूजा, तीर्थग्रहण, आळंदीगमन, हरिपाठ, ज्ञानेश्वरीचें नित्यपठण, सोमवार, एकादशी, गुरुवारादि व्रतें इ० नेमधर्म सुरु झाले, कोणी सर्वसंगपरित्याग करून महाराजांच्या सेवेंत राहूं लागले, त्यांची हळु हळु बुद्धि वाढून वेदांतनिरूपण ग्रहण करण्याची योग्यता येऊं लागली, कोणास महाराजांनीं अभ्यास-क्रम सांगितला, कोणी महाराजांच्या प्रेमासाठीं घरचीं माणसें महा-राजांवर टीका करीत असतां त्यांचा योग्य प्रतिकार केला, कोणास त्यांच्या सात्विक भावनाबळानें नित्य श्रीकृष्णमूर्ति डोळ्यांपुढें दिसूं लागली, कोणास महाराजांच्या अल्प सहवासानें इष्ट देवतेचें दर्शन

होऊन त्यांची उपासना फळास आली, व कोणास परतंत्र परिस्थितीनें उत्सवास न येऊं दिल्यामुळें त्यांच्या मनाचा संवेग वाढून कवित्वस्फूर्ति व रासदर्शनादि अनुभवाचा लाभ मिळाला.

हे शेवटले अनुभव श्रीनिवासशास्त्री यांचा थोरला मुलगा बापूगडी याला आलेले आहेत. ते विशेष संग्राह्य असल्यामुळें येथें देतों. शके १८२७ च्या पौष महिन्यांत म्हणजे इ० स० १९०५ च्या दिसेंबरांत बापूगडी हा बांकीपूर (पाटणा) येथील टेंपल मेडिकल स्कूलमध्यें शिकत होता. या वर्षीं अभ्यासाच्या वगैरे अडचणीमुळें महाराजांच्या कात्यायनीव्रतास तो येऊं शकला नाहीं. तेव्हां त्यानें स्तुतिकुसुममालिका म्हणून १०३ श्लोकांचें एक स्तोत्र नवीन करून ता० १८ दिसेंबर १९०५ रोजीं महाराजांकडे पाठविलें. ही काव्यस्फूर्ति आपल्यास कशी झाली याविषयीं ता० ७ जानेवारी १९०६ च्या पत्रांत तो आपल्या तीर्थरूपांस लिहितोः—" रात्रीं अभ्यास वगैरे संपल्यानंतर पत्र लिहिण्यास बसलों. पत्र लिहिलें व निजणार तोंच अशी एक विलक्षण स्फूर्ति झाली कीं, कांहीं सांगवत नाहीं. ज्ञानेश्वर महाराजांचे नमस्कारार्थ पांच ओव्या कराव्या म्हणून बसलों. ५ ओव्या झाल्या व नंतर मी लिहित मात्र होतों. काय लिहिलें तें दुसरे दिवशीं वाचलें. तेव्हां हे श्लोक झाले असें समजलें. मी छंद जोडण्याकरितां किंवा अनुप्रास, यमक वगैरे कांहीं एका करितां मुळींच प्रयास घेतला नाहीं. मला कविता करतां येत व मी रोज ५ अगर ६ श्लोक करूं शकेन असें वाटत होतें व ते करण्याकरितां दिवसाचे बहुतेक सर्व तास लागत असत. असें असतां देखील

गुरुवारीं रात्रीचे अकरापासून तों बारापर्यंत ३०।३५ श्लोक लिहून निघाले होते. नंतर श्लोक १०० करावे असा विचार होऊन श्रीसद्गुरुमहाराजांनींच ते एक दोन दिवसांत पूर्ण करून घेतले. ते श्लोक हे:—

## स्तुतिकुसुममालिका.

ॐ नमो अरुणकोमलपादा । वाक्सुधा तव विनिर्गत वादा ।
सज्जनाननगता सुविरामा । ऐकता परम मंगलरामा ॥ १ ॥
ॐ नमो रुचिर चारुपदांबुजा । लोललातितर सुंदर स्यांबुजा ।
लाजवीचिगुणम्लानपणानहा । साजतो म्हणुनि बा उपमीं नहा ॥ २ ॥
ॐ नमो सुबक त्या पदमुद्रा । घेउनी शिरिं तरीन समुद्रा ।
दुस्तरा अतितराहि जयाच्या । सर्वदां चरणिं हा मम त्याच्या ॥ ३ ॥
ॐ नमो मृदुलपाद सरोरुहा । नम्र कामद देव महीरुहा ।
पादहा निजजना धनगापहा । वर्णिताति महिमा मुनिहा अहा ॥ ४ ॥
ॐ नमो चरणपंकजकांति । शारदेंदु हृदयांतरिं खंती ।
वाढवी समल लांछन त्याचें । वागवीं निजतनूवरि साचें ॥ ५ ॥
ॐ नमो चरणपंकज युग्मा । सुंदरारुणलसच्छविसद्मा ।
भास्करागत मयूख समूहा । ताप दे उपमितां अति तो हा ॥ ६ ॥
ॐ नमो चरण हा छविशाली । ज्ञानराज करुणार्णवशाली ।
इंदुसुंदर मयूखसमूहा । भ्रांति देत चरणाब्जमिषें हा ॥ ७ ॥
ॐ नमो अरुणकांत पदाली । ज्ञाननाथ चरणानतमाली ।
देतसे बहुत मोद मना जिची । प्रेक्षणीय सुषमा म्हणतीं तिची ॥ ८ ॥
ॐ नमो तवपदांबुजकांति । कांतिमंत हृदयांतरिं भ्रांति ।
जाहली दिनमणीस म्हणोनी । अंबरीं फिरत तप्त अझोनी ॥ ९ ॥
ॐ नमो चरणपंकज भासा । होउनी भ्रमर मन्मनवासा ।
त्यावरी करुनि तन्मकरंदा । लुब्ध होउनि वरूं सुखकंदा ॥ १० ॥
ॐ नमो सुचरणारुणरागा । त्वत्पदांबुजयुगीं अनुरागा ।

ठेविती मनुज तन्मुखकांति । वाढवी हरुनि अंतर खंती ॥ ११ ॥
ॐ नमो तवपदांबुज देवा । नित्य मानसिं वसो मम ते वा ।
मत्सुखप्रचुर त्यांतचि सारें । वाढतें वघ सुरम्य खलारे ॥ १२ ॥
ॐ नमो सुचरणारुणिमागुरो । पादनम्र अघसंघ कधीं नुरो ।
दग्ध त्या म्हणुनियां करण्या प्रभो । आणिला अनलराग गमे विभो ॥१३॥
ॐ नमो पदनखारुणकांति । चंद्रिका हृदयभीतरिं खंती ।
वाढवी कुमुदिनीस विकोशा । दाउनी नतहृदंतर कोशा ॥ १४ ॥
ॐ नमो पदनखारुणदीप्ति । सोज्वलीकरण कार्यविपात्ति ।
वृत्तिवी हरविण्यास गमे तीं । पातली ज्वलित ही जणुं वाती ॥ १५ ॥
ॐ नमो पदनखागत वक्रता । शारदीय प्रमेंदु विनिर्गता ।
सोज्वला स्पृहणीय गमे मना । वाढवीत तवदर्शन कामना ॥ १६ ॥
ॐ नमो चरणपंकजरेणू । आश्रिता कलिमलाकुलरेणू ।
बाधती न कधींहि निजभक्ता । चित्रसे गमतसे मम चित्ता ॥ १७ ॥
ॐ नमो विमल पादरजःकणा । हें कसें नवलचित्तरजःकणा ।
घालवीत करि शुद्ध त्वरें मना । धन्य धन्य महिमा भवसंजना ॥ १८ ॥
ॐ नमो चरणपंकज वारा । शांति देत सुमनास उदारा ।
तापतप्त शिर शांत कराया । स्पर्श भेषज जना सुखवाया ॥ १९ ॥
ॐ नमो सुपदपद्मजशीतता । तापतीन अपाकरिता सता ।
होत मोदद मना बहुहा कशी । पार्वणेंदुप्रतिभा शरदीं जशी ॥२०॥
ॐ नमो चरणपंकजवारी । बिंदुमात्र वदनांतर धारी ।
आटवी भवजला सकला हीं । मोददा तव विचित्र कला ही ॥ २१ ॥
ॐ नमो चरणपद्मजनीरा । सुष्टुगंधयुत शीत उदारा ।
पादनम्र कलशेचन दाहा । योग्य होय परिसा नवला हा ॥ २२ ॥
ॐ नमो मृदुलपादसरोरुहा । ऽऽ स्पृष्ट वारिपहा भवभूरुहा ।
वाढवी नच परंतु विचित्रता । भस्मसात् करि समूलचि तत्वता ॥ २३ ॥
ॐ नमो कुसुमकोमल पादुका । ऽऽ स्पृष्टनीरकणपाति वितापका ऽ– ।
सुक्षय प्रणतभक्त सुरक्षका । ऽ नाथवा कलिपरीक्षितितक्षका ॥ २४ ॥
ॐ नमो चरणपंकजपाणी । तापतप्त जनपामृतखाणी ।

मीन लीन अति होउनि देवा । त्या जळीं निवळुं तो सुखमेवा ॥ २५ ॥
ॐ नमो चरणपंजकांनिगंता । माधवी हरिझरी आणि सेविता ।
मोहनत्तरमदासि न सेवितां । वाढवी नवल ती अति तत्वतां ॥ २६ ॥
ॐ नमो चरणजात सुचिन्हें । पापवृंद परिदाहक वन्हे ।
विश्ववंद्य चरणांबुजयुग्मा । श्रीनिकेतन सदा सुखसद्मा ॥ २७ ॥
ॐ नमो पदजवज्र सुरेश्वरा । भक्तापद महीध्रवरेश्वरा ।
चूर्णचूर्ण करण्यास गमे मना । घेतलासि नतपूरितकामना ॥ २८ ॥
ॐ नमो चरणवज्रविभो मनीं । भाविती सकल शास्त्रशिरोमणी ।
स्वीय लोक रिपुवृंदविमर्दना । योग्य ठाव पादिं कालनिकृंतना ॥ २९ ॥
ॐ नमो धृतसदंकुशपादा । देवदैत्य नरवंदितपादा ।
कालमत्त अतिमत्तमतंगा । आकलोनि प्रभुराक्षि मदंगा ॥ ३० ॥
ॐ नमो चरणजातपताका । शोभते लखलखीत अशी कां ।
वाटते प्रणतशत्रुसमाजा । मारुनी उभविली जयकाजा ॥ ३१ ॥
ॐ नमो चरणजात सुपंकजा । वाढवी तव सदा पद पद्मजा ।
येति तन्नयन दर्शन ध्यावया । नांववी जनपदोदक प्यावया ॥ ३२ ॥
ॐ नमो सरल ऊरुगशोभा । की गमे सुकदलीगतगाभा ।
लाजवी करभभागहि साचा । मार्दवें रुचिरशा युवतीचा ॥ ३३ ॥
ॐ नमो रुचिरशा कटिभागा । पीतवासापिहिता कटिभागा ।
आश्चर्य तव भवांबुधिबिंदु । वाटतो अज कृपानतसिंधु ॥ ३४ ॥
ॐ नमो लखलखीत सुवाससा । झांकिसी विमल मूर्तिसि तूं कसा? ।
झांकिसी तदनुरागबळें असें । होउनी म्हणुनि वाटत पीतसें ॥ ३५ ॥
ॐ नमो सुबक पीतसुवाससा । धन्य भाग्यमहिमा तव दासा ।
साजसी खचित तंतुतनूंतुनी । काढुनी सुकटिगा पट होउनी ॥ ३६ ॥
ॐ नमो कनकजात सुमेखला । हीं जशी कटिसभोंवति चंचला ।
शोभवीत कटिदेश सुरेखशी । रत्नहीरमणि मौक्तिक युक्तशी ॥ ३७ ॥
ॐ नमो कमलसुंदरनाभा । पावना अति सखोल सुनाभा ।
वाटते अतिगभीर दरीही । काळभीत नतगुप्त करीही ॥ ३८ ॥
ॐ नमो उदर हें तव धीरा । पादवी भवनदी परतीरा ।

घालवीत अपराधसहस्रा । अंतरीं सहज हे दिनरात्रा ॥ ३९ ॥
ॐ नमो तव विशाल उरस्थली । शोभमान अति सोज्वल पातली ।
जीवरी अलिकुलाकुल शोभती । सुष्टुगंधयुता वनमाल ती ॥ ४० ॥
ॐ नमो रुचिर चारु सुवक्षा । पादनम्रजनतारणदक्षा ।
संतसज्जन कदंबकरक्षा । संहरूनि करिशी प्रतिपक्षा ॥ ४१ ॥
ॐ नमो हृदय तें तव देवा । ज्यांत नित्य मुदयामृत ठेवा ।
राहतो निजजनांप्रति थाया । वाहती चरणि जे निजकाया ॥ ४२ ॥
ॐ नमो हृदयपंकज तूझें । वाहतां थकुनि संसृतिओझें ।
यद्गतामित दयामृतलेशा । पाउनी त्यजिति सज्जन क्लेशा ॥ ४३ ॥
ॐ नमो कमलकोमलवक्षा । सर्वदां द्रुत सदाश्रितपक्षा ।
अंतरीं अतिसुशुद्ध असे तें । प्रेमपादनता सुख देते ॥ ४४ ॥
ॐ नमो रुचि सुरुद्रकमलाची । दर्शनीय प्रतिभा विमलाची ।
माळ ज्यावरि रुळे स्फटिकाची । शुद्ध शुभ्र अति दीप्तिद साची ॥ ४५ ॥
ॐ नमो तव गुरो उरशोभा । गौरवर्ण वनमालयुताभा ।
गंधलोलुप मिलिंद सुपंक्ति । शंकराक्षिकृत माल गमे ती ॥ ४६ ॥
ॐ नमो उर हिरण्मय कोशा । पादपद्मरत जे नरकोशा ।
दाविती करुनि ज्ञानदरिद्रा । दैन्यहारक तदीय न तत्रा ॥ ४७ ॥
ॐ नमो उरसदंबुज तूझें । दत्तभाव भवबंधन लूझें ।
देत हे करुनि मोद मनाला । ज्ञाननाथ हरिरवामृत प्याला ॥ ४८ ॥
ॐ नमो कमलनेत्रजमाला । शोभवी अतितरा हृदयाला ।
ज्ञाननाथ अपुल्या सुविशाला । अंतरस्थ नतभाव वशाला ॥ ४९ ॥
ॐ नमो तव सुकंठ सुरेखसा । वाटतो प्रभुजी मम मानसा ।
शोभतो तव हृदंबुजनालसा । वाढतीत तव दर्शनलालसा ॥ ५० ॥
ॐ नमो सतत सुंदर ग्रीवा । पापतापहरही तव जीवा ।
जीवरी रुळति त्या कुसुमाच्या । मालिका सुरभि सुंदर साच्या ॥ ५१ ॥
ॐ नमो तव विभो उपवस्त्र तें । सोज्वलातितर सुंदर शोभतें ।
कोमलारुण मृदोसिद गात्र तें । दीप्तगगान रुवि होउनि झांकिते ॥ ५२ ॥
ॐ नमो सुभग ते उपवस्त्र या । सिंहशावक वनांनि असे दया ।

गुप्त जेविं दिरला लतांतरीं । तेविं गात्र अतिशोभ यदंतरीं ॥ ५३ ॥
ॐ नमो रुचिर वक्ष सुरेखगी । वाटतें समगुणें दुसरी शमी ।
ख्यात हें अनल घे शमि भीतरीं । तेविं हे तनुजदीप्ति निजांतरीं ॥५४॥
ॐ नमो तव सुवक्ष सुरेखसें । तें यदंतर तिरोहित दे्तसे ।
आर्द्र मेघगणावृत सूर्यसी । कांति सुंदर सना अति सौम्यसी ॥ ५५ ॥
ॐ नमो गुरुवरा तव स्कंधा । अज्ञताप्लुतमना कुमदांधा।
देउनी विमलज्ञान तयासी । मार्ग उद्यत करूनिच दाविसी ॥ ५६ ॥
ॐ नमो तव सुबाहुयुगाप्रति । जाउनी मिळति जानुयुगाप्रती ।
दीर्घ आणि सरला मृदुतायुता । देत घट्ट भवबंधविमुक्तता ॥ ५७ ॥
ॐ नमो रुचिरशा भुजदंडा । वर्तुलाकृति जणूं गजशुंडा ।
रूपहीन परि ही उपमानीं । साजते गुरुवरा न म्हणोनी ॥ ५८ ॥
ॐ नमो तवविभो भुजयुग्मा । मांसलाति मृदुशा द्युतिसग्मा ।
भांडतां नवभवासुरसंगें । दाविती सुपविसार निजांगें ॥ ५९ ॥
ॐ नमो भुजयुगाप्रति तूझ्या । दुःख सर्व विनिवारणिं माझ्या ।
दक्षता प्रकट तूं करशी ती । श्रीगुरो निजजनावरि प्रीति ॥ ६० ॥
ॐ नमो प्रभुवरा तव हस्ता । संसृतीनग करीत चूर्णता ।
अंबुजेमि उपमी नर याला । मानवे न पवितुल्य बलाला ॥ ६१ ॥
ॐ नमो करसरोरुह देवा । कांतकामद सदाऽसुख हेवा- ।
तत्परा हरणिं सत्सुखमेवा । पादपंकजनता मज देवा ॥ ६२ ॥
ॐ नमो तव करांबुज सद्गुरो । ठेवितांचि नतमस्तकिं आहरो ।
ताप सर्वांहे तदीय कृपाकरा । ईश्वरा सुखसमुद्र सुधाकरा ॥ ६३ ॥
ॐ नमो कमलकोमल पाणी । ज्ञानदा अखिलपा सुखदानी ।
नित्य उद्यत भवांबुधिगांना । तारण्यासि चरणस्थ नरांना ॥ ६४ ॥
ॐ नमो तव करांबुजसीकरा । सिंचनाहत सदा पदकिंकरा ।
ज्ञाननाथ प्रभु दीनदयाकरा । दासदास करुनी सुख द्या वरा ॥ ६५ ॥
ॐ नमो अरुणिमा सुकराची । पादनम्र भवतप्त नराची ।
आग शांत करितां करितांना । पातली मज गमे मृदुलांना ॥ ६६ ॥
ॐ नमो सुबक चारु करांगुली । दीप्तिदा अतिमनोरम चांगली ।

अग्रभागज नखारुणिमा पहा । बाल भास्करभा जणुं ही अहा ॥ ६७ ॥
ॐ नमो तदुपरी स्थित मुद्रिका । हेमरत्नखचिता तिमिरांतका ।
शोभवी तव करांगुलिका न ती । शोभते परि करांगुलिसंगती ॥ ६८ ॥
ॐ नमो वदनपंकज ईशा । गंधयुक्त अतिनूतन कोशा ।
पाहुनी भ्रमति सज्जनभृंगे । भेट इच्छिति गमे तनुसंगें ॥ ६९ ॥
ॐ नमो तव विभो मुखचंद्रमा । पाहुनी द्युतिस लाजतसे रमा ।
संतसज्जन सुखामृत सागरा । दर्शनें भरति आणित हा खरा ॥ ७० ॥
ॐ नमो तन्मुखांबुजनिर्गता । कुंदसुंदर पांडुरदांकिता ।
स्वच्छ निर्मल अशी अतिदीप्तिदा । मोददातितरही मज तत्वतां ॥७१॥
ॐ नमो वदनपंकजमध्यगा । दंतकांतिगमे चरणानुगा-- ।
जी विभो तव तन्नतानततापका । लाजवी शरदपार्वणचंद्रिका ॥ ७२ ॥
ॐ नमो सरलशी तव नासा । श्रीकराग्रत सुचंपकभासा ।
घे निवृत्तिपदपद्म सुवासा । तृप्त होउनि करीं मुखिं दासा ॥ ७३॥
ॐ नमो सुकमलायतलोचना । दर्शनेंचि भवपाशविमोचना ।
विस्तृता रुचिर आश्रवणायता । सोज्वलामलतुट्ट छविप्लुता ॥ ७४ ॥
ॐ नमो जलजपत्रविशाला । मी म्हणे कमल त्या नयनाला ।
अंतरीं दिसतसे मज भृंगा । त्यावरूनि अति नील सुरंगा ॥७५॥
ॐ नमो तव सुलोचन शोभा । लाजवी मृगवरीनयनाभा ।
मोददाऽशुभहरी तव दृष्टि । टाकुनी मजसि दे सुखतुष्टी ॥ ७६ ॥
ॐ नमो कमल कोमललोचना । पादपद्मनतबंधविमोचना ।
ज्ञानराज करुणाकर तारका । सद्गुरो पदनतावनकारका ॥ ७७ ॥
ॐ नमो रुचिरपंकजनेत्रा । पावना परमसाधु पवित्रा ।
पूर्णशुद्ध सदयांतर दृष्टे । शुद्ध सत्व परिपूरित सृष्टे ॥ ७८ ॥
ॐ नमो रुचिरशी तव भ्रूलता । चारु सुंदर तदीय सुवक्रता ।
पादनम्ररिपुकुंतनकारिणी । चापयष्टि गमते मनमोहिनी ॥ ७९ ॥
ॐ नमो तव विभो सुललाटा । कुंकुमांकितशा छलपाटा ।
नील शैलज सुचंदन ज्वाला । लाविलें सुरभि शोभि कपाला ॥ ८० ॥

ॐ नमो प्रभुवरांच कपोळा । मांसलातिमृदुसुंदर गाला ।
शोभते किति विलक्षण दीप्ति । होत ती वघुनि लोचनतृप्ती ॥ ८१ ॥
ॐ नमो श्रुतियुगा प्रभुच्या हो । पादपंकजनता कृत दाहो ।
ऐकण्या सतत उद्यत देवा । ठेविती निशिदिनीं प्रभुचेवा ॥ ८२ ॥
ॐ नमो कचरुची प्रभुजीची । कीं सुनील जणुं ही भ्रमराची ।
काढिली गमत मन्मनिं कांति । देत पाहुनि मनास सुशांति ॥ ८३ ॥
ॐ नमो सुबक ती अलकावली । वाटते मम मनीं भ्रमरावली ।
श्रीनिवृत्तिपदपद्मजकेसरा । नित्य सेवित जी मुदनिर्भरा ॥ ८४ ॥
ॐ नमो रुचिरपंकजगात्रा । पावनाखिलनमस्कृतिपात्रा ।
नाम तें भवगदामृतमात्रा । प्राशितां सुखद ती जनुयात्रा ॥ ८५ ॥
ॐ नमो निजजनाखिलमंगळा । पादनम्रजनतापद मंगळा ।
नाथ हे सदयता दयिता कृता । विश्वनाथ करुणारसपूरिता ॥ ८६ ॥
ॐ नमो परममंगळधामा । दीननाथ नतपूरितकामा ।
नित्यसज्जनमनोगतरामा । ज्ञाननाथ हृतपादनता मा ॥ ८७ ॥
ॐ नमो सगुणरूपपरात्परा । मेदिनीगतसुरासुरईश्वरा ।
श्रीनिवृत्तिपदपंकज भृंगराट् । ज्ञानराज गुरुवर्य विश्वराट् ॥ ८८ ॥
ॐ नमो सकललोकसुखाकरा । संतचित्तसुचकोरसुधाकरा ।
त्वत्कथामृतपान दिवानिशीं । अज्ञता हरुनि होत दिवानिशीं ॥ ८९ ॥
ॐ नमो गुणगणैकविभूषणा । दुस्तरैकभवसागरशोषणा ।
पादपद्मशरणागतपोषणा । संतसज्जनसुचित्तवितोषणा ॥ ९० ॥
ॐ नमो सकलपालकवर्या । ज्ञानसिंधु निगमागमचर्या ।
नैजतापविनिवारणदक्षा । नित्यपूर्ण करुणारसवक्षा ॥ ९१ ॥
ॐ नमो परमपावनमूर्ते । दीनबंधु हृतनताघविपत्ते ।
नाथवर्य अमरार्चितपादा । तारिशी कृतगुणामृत वादा ॥ ९२ ॥
ॐ नमो सकल सज्जनवर्या । अज्ञतातिमिरनाशकसूर्या ।
भावगम्य स्वसुखामृतरूपा । विश्वरूप जगदेक अमूपा ॥ ९३ ॥
ॐ नमो विमलविस्फुटकीर्ते । शारदेंदुनिभसोज्वलमूर्ते ।
मातृवन्निजसुतार्ति हराया । उद्यता अभय या समया या ॥ ९४ ॥

ॐ नमो सकल लोककृपाकरा । मेदिनीगत अधर्मनिराकरा ।
नित्य सज्जनजना सुखसंहरा । देतसा सुख जनां नतकंधरा ॥ ९५ ॥
ॐ नमो अखिल नाथपरंपरा । आदिनाथ गुरुवर्य परात्परा ।
तत्प्रसाद सुरासुरवंदिता । मीननाथ सुजनाहृत नंदिता ॥ ९६ ॥
ॐ नमो तदुपदिष्ट सुगोरखा । पादनम्रजनभाव सुपारखा ।
मर्त्यलोकगत विष्णुस्वरूपा । नाथवर्य प्रभुजी सुखरूपा ॥ ९७ ॥
ॐ नमो तदुपदिष्ट सुगैनी । नाथजी सकल सोडुनि चैनी ।
हिंडतां सुजगदुद्धरणार्थी । साधुनी अखिलही पुरुषार्थी ॥ ९८ ॥
ॐ नमो तदुपदिष्ट निवृत्ति । नाथ जो सकल दुःख निवृत्ति ।
पादपद्मनतभग पुरुषांची । वृष्टि हा करुनि देत सुखाची ॥ ९९ ॥
ॐ नमो तदनुदत्त सुखाब्धी । ज्ञाननाथ गुरु हा करुणाब्धि ।
संसृतीअनलतप्त विलापा । ऐकुनी हरुनि दे सुख तापा ॥ १०० ॥
ॐ नमो तदुपदेशपवित्रा । संतसज्जनगणा सुपवित्रा ।
नित्य हिंडति जगीं मनुजातें । तारण्या गधुनि भाव तयातें ॥ १०१ ॥
स्तुतीकुसुममालिका इति पदीं तुझ्या वाहतों ।
मनोभ्रमर हा अतां चरणपंकजीं राहतो ।
अतां करुनियां कृपा वदय ज्ञाननाथाऽमला ।
भवच्चरणदास जे करि सुदास त्यांचे मला ॥ १०२ ॥

## मालिनी वृत्त.

स्तुतिकुसुम असें हें अर्पिलें ज्ञानराजा । सततमनधनेंसी पूर्ण आत्मात्म-राजा । चरणनिहितमूर्धा मागतो जन्मजन्मीं । तव पदरति देवा वाढवीं नान्यकर्मीं ॥ १०३ ॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीज्ञानेश्वरस्तुतिशतकं सर्वत्र यशस्वी श्री सद्गुरुनाथ ज्ञानेश्वर चरणारविंदार्पणमस्तु ॥

या नंतर एके दिवशीं बापूगडीला स्वप्नांत एक भव्य तेजःपुंज यती दिसून त्यांनीं अनुग्रह दिला. तो प्रकार असाः—" त्यांचें

शरीर भव्य व तेजःपुंज असून आंगास भस्म होतें. पायांत खडावा होत्या. मुखानें कांहीं निरूपण चाललें होतें. व मधून मधून ते ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर ह्मणत होते. वाठोड्याला दृष्टिसृष्टिवाद व सर्व सृष्टि स्वप्नमय आहे या विषयावर जें महाराजांचें निरूपण मी ऐकलें होतें त्याच्याशीं त्या निरूपणाचें फार साम्य होतें. प्रथम मी दूर उभा राहिलों. कांहीं वेळानें निरूपण संपल्यावर मी पायांवर नमस्कार केला. नंतर त्यांनीं मला उपदेश केला. " ही गोष्ट बापूगर्डीनें ता. २४ जाने. १९०६ च्या पत्रांत संस्कृत श्लोक रूपानें महाराजांस कळविली आहे. ती येणें प्रमाणें—

नमोस्तु पटनापुरीद्वमलजन्हुजातीरगात् । सदा सविनयो भवच्चरणपंकजाभ्यां विभो । अनन्यगतिकस्य मे तव पदैकदासस्य हे । अनाथकृतपालन प्रणतनाथ साष्टांगजः ॥ न किंचिदपि श्रूयते तव कथामृतं मंगलं । कृतास्ति वसतिः प्रभो विमल कुत्र न ज्ञायते । भवद्विषयिणी कथा श्रवणमंगळा क्वापि हि । कुतोपि हि न कर्णगा भवति यन्मनो दूयते ॥ २ ॥ तथा सदयता गुरो तव संदघ्रिपंकेरुहा- । नते मयि निदर्शय प्रणतवत्सल त्रासहन् ॥ मयाऽमितकृतागसा तव दया कथं प्रार्थ्यते । परंतु करुणाकरं प्रथित नाम ते शंसति ॥ ३ ॥ मया गतनिशि प्रभो विमल साधुवर्यो महान् । वदन् सदसि नाम तद्रुचिरज्ञानराजस्य वै । दिगंबर- तनुर्जटामुकुटमंडितः कांतिमान् । सशिष्य इति दृष्ट आकृतसुतत्त्ववादो मुनिः ॥ ४ ॥ सुदंड इव मे तनुर्भुवि निपत्य सो मानितः । निबद्धकरसंपुटो निकट उत्थितस्तत्र वै । तदेव गुरुनाम मद्वदनगं तदासीत्प्रभो । विलोक्य सुचिरं मुनिं सभयकंपमासीन्मनः ॥ ५ ॥ विलोक्य मुनिना तदा प्रचलितः सरोषं न माम् । सुमुष्टियुगलं गुरो मम सुपृष्ठमध्ये ददौ । तदीयपदपंकजानतसुकंधरोहं मुदा । मुखेन गुरुनाम तच्चिरतरं वदन्नासदं ॥ ६ ॥ नकिंचिदपि चिंतये भवतु सो मुनिः संयमी । परंतु गुरुनाम सो वदति ज्ञानराजस्य हे । सुनाम नतपावनं कलिमलापहं तारकम् । यदि श्रुतिपथागतं क्वचिदिहावसंभक्षकम् ॥ ७ ॥ अहो

दीनानाथप्रणतजनसंरक्षणपटो । तदीयत्रासाधप्रशमनकर प्रेमल विभो । इयं सप्तश्लोकी पदनिहितमूर्ध्ना नतधिया । कृता कृष्णेनैषा तव चरणरैव प्रभवतु ८

भवच्चरणारविंदमिलिंदायमानश्रीनिवासतनयो हरिदास इत्युपाख्यो कृष्णः ॥

वरील स्वप्नाचा उल्लेख महाराजांनीं बापूगडीस पाठविलेल्या एका पत्रांत केला आहे तो येणें प्रमाणें—''तूं पटण्याला असतांना श्रीज्ञानेश्वर नामस्मरण करीत मी स्वप्नांत तुला ग्रहण केलें आहे. त्याची आठवण कर. त्यावेळां माझा यतिवेष तोच तुझ्या अनुग्रहाला कारण आहे. या देहांत मी शूद्र असल्यामुळें तुम्हां ब्राह्मणांना उपदेश करूं शकत नाहीं. म्हणून त्यावेळीं जें तुला ज्ञानेश्वर नामस्मरण सांगितलें त्याचा सारखा जप सुरू कर; आणि त्या यतिवेषाचेंच ध्यान कर. स्वप्नांत गुरूचा उपदेश शंकराचार्यादि सत्य मानतात. तुकाराम महाराजही " मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश " असें म्हणतात. " स्वप्ने वै आचार्यवान् उपदिशति अस्य "

**अर्थ**—अधिकारी पुरुषाला आपल्या जातींत जर कोणी ब्रह्मवेत्ता न मिळाला तर कोणत्याही जातीचा पुरुष त्याला स्वप्नांत येऊन उपदेश करितो. त्या यतींनीं सांगितलेल्या मंत्राचा जप सुरू केला ह्मणजे पुढचा मार्ग मला ह्या शूद्रदेहानें सांगण्यास हरकत नाहीं. "

द्वि० यष्टि० उत्तरार्ध पृ० ४४

पुढें एके दिवशीं बापूगडीस स्वप्नांत रासदर्शन झालें. तोही प्रकार त्याच्या ता० ९।८।०६ च्या पत्रांत येणेंप्रमाणें लिहिला आहे—

" एके रात्रीं पहाटेच्या सुमारास सरासरी चार वाजतां कोणीएक मनुष्य येऊन म्हणाला चल. त्यानें हात धरून मला यमुनेच्या तीरावर नेलें, कसें नेलें हें

मला स्मरत नाहीं. तेथें एका दगडावर मला बसवून तो मनुष्य तेथून गेला. जातांनां सांगून गेला कीं मी आल्याशिवाय दगडावरून उठूं नको. तेथें जिकडे-तिकडे शांतताच शांतता पसरली होती. अनेक सुगंधी पुष्पांचीं झाडें फुललीं होतीं. आजूबाजूला दाट कुंजवन होतें. स्थल एकंदरींत फारच रम्य असून भरूम चंद्रप्रकाश पडला होता. तेथें एकाएकीं एक विलक्षण देखावा पाहिला. विजेची चमक होते तसा चक् असा एक प्रकाश पडला. व एक सुंदर श्रीकृष्णमूर्ति दिसूं लागली. वेष मोठा मनोहर होता. मस्तकावर मुकुट आहे. पीतांबर घट्ट बांधून घेतला आहे. गळ्यांत आपादलंबी वनमाला आहे, मोठा एक सुंदर सुवासिक पुष्पांचा हार गळ्यांत आहे, हातांत रत्नजडीत सुवर्णकंकणें आहेत, व सुवासिक पुष्पांचे गजरे आहेत, आंगांत घट्ट असा एक बागा होता असें वाटतें, कारण ठिकठिकाणीं गुलालाचे डाग दिसत होते. एक उपवस्त्र होतें तेंही कंबरेला गुंडाळलें होतें. पायांत कांहीं वाजणारे असे तोडे होते. मधून मधून त्यांचा सुमधुर ध्वनि येत असे. हातांत टिपऱ्या होत्या. कांहीं वेळानें दुसरी मूर्ति आली. नंतर तिसरी, नंतर चवथी, अशा अनेक मूर्ति व गोपीही आल्या. दोन दोन गोपी व मध्यें कृष्ण अशा व्यवस्थेनें रास खेळूं लागले. " राधे गोविंद " असा ध्वनी सुरू झाला. मध्यभागीं एक श्रीकृष्ण-मूर्ति उभी होती व दोन्ही हातांत मुरली घेऊन मुरलीवादन चाललें होतें. मधून मधून किंचित् पायांतील पैंजणांचाही आवाज येत होता. बासरीचा ध्वनी तर घुमत होताच. भोंवतालच्या स्त्रिया खूप आनंदांत नाचत होत्या. व कांहीं विवक्षित तालावर टिपऱ्या वाजवून त्या मुरलीच्याच स्वरांत सुस्वर गायन करीत होत्या. कित्येक स्त्रिया गुलाल फेंकीत होत्या. एकंदरींत त्यावेळेस अति आनंदी आनंद चालला होता. अशा वेळेस मी एकलाच तेथें होतों. त्या वेळेस आमचे महाराज येथें कोठें आहेत काय? अशी कल्पना आली व मी जास्त जास्त न्याहाळून पाहूं लागलों. मला सर्वांचीं तोंडें वगैरे सर्व स्पष्ट दिसलीं. त्यांत एकीकडे पाहून तर मला हे महाराजच असें वाटून अत्यानंद झाला. व अहाहा! असाच आनंद निरंतर असावा असें मला वाटावयास लागलें. इतक्यांत एक ओळखीचें गाणें निघालें व त्यासरशीं मोही तें म्हणावयास लागलों. व त्याची एक टुक होते न होते तोंच तें म्हणत म्हणत मी जागा झालों. "

वरील रासदर्शनाचें वर्णन बापूगडीनें स्वकृत पद्यांतही केलेलें आहे तें असें:— पद.

नंदनंदना । नंदना सुंदरास्या । विलससी मधूर मितहास्या ॥ध्रु०॥ यामुनी तटीं । तटीं करिसि केली । मनमोहन मुरलीशाली । मंद वाजवी । वाजवी मंजु पावा । वदति ऐकुनी गोपि धावा । गोपिकांगना । अंगना धरुनि लास्या । विलससी मधूर मित हास्या ॥ १ ॥ गोपिकावशा । वशा जणूं भवती । वेढिति गजराजासम भवती । मुखर चंद्रमा । चंद्रमा तव देवा । बघुनि पावति अमृत मेवा । राधिका प्रिया । प्रियासह टिपऱ्या । हरी खेळत घेउनि टिपऱ्या । वर्तुलाकृती । कृती कृष्णमूर्ती मोरमुकुटि सोज्वल कीर्ती । रंगमध्यगा । मध्यगा करिसि लास्या । विलससी०॥२ पीतवाससा । वाससा बद्धपरिकरा । गोपिजनमनरंजनकारा । गोपिका युगीं । युगीं मध्यवर्ती । तव साजिरी पृथङ्मूर्ती । झळकती हरी । हरी कांति भारी । भवति मागती टाळि नारी । हरी झडकरी । झडकरी करिति लास्या । विलससी मधूर० ॥ ३ ॥ राधिका मुकुंद । मुकुंद हरि गोविंद । राधिका मुकुंद हरि गोविंद । गाति सुंदरा । सुंदरा वदनिं आनंद । राधिका मुकुंद हरि गोविंद । पावती परा । परा, परानंद । सुरवंदित ब्रम्हानंद । गोपबालिका । बालिका करिति लास्या । विसलती० ॥ ४ ॥ करिति आनंद । आनंद नंदनंदी । इंदिवरलोचन सुखस्पंदी । वंद्यवंदिता । वंदिता मुनीवृंदीं । सारिशी नतजनभवनंदी । केलि खेळिशी । खेळशी गोपिवृंदीं । जयजय मुकुंद हरिधुंदी । गुलालांबुधी । अंबुधीं माजिं कन्या । नळपती जणुं सौदामिन्या । हरीभोंवती । भोंवती करिति लास्या । विलसती मधूर०॥५॥ रम्य कौमुदी । कौमुदी मध्यरात्रीं । युवतिजनप्रावृत नवगात्री । मूर्ति सांवळी । सांवळी रासरंगीं । रक्तछविपूत मुरलीसंगीं । मधुर वाहतो । वाहतो मंदवायू । शीत सुगंधित करितो कायू । सदा श्रीहरीच्या । हरिच्या करि दास्या । विलससी० ॥ ६ ॥ हृदयीं शोभती । शोभती कुसुममाळा । सुगंधित करि वनकुंजाला । वेणु वादनीं । वादनी पट् वदनीं । काहिमंजुल रव कुंजवनीं । रवें बालिका । बालिका मुग्ध होती । हरीचरणीं तल्लिन होती । विसरती तनू । तनू करिति लास्या । विलसती० ॥ ७ ॥ तेथ देखिली । देखिली एक बाला । वाटली परिचित नयनाला । सगुण सुंदरी । सुंदरी रूप भारी । नेसली पट भर जरतारी । प्रेमभरवशें । वशें श्रीरंगा- । वरि सुभगा टीका रंगा । कमललोचना । लोचना पंकजास्या । विलससी० ॥८॥ रंग लोटिला।

लोटिला रासरंगीं । सकल तन्मय तत्सुखसंगीं । पुष्प उधळिले । उधळिले पुष्प-भारी । अतिसुगंधित अंबर पारीं । गोकुलांगना । अंगना सकल अंगें । भेटती श्यामलतनु संगें । पावती सत्ता । सत्या सामरस्या ! विसलती० ॥ ९ ॥ धन्य-धन्य हा ! धन्य हा रासरंग । सुरमुनिवर मागति संग । धन्य बालिका । बालिका धन्य धन्य । तत्पदरज शिरसामान्य । धन्य सद्गुरू । सद्गुरुनाथ धन्य । ज्ञानेश्वर चरणाजन्य । शरण कृष्ण हा । कृष्णहा चरण दास्या ॥ विलसती मधुर मित हास्या । नंदनंदना० ॥ १० ॥

आतां, जिच्या वर्णनानें एकवेळ महाराजांनीं मंडळीला लुब्ध केलें होतें म्हणून उमरावती प्रकरणांत उल्लेख आलेला आहे त्या केशवपुरीच्या दर्शनाची बापूगडींची हकीकत ऐका:—

" नंतर कांहीं दिवसांनीं स्वप्नांत महाराज दिसले व म्हणाले तुला केशवपुरीला नेतो चल. असें म्हणून डोळे लावावयास सांगितलें. पुन्हां डोळे उघड म्हणाले डोळे उघडल्यावर आह्मी एका मैदानांत उभे आहों असें दिसलें. तेथेंच एक साधारण उंचशी जागा असून एक दगड लावला होता. तें एका विवराचें द्वार असावें. आम्ही त्या दगडाजवळ जातांच थोड्या वेळानें दगड दूर झाला, व विवर दिसलें. आंत फार आंधार होता. महाराज ह्मणाले ! डोळे लाव. पुन्हां कांहीं वेळानें डोळे उघडावयास सांगितलें. डोळे उघडतांच फार सुंदर तपोवनाचा देखावा दिसला. महाराज ह्मणाले हीच केशवपुरी होय. तेथें सुंदर फळांनीं लदबदलेले वृक्ष, उत्तम फुललेलीं पुष्पें, मधून मधून पाण्याचे विपुलझरे, पानाच्या सुरेखशा व व्यवस्थेशीर झोंपड्या, हरणाचे कळप, शुचिर्भूत व तेजस्वी अशा स्त्रिया व मुलें इ० देखावा पाहून मन प्रसन्न झालें."

शिक्षणदशेचा आरंभ—सारांश, " संसारदुःख विसरवी । भक्तिमार्ग विमल दावी । भजनक्रिया जो उपजवी । तो सत्वगुण " या समर्थ रामदासस्वामींच्या वचनाप्रमाणें मंडळीला सद्वासनांकुर उद्भवला खरा. परंतु ह्या अलौकिककथा म्हणजे केवळ महाराजांच्या

कृपेच्या मौजा होत्या. हा त्यांच्या आंगचा स्वाभाविक वस्तुप्रभाव होता. चंद्रकिरणांतून प्रकाश बाहेर पडणें हा जसा स्वभावधर्म आहे तसा हा महाराजांचा स्वभावधर्म होता. आईनें मुलाला कडेवर घेऊन कितीही सृष्ट चमत्कार दाखविले, वस्त्रालंकारांनीं सजविलें, त्याच्या बोबड्या शब्दाचे कवतिक करून त्याचे कोड पुरविले, नानाप्रकारच्या वस्तु देऊन त्याला खेळविलें, म्हणजे इतक्यानें तो मोठा कर्तासवरता झाला असें होत नाहीं. हें केवळ त्याच्या लालनदशेंतलें संगोपन होय. आपल्या पायावर उभें राहून चालूं लागणें, विद्या शिकून बुद्धीला सारासार विचार कळूं लागणें, स्वपराक्रमानें उदयास येणें, स्वकष्टार्जित द्रव्यानें वडिलांच्या संपत्तींत भर टाकणें, व त्या संपत्तीचा सद्व्यय करणें, आईबापांची आज्ञा पाळून उत्तम शील संपादन करणें व कुलीन म्हणवून जगांत मान्य होणें ह्या गोष्टी पुढेंच असतात.

तद्वत्, महाराजांच्या प्रेमदानानें लाभलेल्या आमच्या ह्या सद्वासनांकुराची वाढ होऊन निर्विकार सत्वगुणांत आमची बुद्धि स्थिर व्हावयाची होती. आमच्यांतलें कुवासनाबीज जळून जाऊन सद्वासना अंकुरित झाली होती, पण वासनाक्षय व्हावयाचा होता. हरिनामीं आम्हांस आवडी उपजली पण हरिनामाचें पथ्य सांभाळणें पुढेंच होतें. आमचें सुख घडोघडीं वाढूं लागलें होतें पण " यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते " हें आत्यंतिक सुख मिळविण्याचा यत्न आमचे हातून व्हावयाचा होता. " कंठी प्रेम दाटे नयनीं नीर लोटे। " हे अष्ट सात्विक भाव आम्हांस पन्नउ

होत होते पण " योगज्ञानादि विश्रामभूमिकेवरील अकृत्रिम भक्तांचें वर्म " आमच्या हातीं अझून यावयाचें होतें, आमच्या हृदयांत रामरूप प्रगट झालें होतें पण " आणिक दुसरें मज नाहीं आतां। नेमिलिया चित्ता पासुनीयां ॥ पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं। जागृति स्वपनीं पांडुरंग॥" ही अनन्य निष्ठा दृढ होऊन "सर्वभूतेषु यः पश्येत् भगवद्भावमात्मनः " किंवा " विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म " हें उत्तम भगद्भक्ताचें लक्षण आमच्या आंगीं बाणणें अवश्य होतें. सरते शेवटीं, महाराजांनीं यद्यपि आम्हांस तात्काळ आपणासारखें केलें होतें तथापि " आणिक सायास सोडुनी सकळ। होई ध्यानशीळ श्रीगुरूचा ॥ " ही त्यांची आज्ञा पाळून आम्हांस तदाकार व्हावयाचें होतें, " शिवो भूत्वा शिवं यजेत् " किंवा " मीं झालिया संभवे भक्ति माझी " असा अनुभव घेऊन ' आम्हांलागीं गुरुदेवें। आम्हींच केलों ' या दर्जेस आम्हांस पोंहचावयाचें होतें. ' पायां पडून वाचाऋण फेडण्यासाठीं ' गुरुकीर्तीचा झेंडा फडकवावयाचा होता, ' देवा ऐसा शिष्य देई। ब्रह्मज्ञानीं निपुण पाही ॥ माझें व्रत जो चालवी। त्यासी धावें त्वां पालवी ॥ ' ही सद्गुरुमाउलीची आज्ञा सफळ करून आम्हांस कुलदीपक व्हावयाचें होतें, व ' पुनाति भुवनत्रयम् ' हें कुलीनपणाचें उत्तम भूषण आंगीं लेवून व संतसमाजांत धन्यता मिळवून सद्गुरुमाउलीच्या डोळ्यांचें आम्हांस पारणें फेडावयाचें होतें.

ह्या भक्तिभाग्य प्रेमाचा पुण्य पुरुषार्थ आम्हांस मिळवून देण्याकरितां, केवळ निस्सीम मातृप्रेमानें आमच्या हिताकडे दृष्टि ठेवून

आमची बुद्धि वाढविण्याच्या हेतूनें " तैसें तुझें हित आघवें। जंव जंव का तुज फावे। तंव तंव आमुचें सुख दुणावे। ऐसें आहे " या न्यायानें महाराजांनीं आम्हांस जें बोधामृत पाजलें, आम्हांस जी स्वकर्तव्याची जाणीव उत्पन्न करून दिली, व आमचे अनंत अपराध पोटांत घालून परोपरीनें जी वैराग्याची शिकवण आम्हांस दिली, त्याचें दिग्दर्शन उमरावती प्रकरणांत येऊन गेलें आहे. आम्हांस शिकवण देतांना महाराजांचें अंतःकरण आमच्या उत्कर्षा-करितां कसें तिळतिळ तुटत होतें व त्यांच्या प्रत्येक शब्दांत केवढी कळकळ भरली होती याविषयीं त्यांच्या पत्रांतले पुढील उद्गार पहाः—

"इतकें लोटांगण घालून सांगितलें असतांहीं जर तुम्हां लोकांचें चित्त द्रवत नाहीं, तर मग तुमचें म्हणणें काय तें तरी सांगा. मला केवळ अन्नाकरितांच तुम्हांला असें सांगणें आहे असें नाहीं. कारण श्वान जसे उदर भारतात तसें आम्हीही भरतो. या उपरही तुम्हाला आपल्या स्वहिताची जर काळजी नसेल तर मी तरी काय आपला मेंदू काढून तुमच्या हातीं द्यावा हें समजत नाहीं.

मी तुमचें फुकट दास्य करण्यास तयार असूनही जर तुम्हांला करवून घेतां येत नसेल तर तुमचें प्रारब्ध; पण असें प्रारब्धावर बोल देऊन बसण्यापेक्षां श्वानसूकरादि जन्म झाले असते तर बरें होतें. कारण पाषाणादि प्राणी जड खरे परंतु स्वस्थांनीं क्षणभर तरी विश्रांति घेतात पण तुम्ही आम्ही तर दिवसां लोकांचे दास व रात्रीं स्त्रियांचे दास अशा रीतीनें विश्रांतीपासून च्युत झालों आहोंत. ××

तुम्ही आपलें हित करीत असतांना माझ्यावर कितीही जरी क्रोधाग्नीचे शब्द टाकले तरी ते मी शिरसावंद्य करीन, परंतु स्वहिताकडे लक्ष्य न देतां स्मशानवैराग्यप्रेमजलानें डोळे भरून वाहवा ! वाहवा ! म्हणणें मला पसंत नाहीं. × ×

जगाची स्थिति अशी आहे कीं, इंद्रजालानें केलेल्या गारुड्याच्या सर्पाला पाहून मोहराच्या मुठी सोडतात. पण रात्रीं दोरीवर भासणाऱ्या सर्पाची निवृत्ति करण्याकरितां जो दिवा घेऊन येतो त्याविषयीं खरें काय आहे याचा कोणीच विचार करीत नाहींत हा सिद्धांत. तसेंच संसारांतील मायेचा आश्रय करून संसारच खेळविणाऱ्या पुरुषांना संसारांतील जीव शरण जात असतात; पण स्वज्ञानानें संसारांतील त्रिविध दुःखांची निवृत्ति करणाऱ्या पुरुषाचें कोणी नांवही घेत नाहींत. हा प्रसंग मजवरच आहे असें नाहीं तर तुकाराम महाराजांनीं वैकुंठीं जातांना स्त्रियेस चलतेस काय म्हणून विचारलें असतां तिनें माझे उदरीं पांच महिन्याचा गर्भ असल्यामुळें मला रिकामपण नाहीं, आपण जावें असें स्पष्ट सांगितलें, व ते निघून गेल्यानंतर प्रस्ताव केला असें भक्तिलीलामृताच्या ४० व्या अध्यायांत लिहिलें आहे." पत्र. द्वि० उ०

याप्रमाणें महाराज आम्हांला कर्तव्यजागृति करून देऊं लागले. परंतु आतां लाडवून शिक्षण देण्याची आमची दशा राहिली नव्हती, म्हणून थोडें कडकरीतीनें वागवून महाराज आमच्या वृत्तींची परीक्षा पाहूं लागले. ह्या संबंधानें साधुबोधांत महाराज म्हणतातः—" सृष्टीचा नियम असा आहे कीं, बाल्यदशेंत लालन,

मध्यदशेंत सुधारणा, व उच्च दशेंत स्वातंत्र्य हें बहुधा मिळत असतें. पैकीं मध्यदशेंतच महात्म्यांना रागावण्याची पाळी येते. सर्वथा कडेवर बसणाऱ्या मुलाचे पाय ज्याप्रमाणें पक्के होत नाहींत त्याप्रमाणें मध्यदशेंतही लालन केलें असतां आत्मविश्वास शिष्यांना उत्पन्नच होत नाहीं. " " हिताचें वचन सांगणें जों कानीं । तों लाड करोनी कामा नये ॥" " वैद्य आणि गुरु । भीडखोर घातकरू ॥ " इ० महाराजांचीं काव्यवचनेंही याविषयीं प्रसिद्ध आहेत.

**शिक्षणाच्या दशा**—शिक्षणाच्या ह्या दशा एकंदर चार आहेत:—रक्षण किंवा लालन, शिक्षण किंवा पालन, रक्षणशिक्षण व स्वातंत्र्य.

मुलाला " लालयेत्पंच वर्षाणि " ही जशी मर्यादा आहे, तद्वत् शिष्याला प्रथम त्याच्याच तंत्रानें वागवून त्याचा सत्त्वगुण वाढवावा लागतो. कारण सत्वगुण वाढविल्याशिवाय त्याचे रजस्तम कमी होणार नाहींत. हें रक्षण होय. सत्वगुण वाढल्यावर रजस्तम नाहींसे करण्याकरितां शिक्षण द्यावें लागतें. नंतर त्याला बरोबरीनें वागवून कांहीं रक्षण व कांहीं शिक्षण द्यावें लागतें. कारण तो अगदीं शुद्ध सत्वगुणी झालेला नसतो, व पूर्ण झाल्यावर त्याला स्वातंत्र्य देऊन बरोबरीनें वागवावें लागतें.

**सत्वचतुष्टय**—प्रथम दशेंत, आमच्या बुद्धींत जो सत्वांकुर उगवला होता, त्याला मर्यादामार्गीय वळण देऊन ज्ञानभक्तिजनक करण्याकरितां, सत्वगुणाच्या चारही धर्मांची समान वाढ होणें फार अगत्याचें होतें. ते सत्वाचे चार धर्म म्हणजे धर्म, ज्ञान,

वैराग्य व ऐश्वर्य हे होत. त्यांचीं लक्षणें महाराजांनीं सांगितलीं आहेत तीं अशीं:—

"धर्मोऽयं द्विविधः प्रोक्तो बाह्याभ्यंतरभेदतः ।
प्रवृत्तिसंज्ञको बाह्योंतर्विनिवृत्तिलक्षणः ॥

धर्म दोन प्रकारचा. बाह्य व आभ्यंतर. पैकीं प्रवृत्तिलक्षण बाह्य. व निवृत्तिलक्षण अभ्यंतर म्हणावा. प्रवृत्ति म्हणजे वृत्तीची बाहेर धांव व निवृत्ति म्हणजे तिची आत्म्याचे ठिकाणीं शांति.

प्रवृत्तिसंज्ञके धर्मे फलमभ्युदयो मतः ।
निवृत्तिसंज्ञके धर्मे फलं निःश्रेयसं मतम् ॥

अभ्युदय म्हणजे सांसारिक सुख व स्वर्ग इत्यादि विषय सुखाचा परमावधी प्रवृत्तिसंज्ञक धर्माचें फळ असून; तिन्ही दुःखांची निवृत्ति व परमानंदाची प्राप्ति असा जो मोक्ष तो निवृत्तिसंज्ञक धर्माचें फळ आहे.

तथा ज्ञानं द्विधा ज्ञेयं बाह्याभ्यंतरभेदतः ।
धर्मज्ञानं भवेद्बाह्यं विवेकज्ञानमांतरं ॥

तसें ज्ञानहि दोन प्रकारचें आहे. बाह्य आणि आंतर. वेद, छंद, ज्योतिष, व्याकरण, निघंट, निरुक्त, शिक्षा कल्प, पुराण, न्याय, मीमांसा, धर्मशास्त्र, इत्यादि १४ विद्या व ६४ कळा बाह्य ज्ञान असून देहाहून आत्मा निराळा आहे व मायाब्रह्मानें विवेकज्ञान अंतर समजावें.

( या ठिकाणीं जडचेतन ज्ञानाचा अंतर्भाव सत्वगुणांत केल्यामुळें व सत्वगुण नाश्य असल्यामुळें ज्ञानाचे कार्य जो मोक्ष तोहि नाश्य होऊन जीवास पुनर्बंधापत्ति येईल, अशी महाराजांनीं उत्थाप्य शंका घेऊन बंध व मोक्ष हे दोन्ही सांख्य दृष्टीनें सत्य आहेत म्हणून या शंकेनें सांख्य सिद्धांताचीच हानि होते, पण वेदान्तसिद्धांत अबाधित राहतो याविषयीं विवेचन केलें आहे. )

वैराग्यं च द्विधा प्रोक्तं बाह्यमाभ्यंतरं तथा ।
दृष्टानुश्रविकेभ्यः स्याद्विरागो दोषदर्शनात् ॥

वैराग्यही दोन प्रकारचें आहे. बाह्य व अंतर. पैकीं पांचाही इंद्रियांना

गोचर असणाऱ्या विषयांच्या ठिकाणीं दोष पाहून व वेदपुराणादिकांत ऐकलेल्या स्वर्गादि परलोकांतील रंभानंदनवनादि विषयांचे ठायीं दोष पाहून मनाची पिछेहाट झाल्यानें जें वैराग्य उत्पन्न होतें होतें तें बाह्य समजावें.

बाह्यं तदिति संप्रोक्तं पुनराभ्यंतरं श्रृणु ।
सर्वं स्वप्नसमं व्यर्थं प्रधानादिकमुच्यते ॥

आतां अंतर ऐक. प्रकृती देखील स्वप्नेंद्रजालासारखी मिथ्या आहे असें समजणें हें अंतर वैराग्य होय. हें अंतर वैराग्य खरोखर वेदान्तांतच होण्यासारखें आहे. सांख्यांत होण्यासारखें नाहीं. कारण सांख्य प्रकृतीला सत्य समजत असतात. तथापि हें वेदांतांतील मुख्य वैराग्य गौडपादाचार्यांनीं सांख्य कारिकेच्या भाष्यांत घुसडून जबरदस्तीनेंच सांख्याला वेदान्तावर ओढलें आहे. पण हें आमच्या उत्तम पथ्यावर पडलें.

स्यादैश्वर्यमपि द्वेधा बाह्यमाभ्यंतरं पुनः ।
अणिमादि भवेद्बाह्यमूहाद्याभ्यंतरं स्मृतं ॥

" ऐश्वर्यही दोन प्रकारचें आहे. बाह्य आणि अंतर. पैकीं अणिमादि बाह्य. व ऊहादि अंतर समजावें. "

आतां, अणिमादि ( अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशत्व, वशित्व आणि कामावसायित्व ) बाह्य ऐश्वर्य साधकाला विघ्नरूप आहे, म्हणून त्यानें अंतर ऐश्वर्याविषयींच यत्न करावा. याविषयीं महाराज म्हणतात:— " हें नवही प्रकारचें ऐश्वर्य ज्ञान व वैराग्यापासून मिळणाऱ्या परमानंदाच्या दृष्टीनें व्यर्थच आहे, असें तातांनीं हरिपाठांत आपलें मत स्पष्ट सांगितलें आहे. "समाधी हरीची समसुखेंवीण । न साधेल जाण द्वैतबुद्धी ॥ ".

योगशास्त्राचे निर्माते भगवान् पतंजली ह्यांनीं देखील असेंच सुचविलें आहे. ह्या सिद्धी चुकलेल्या करितांच असून समाधिमध्यें ह्या केवळ विघ्नरूप आहेत. असें योगसूत्र आहे. हें पतंजलीचें म्हणणें बाह्यैश्वर्याविषयींच आहे. कारण आंतर ऐश्वर्यांत तर तिन्ही दुःखाच्या नाशरूप सिद्धींचें कथन असून दुःखत्रयनाशाला मोक्ष म्हटलें आहे. मग अंतर ऐश्वर्याविषयीं पतंजलीनें म्हणणें लागू केलें तर मोक्षहि समाधिमध्यें विघ्नरूप आहे असें म्हणावें लागेल. व तें सर्व मोक्षवादी आस्तिकांना अनिष्ट आहे. आतां अंतर ऐश्वर्य सांगतों:—

आर्या—ऊहः शब्दोऽध्ययनं दुःख विघातास्त्रयः सुहृत्प्राप्तिः ।
दानं चेत्यष्टविधमैश्वर्यं प्रोक्तमांतरं सद्भिः ॥

ऊह म्हणजे आपल्या तर्कानेंच कोणाची अपेक्षा न करितांना ज्ञान मिळवून मुक्त होणें. × × शब्द म्हणजे थोड्याशा शब्दावरून प्रबल स्फूर्तीच्या योगानें सर्व ज्ञान होणें ही दुसरी सिद्धि होय. गुरुमुखानें शास्त्राध्ययन करून सर्व ज्ञान होणें ही तिसरी व जीवन्मुक्तिदशेंत आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक हीं दुःखें प्रारब्धानें प्राप्त झालीं असतां त्यांचा अभिभव करणें ह्या तीन सिद्धि मिळून सहा झाल्या कांहीं खटपट न करितां एखादा महात्मा आपल्यावर प्रसन्न होऊन मित्रपणानें सर्व ज्ञान करून देतो ही सातवी सुहृत्प्राप्ति सिद्धि; व जानश्रुती राजानें रैक्व मुनीला कन्या देऊन ज्याप्रमाणें ब्रह्मज्ञान करून घेतलें अशी छांदोग्य उपनिषदांत गाथा आहे त्याप्रमाणें यथाशक्ति कोणत्याहि पदार्थाचें दान करून एखाद्या महात्म्या जवळून जें ज्ञान मिळतें ती आठवी सिद्धि होय. या आठ सिद्धींना महात्म्यांनीं आंतर ऐश्वर्य म्हटलें आहे."

पत्र—सप्तन यष्टि ६० ६७—७३

याप्रमाणें सत्वाच्या चारही आंतर धर्मांची समाधान करण्या विषयीं साधकानें काळजी न घेतली तर बुद्धींत उदय पावलेला सत्वगुणाचा अंकुर सुकून जाऊन साधक कसा खालीं पडतो या विषयीं महाराजांनीं सांख्यदृष्टीनें मीमांसा केलेली आहे ती अशी:—

"कोणतीहि गोष्ट कैवल्यावांचून असल्यास ती आपल्या अतिशय स्थितींत विपरीत परिणामिनी होत असते; हा गुणत्रयात्मक एकंदर मायाकार्याचा सिद्धांत आहे. चांगले, वाईट व मध्यम हे तिन्ही गुण परस्परजनक आहेत, हें सांख्यशास्त्राचें म्हणणें आहे. त्याविषयीं ईश्वरकृष्णाची सांख्यकारिका व त्यावरील गौडपादभाष्य पहावें. तात्पर्य, सांख्याच्या म्हणण्याप्रमाणें, सत्वापासून देखील प्रसंगविशेषीं रज किंवा तम उत्पन्न होतो. प्रीति हें सत्वगुणाचें लक्षण आहे, राग हें रजोगुणाचें लक्षण आहे, आणि विषाद हें तमोगुणाचें लक्षण आहे. भगवद्गीता व सांख्यकारिका हीं दोन्ही मिळून वाचल्यास हें माझें म्हणणें अधिक पटेल. या तिन्ही गुणांचें कांहीं धर्मांत साधर्म्य असून कांहीं धर्मांत

अत्यंत वैधर्म्य आहे. मृगजलाचें दिसण्यामध्यें जलत्व व झळ लागण्यामध्यें उष्णत्व जसें अतिशय प्रसिद्ध आहे, तसेंच मृगजलाप्रमाणें मिथ्या मायेच्या गुणाविषयींही प्रसिद्ध आहे. म्हणून सत्वगुण वाढवीत असतां त्याचा एखादाच धर्म विशेष वाढून, बाकीचे सात्विक धर्म जर लोप पावतील तर दुसऱ्या एखाद्या गुणाशीं त्याचें साधर्म्य होऊन, लवकरच, वाढलेल्या सात्विक धर्मांतून त्या सधर्मदान् असात्विक गुणाची उत्पत्ति होते. याला प्रीतीचेंच उदाहरण पुरे आहे. प्रीति हा सत्वगुणाचा धर्म सांख्यकारिकेंत सांगितलेला असून त्याबरोबर इतर सात्विक धर्म नसल्यास तीच प्रीति रागात्मक होते. तूप मधुर आहे तरी मध घालून विष होतें, हें आयुर्वेद प्रसिद्ध आहे. अशी ही प्रीति रागात्मक झाल्या-मुळें, राजस स्वभावामुळें, तिच्यांत कापट्य उत्पन्न होतें; किंवा मनोरथ पूर्ण न झाल्यास, तामस स्वभावामुळें विषाद उत्पन्न होतो. म्हणून कोणतीही सात्विक वृत्ति कैवल्यपर्यंतसाधनेनी होईल, इतकीच वाढली पाहिजे. याविषयीं नाथ आपल्या एकादशस्कंधाच्या तेराव्या अध्यायाच्या टीकेंत म्हणतातः—"सर्प चावला होय ज्यासी : विष खाल्ल्या उतार त्यासी । तें विष खातां येरे दिवशीं । आत्मघातासी वर्धक॥ तैसें रजतम लोपीं सत्व वाढे ! वाढलें सत्व बाधक कुडें । तीही बाधा निज निवाडें । ऐक तुजप्रती सांगेन ॥ " × सप्तम यष्टि पृ. १२६ —

येथपर्यंत सत्त्वगुण वाढविण्याची अवधी व शुद्ध धर्मांचें स्वरूप सांगून तो शुद्ध धर्म सद्गुरुजवळच शिकला पाहिजे म्हणजे सत्संगाचें खरें फळ मिळतें असें महाराज सांगतातः—

" परंतु कैवल्यापुरतीच सात्विक वृत्ति कशी वाढवावी, हें बहु-प्रासंगिक असल्यामुळें, गुरूवांचून केवळ शास्त्राच्या हातांत नाहीं. शास्त्र प्रमाणप्रवीण आहे; प्रक्रियाप्रवीण नाहीं. ह्या गोष्टीच्या अज्ञानादि अनेक कारणांमुळें, प्रेम करणाऱ्यापासून देखील, बहु-शंकापूर्वक ताप होतो व तो कोण्याही निःस्पृह महात्म्याला होईल. असें माझें मत आहे. धर्म, प्रेम, व त्यांतील गुर्वाज्ञापूर्वक व्यवस्था

या तीन गोष्टींच्या समुच्चयानेंच साधक पुरुषाला आपला मार्ग स्पष्ट करूं शकतो. एखादें न्यून असल्यास सगळीकडे अंधारच होऊन रहातो. ” सप्तम यष्टि. पृ. १२२–१२३

**धर्म, प्रेम व गुर्वाज्ञापालनः**—हा धर्म, प्रेम व गुर्वाज्ञापालन-रूपी तीन गोष्टींचा जो समुच्चय महाराजांनीं सांगितला तो सत्वो-त्कर्षाचा मूळ पाया असून मधुराद्वैताचा आद्य सोपान आहे. ह्या तीन गोष्टींचा समुच्चय महाराजांच्या शिक्षणपद्धतीचें आद्य सूत्र होय हें यापूर्वी सांगितलेंच आहे. व त्यांच्या वाङ्मयांत या तत्वाचें विवेचन वारंवार पहावयास मिळतें. तदनुसार धर्म, प्रेम व गुर्वाज्ञापालन यांचें स्वरूप थोडक्यांत काय आहे तें आतां आपण पाहूं:—

**धर्म म्हणजे गुरुशुश्रूषणः**— “ ज्या योगें आपली सत्वसंपत्ति वाढेल, ज्याचें फळ ब्रह्मज्ञान होईल व परमेश्वराचे ठिकाणीं रति उत्पन्न होईल तो धर्म ” असें लक्षण महाराजांनीं संप्रदायसुरतरूंत सांगि-तलें आहे. ( पहा १३–१४४ ) व आपल्या ‘ स्वमतनिर्णयांत ’ धर्म म्हणजे ‘ सत्वशुद्धिर्भवेद्येनान्यगुणद्ववातिनी । स हि धर्मो न चान्यः स्यादिति स्वमतनिर्णयः ॥ ’ असें लक्षण केलें आहे. व सत्वशुद्धीचा मार्ग गुरुवांचून कळत नाहीं याविषयीं त्याचें स्पष्टीकरण वर आलेंच आहे. संताच्या मुखानेंच धर्माचें यथार्थ स्वरूप कळत असतें याविषयीं ‘ आचार्यवान् पुरुषो वेद ’ ही श्रुति प्रमाण आहे. ‘ जयाचेनि बोलें धर्म जिये । ’ ‘ गुरुवाक्या वांचुनी शास्त्र न शिवे ’ इ० वचनें ज्ञानेश्वरींत आहेत त्यांचाही अभिप्राय हाच आहे.

योगवासिष्ठ निर्वाणप्रकरण सर्ग १२२ यांत म्हटलें आहे:— 'न यज्ञतीर्थैर्न तपःप्रदानैरासाद्यते तत्परमं पवित्रं । आसाद्यते क्षीणभवामयानां भक्त्या सतामात्मविदां यदङ्ग ॥'

भक्तिशास्त्राविषयीं प्रमाणशिरोमणी अशा श्रीमद्भागवतांत पुढील मार्मिक वचन आहे:—

"स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे । अहैतुक्यप्रतिहता ययात्मा संप्रसीदति ॥" स्कंध १ अ० २ श्लो० ६ या ठिकाणीं "ज्ञानी-त्वात्मैव मे मतम्" या भगवद्गीतावचनानें आत्मा म्हणजे ब्रह्मवेत्ता ज्ञानीपुरुष असा अर्थ घेतला तर 'यथा देवे तथा गुरौ' या श्वेता-श्वतर श्रुतीचा अभिप्राय उत्तम प्रकारें व्यक्त होतो.

गुरुशुश्रूषण हाच सर्वांत श्रेष्ठ धर्म असून श्रीगुरूच्या प्रसादानें दिव्य व अजरामर जन्म (दीक्षाजन्म) प्राप्त होतो याविषयीं महाभारताच्या शांतिपर्वांतील पुढील अवतरण चिंतनीय आहे:—

"धर्मामध्यें सर्वांत श्रेष्ठ व अवश्य कर्तव्य कोणतें" असें युधि-ष्ठिरानें विचारलें असतां भीष्म सांगतात:— आईबाप व गुरु यांची पूजा सर्वश्रेष्ठ आहे. त्याकडे लक्ष दिल्यानें मनुष्याचा मोठा लौकिक होऊन त्याला उत्तम लोक मिळतात. ते जे सांगतील तें धर्माला धरून असो किंवा धर्माविरुद्ध असो तें करावें. त्यांच्या सांगण्याच्या विरुद्ध कांहीं करूं नये. ते सांगतील तो धर्म समजावा. ××× माझ्या मतानें बापापेक्षां किंवा आईपेक्षां गुरु श्रेष्ठ आहेत. हे दोघे आईबाप केवळ शरीर देणारे असून गुरूंच्या प्रसादानें जो जन्म मिळतो तो दिव्य असून अजरामर आहे. ×× जो खरें शिक्षण

देऊन दिव्य ज्ञान देतो तो गुरु, आई व बाप या दोघांसमान समजला पाहिजे. जे लोक गुरूपासून विद्या शिकून त्यांना मनानें व कृतीनें मान देत नाहींत त्यांना भ्रूणहत्येचें पाप लागून त्यांच्याहून दुसरा पापी कोणी नाहीं. गुरु शिष्यावर ज्याप्रमाणें भावना ठेवतात त्याचप्रमाणें शिष्यानें गुरूचा बहुमान ठेवावा. आपल्याला मिळेल तें त्यांनां देऊन नंतर त्याचा उपभोग घ्यावा. ज्याच्या योगानें आपण पितरांना संतुष्ट करतों त्यान प्रजापति संतुष्ट होतो. ज्याच्या योगानें आपण आईला संतुष्ट करतों त्यानें पृथ्वि संतुष्ट होते. व ज्यानें गुरूला संतुष्ट करतों त्यानें ब्रह्म संतुष्ट होतें. **ह्मणून आईपेक्षां किंवा बापापेक्षां गुरु पूज्य आहेत.** गुरूचा सत्कार केला असतां ऋषी, देव, पितर, सर्व संतुष्ट होतात. कोणच्याहि कारणानें गुरूस तुच्छ करूं नये. ”

महाभारत----शांतिपर्व---- अ० १०८

वरील महाभारतवचनाचें तारतम्य महाराजांनीं साधुबोधांत मोठें मार्मिक सांगितलें आहे. तें येणे प्रमाणें:—

प्रश्न—महाभारतांत पित्यापेक्षां आई व आईपेक्षां गुरु श्रेष्ठ कां सांगितला आहे तें मला चांगलें समजलें नाहीं.

उत्तर--पिता जन्मदाता असल्यामुळें श्रेष्ठ आहे. आई जन्म देणारी असून शिवाय मुलाकरितां मृत्युसमान गर्भ दुःख सहन करिते. म्हणून ती पित्यापेक्षां श्रेष्ठ होय. आतां आईबापाचा केवळ जन्मसंबंधच आहे, म्हणून प्रसंगीं त्यांच्या हातून पुत्राच्या सद्धर्म प्रवृत्तीलाहि प्रतिबंध होण्याचा संभव आहे. व तसें मी पाहिलेंहि आहे. केवळ जन्म दिल्यामुळेंच पुत्रावर आपला हक्क आहे असें आईबाप समजत असतात. पण तसा तो हक्क पशुलाहि आहे. श्रीगुरूची गोष्ट तशी नाहीं. कारण त्यांना सद्विद्येमुळेंच आपला शिष्यावर हक्क आहे असें वाटत असतें. आपण जर

...शास्त्राच्या विरुद्ध सांगितलेंच तर आपला गुरुपणाचा हक्क नाहींसा होईल हें तो जाणून असतो. म्हणून त्याच्या हातून शिष्याच्या सद्धर्मप्रवृत्तीला प्रतिबंध होणें शक्य नाहीं. शिवाय आईबापांचा संबंध इहलोकापुरताच असून श्रीगुरूचा संबंध परलोकाचीहि तयारी करून देतो. मागें तीन वर्णांना आईपेक्षां बाप श्रेष्ठ असें जें मी सांगितलें तें तरी गायत्र्युपदेशक गुरुत्वास्तवच होय. आतां फसवे गुरु या नियमास अपवाद आहेत, ते गुरू अशा व्याख्येसच पात्र होत नाहींत. शिवाय द्वितीयसंबंधाच्या मागें लागून मुलांना फसविणारे आईबाप मी पाहिले आहेत. अशा प्रकारचे आईबाप व गुरू विचार करण्यायोग्यच नाहींत. मातापिता व आचार्य हे तिन्ही देव आहेत असें श्रुतींत सांगितलें आहे. धर्मशास्त्रांत जेथें या तिघांत विरोध असेल तेथें गुरुवाक्यच प्रबल समजावें असा महाभारताचा स्पष्ट आशय आहे. अन्यथा गृहस्थाला पितृसेवा केल्यावांचून वैराग्य झालें तर ब्रह्मचर्यातून संन्यासच घेतां येणार नाहीं. व त्यामुळें ज्या दिवशीं वैराग्य झालें त्याच दिवशीं ब्रह्मचर्यातून संन्यास घ्यावा इत्यादि श्रुतींचा विरोध येईल. याप्रमाणें परमार्थिक व धर्मज्ञान सांगणाऱ्या विषयीं झालें. केवळ ऐहिक विद्या सांगणाऱ्या गुरूपेक्षां मात्र आईबापच श्रेष्ठ आहेत. कारण इहलोकापैकीं पुरुषांना आईबापांचा व स्त्रियांना पतीचा जितका संबंध आहे. तितका अन्याचा नाहीं. पण त्यांतहि सद्गुणलाभ असेल तर ऐहिक गुरू आईबापापेक्षां श्रेष्ठ होईल. याप्रमाणें महाभारताचा अभिप्राय मी तुला सांगितला. पण कांहीं मूर्ख आम्ही कमांऊन ठेविलेल्या धनावरच मुलांना गुरू वगैरनां पोसतां येतें असें म्हणतात तें चुकीचें आहे. कारण वैराग्यशील दरिद्री महात्म्याला गुरू मिळतात आणि वैराग्यरहित कुबेरालाहि गुरुपासून कांहीं फायदा होत नाहीं.

प्रेम म्हणजे अत्यंत तदनुकूलता. किंवा सर्वथा श्रीगुरूच्या स्वाधीन होणें. गुरुसेवेप्रीत्यर्थ स्वार्थत्यागाची आवडी हें प्रेमाचें स्वरूप होय. ही आवडी जितकी जितकी अधिक असेल तितक्या तितक्या मानानें तें प्रेम शुद्ध समजलें जातें. शेवटीं सर्वस्व त्यागापर्यंत जेव्हां तिची मजल जाते तेव्हां अत्यंत तदनुकूलता प्राप्त होते. गुरूनें आपल्या इच्छेनुसार वागावें असें वाटणें ही प्रेमवृत्ति नसून कामना

होय. ती आपल्यास प्रेमांतून खालीं ओढून अधोगतीस नेते. प्रेमाचा विषय तर उलटा प्रेममय वाटत असतो. व त्याच्या सेवेला —त्याच्या उपभोगाला—आपण पात्र व्हावें, त्याच्यावरून आपल्या सर्वस्वाची ओवाळणी करावी, अशी वृत्ति उत्पन्न करीत असतो. महाराज साधुबोधांत म्हणतातः—" भक्तीवांचून सत्यप्रेम उत्पन्नच होत नाहीं. आणि भक्तींत उत्पन्न झाला म्हणजे प्रियाच्या लहान सहान गोष्टी सुद्धां कौतुकार्ह वाटतात. एक गोपी आपला अनुभव यशोदेला सांगते हें तुकाराम महाराजांनीं वर्णन केलें आहे. " अवचित माझ्या डोळ्यांत गेला कण। फुंकुन काढितां वाटल समाधान। बाई हा कानडा सहाणा नारायण। चुंबन घेतां वाटल समाधान वो ॥" यामुळेंच प्रियकराला घडीघडी त्रास देणें त्यांच्या कडून होत नाहीं. आम्हांकरितां प्रिय आहे असें वाटणें कांहीं भक्ति नव्हे, तर प्रियाकरितांच आम्ही आहों असें वाटणेंच भक्ति होय. पण प्रेमाला गुरुशास्त्राचा आधार नसला तर कलह उत्पन्न होतो इकडे मात्र लक्ष दिलें पाहिजे. साधकांचा प्रेम तर सत्व-वृद्धिपर्यंतच राहूं शकतो हें मी एका पत्रांत लिहिलेंहि आहे. "

साधुबोध पृ० ९८

प्रेमनिकुंजांत महाराज म्हणतातः—" प्रेमीं आपुलेपणा उरे। तरी द्वैत कल्पांतीं न पुरे। म्हणवोनि प्रेमभरें। ऐसें होवावें॥ स्वामीचिया इच्छा लीला घडो। कां मोक्ष अथवा बंध पडो। परी स्वामीवरी सुरवाडो। प्रेम अत्यंत ॥" प्रेमनिकुंज—पंचमवल्ली.

आज्ञापालन म्हणजे अत्यंत वचनपरतंत्रता किंवा सद्गुरुवचनीं दृढ

विश्वास. "विश्वास ठेवीन सद्गुरुवचनीं। लाभ अथवा हानी देव जाणे ॥" हें तुकाराम महाराजांचें वचन याविषयीं प्रसिद्धच आहे. खऱ्या प्रेमाचा जिव्हाळा ज्याच्या अंतःकरणांत आहे त्याच्या हातून गुरु आज्ञेचें उल्लंघन संभवतच नाहीं. याविषयीं प्रेमनिकुंजांत महाराज म्हणतातः— "आज्ञा उल्लंघन करणें उपासनेचें सूचक नाहीं. कारण सर्वथा उपास्याधीन होणें हें प्रेमाचें लक्षण आहे. व सर्वथा आधीन झाल्यावर आज्ञा उल्लंघन करण्याइतकी स्वतंत्रता संभवतच नाहीं."

प्रेमनिकुंज– पृ० ५६

अलौकिक व्याख्यानमालेंतहि हाच अभिप्राय स्पष्ट केला आहे. तें वचन असें:— "जसजसा प्रेम अधिक वाढतो तसतशा कठोर वृत्ती मुरून नम्र भाषणादि वृत्ती अधिक वाढतात. प्रेमाच्या भरांत मग्न होत असतां देहाला सोडून मनुष्य हळुहळु सूक्ष्म आकाशांत प्रवेश करीत असतो. तेव्हां कांहीं कठोर कारणानें चित्तवृत्तीला धक्का बसला, तर मनोवाहिनी नाडींचा छेद होऊन मृत्यु होण्याचाहि संभव असतो. महाभारतांत व आल्काट साहेबांनीं केलेल्या ग्रंथांत अशीं पुष्कळ उदाहरणें दिलीं आहेत."

अ० व्याख्यानमाला. पृ० ४५

सारांश, आज्ञापालनानेंच प्रेमाचें रक्षण होऊन कठोर वृत्ती मृदु होत जातात. म्हणूनच प्रणिपातादि प्रपत्तित्रयाचा उपदेश श्रुतींत व भगवद्गीतेंत केलेला आहे. तुकाराम महाराज म्हणतातः—

लोहो परिसासि रूसलें। सोनेपणासि मुकलें ॥ १ ॥ येथें कोणाचें काय गेलें। ज्याचें त्यानें अनहित केलें ॥ गंगा आली आळशावरी।

आळशी देखोनि पळे दुरी ॥ गांवाखालील ओहळ । रागें गंगेसी न मिळे ॥ ४ ॥ तुकाम्हणे होउनी दास । गुरुसी न भजती शिष्य ॥ ५ ॥

**वृत्तिनिरीक्षण**—हा जो धर्मप्रेमादि त्रिपुटीचा समुच्चय सांगितला त्याच्या अभावीं आमचें महाराजांवरील प्रेम रागात्मक व विषादात्मक होऊन आमची मर्यादामार्गीय भक्ति—आज्ञापालनरूपी सेवा—कशी दुरावली त्यांच्या असत्याभासादि कांहीं बाह्य आचरणाचेंच आम्ही कसें अनुकरण केलें, सलगीचा अतिरेक, मानीपणा, इ० विघातक वृत्ती आमच्यावर कशा पगडा बसवूं लागल्या, महाराजांच्या हेतूचा विपर्यास करून आम्ही आपले विकार त्यांच्यावर कसे लादूं लागलों, महाराजांनीं आमच्या स्वाधीन होऊन रागावें, त्यांची प्रकृति सुधारण्याकरितां आम्ही म्हणतों तसें त्यांनीं ऐकावें, महाराजांना त्रास किंवा दुःख होऊं नये, त्यांनीं आमच्या वृत्तीची परीक्षा पाहूं नये, आज्ञापालनांत अथवा योग्य वर्तन करण्यांत आम्ही चुकलों तर त्यांनीं आमच्यावर रागाऊं नये, इ० देहबुद्धिविषयक मोहमयी वृत्ती बळाऊन महाराजांवरचा आमचा धार्मिक प्रेम कसा कमी झाला. शूद्रमंडळी व महाराजांची स्वज्ञातीची मंडळी त्यांच्याशीं कशी प्रतारणा करूं लागली, व अशा प्रकारचा प्रेम उपदेशसाध्य होत नाहीं व तो मनांत सद्भक्तिबीजांकुर रुजूं देत नाहीं म्हणून तो प्रेम मोक्षपर्यवसायी होण्याकरितां आज्ञापालनपूर्वक श्रवणच केलें पाहिजे ही गोष्ट आमच्या मनावर उत्तम बिंबवून देण्याकरितां महाराजांनीं जी आमची कानउघाडणी केली, तो प्रकार अमरावती प्रकरणांत शके १८३४ त 'बापुगडीला

उपदेश ' या सदराखालीं आलेला आहे. तो महाराजांचा साच, रसाळ व अमृतकल्लोळासारखा सुस्वादु उपदेश वारंवार वाचून पहावा म्हणजे ' माउलीचें चित्त । वाहे बाळकाचें हित । ' या वचनाची उत्तम साक्ष पटते.

धर्मरहित प्रेमानें अवज्ञा आणि कामना हे प्रमाद बळावून "प्रेम करणाऱ्यापासून देखील बहुशंकापूर्वक ताप होतो व तो कोण्याहि निःस्पृह महात्म्याला होईल" असें जें महाराजांनीं म्हटलें आहे, त्याचा खुलासा त्यांनीं त्याच पत्रांत ( सप्तम यष्टि पृ० १२३ ) लिहून ठेवला आहे, पण तो भाग छापण्यांत आलेला नाहीं. म्हणून तो मूळ अस्सल पत्रावरून येथें घेतोः—

महाराज म्हणतातः—"आतां तो ताप कसा होतो हें लिहितोंः—सध्यां ज्या मंडळीपासून मला उपराम होतो त्या मंडळीचे दोन वर्ग करितां येतील, खरोखर त्रास देणारी मंडळी व प्रीतीनें त्रास देणारी मंडळी. * * वगैरे पहिल्या दर्ज्यांत येत असून बापू, नाना, दुसऱ्या दर्ज्यांत येतात. पहिल्या दर्ज्यांतील मंडळी सुधारल्यास आपली म्हणण्यास कोण तयार नसेल ? म्हणून तिच्या विषयीं विशेष लिहिण्यांत अर्थ नाहीं. परंतु दुसऱ्या दर्ज्याच्या मंडळीविषयीं मला आश्चर्य वाटतें. व तें वाटणें स्वाभाविकहि आहे. ह्या दर्ज्यांत माझ्याकरितां प्राण पटकणारी जरी मंडळी आहेत, तरी धर्मापुढें मला प्रेमाची किंमत नसल्यामुळें ह्या प्रिय मंडळीविषयींही अनेक शंका येऊन उपराम होतो. तो

१ अशा प्रेमाचा निषेध महाराजांनीं सं० सुरतरूंतहि केलेला आहे.

कसा होतो हें आतां लिहितों:—आतां किंवा शंभर वर्षांनीं तरी मृत्यु निश्चित आहे असें माझें मत आहे. परंतु प्रेम करणारी मंडळीच मला प्रकृति सुधारण्याकरितां मांस देतील कीं काय अशी तातशपथपूर्वक खरोखरच ( मला ) शंका आहे. रोग्याशीं खोटें बोलून रोग्याला मांस द्यावें असें चरकादि ग्रंथांत लिहिलें आहे. व ते ग्रंथ मंडळीनें वाचले आहेत. × × कांहीं मंडळी आमची इच्छा असेल तें औषध तुम्ही घेतलें पाहिजे असें म्हणते व त्यांत मला खात्रीनेंच मांसाची शंका येते. कारण खोटें बोलून मांस द्यावें ही वैद्यशास्त्राची आज्ञा मंडळीस माहित आहे. × × प्रीतीचा रागरूप परिणाम झाल्यावर असें कपट प्रेम उत्पन्न होणें साहजिक आहे. बापूची स्थिति सध्यां महाराज आपल्या म्हणण्याप्रमाणें ऐकत नाहींत तर दूर रहाणें बरें अशी प्रेमविषादात्मक झाली आहे. त्यांत द्वेषाचा कोणताही भाग आहे असें मला खरोखर वाटत नाहीं. धर्म, प्रेम व त्यांतील गुरुआज्ञापूर्वक व्यवस्था या तीन गोष्टींच्या दृढ समुच्चयानेंच साधक पुरुषाला आपला मार्ग स्पष्ट करूं शकतो. एखादें न्यून असल्यास सगळीकडे आंधारच होऊन रहातो. बापू वगैरेंच्या आंगीं तिन्ही गोष्टींचा सारखा समुच्चय नाहीं. म्हणून माझ्याविषयीं जितका प्रेमा ते दाखवितात त्या सर्व प्रेमाला विरुद्ध प्रयत्न मी करितों व पुढें मंडळीची अशी स्थिति राहिल्यास सत्य किंवा असत्याभास कोणता तरी उपाय करून मला आपला मार्ग सुधरावा लागेल यांत संशय नाहीं. मंडळीला आम्ही बरोबर वागतो अशी खात्री असेल तर मीही वाईट वागत नाहीं असें मला

वाटत असल्यास त्यांत काय दोष आहे? × × × परंतु मेल्यावर जे आपल्या प्रेताचें मांस खाणार त्यांचेंच मांस खावून आपलें जीवित सुधारण्यांत परोपकार तो कोणता? प्रेत मातींत टाकलें असतां कृमींना, जलांत टाकलें असतां जलचरांना, व अग्नींत टाकलें असतां पिशाच्चांना मिळतें. एक शिबीराजाप्रमाणें जिवंतपणीं स्वमांस दान करून जगदुपकार करण्याची संधी मांसांनीं आपलें शरीर पोसून पोसून फुकट दवडतात. मांसच खाण्याचा प्रसंग आल्यास मी मनांत वेदांती राहून बाह्यतः जैन होऊन जाईन पण मांस खाणार नाहीं. इतका माझा निश्चय आहे तरी अहिंसा व्रत मला पुरें साधलें नाहीं व तें मला अनेक जन्म साधावयाचें आहे. प्राण्यांची हिंसा घेऊं नये म्हणून आंगावर उवा लिचोड पाळून ठेवल्यास जवळ येणाऱ्या दुसऱ्या मनुष्यांना घाणेरडें वाटून त्यांना दुःख झाल्यामुळें मानसिक हिंसा होते, हें मला पक्कें ठाऊक आहे. परंतु तेवढी आपल्यांत न्यूनता आहे. म्हणून आणखी न्यूनता मिळवून घेण्याची इच्छा नाहीं. मधरूपी मासांचें वमन सर्वांना खाण्याचा प्रसंग असल्यामुळें स्वतः आपलें वमन आपण खावें हें विधान सम्यक् नाहीं. येथें जीव तोडून सांगण्यापलीकडे जर मंडळींचा निरुपाय असेल तर शंका घेण्यापुढें माझाही निरुपाय आहे. शिवाय, प्रेम करणाऱ्या मंडळींत देखील अक्षम्य कांहीं दोष आहेतच. कित्येक मंडळीला आपण सिद्ध आहोंत असें वाटतें व ते साधका-प्रमाणें प्रेम करीत नाहींत. कित्येक माझें सहज वेदांत निरूपण चाललें असलें तरी खालीं खुशाल गप्पा मारीत बसतात व मी वर

निरूपण करीत रहातों. व त्या गप्पांचीहि पायखान्याचे गप्पेपर्यंत मजल येऊन ठेपते. या करण्यांत मला शंका आली तर त्यांत वाईट काय आहे? असें करतांना सध्याच्या निरूपणापुरता वेदांत मला कळलाच आहे हें मंडळीच्या मनांत येत नाहीं असें मला कोणत्या रीतीनें वाटावें? बरें, हें जाऊं द्या. कांहीं मंडळी तोंडापुरतें गोड बोलत असून पैशाला थोडा खार लागला म्हणजे नाक मुरडतांना तुम्ही पाहिलें नाहीं काय? अशांविषयीं मी लोलंगता काय म्हणून दाखवावी? अशी कांहीं मंडळी आपण पहिल्या वर्गांत घालूं. पण दुसऱ्या वर्गाची मंडळी तरी जोंपर्यंत मी लाडवितों तोंपर्यंतच महाराजांवांचून आपणांस आधार नाहीं असें समजतात. व थोडासा चिमोटा घेतला म्हणजे महाराजांना आपलें करणें बरें वाटत नाहीं तर दूरच रहाणें बरें असें लागलेंच प्रतिपादन करितात. * *वगैरे मंडळीची स्थिति प्रत्यक्ष अशीच आहे. यावरून असा कांहीं शिष्यानें गुरूची परीक्षा पहावी, गुरूनें शिष्याची परीक्षा पाहूं नये, असाच ईश्वरानें नेम केला आहे असें त्यांना वाटतें. कांहीं शेलकी मंडळी*** चा तुमचा पूर्व संबंध होता तर त्यांनीं असे धर्मविरुद्ध आचरण कसें केलें? असा प्रश्न विचारतात. त्यांना श्रीकृष्णाचा व नंदिनी नामक त्यांच्या पत्नीचा पूर्वसंबंध असतांहि तिनें आपल्या सांब नामक सापत्न पुत्राशीं समागम केल्याची कथा स्कंदपुराणांत कां आहे? असा मी उलट प्रश्न विचारतों. मी चोख आहे कीं नाहीं हेंच शंका असणाऱ्यानें २०–२२ वर्षे राहून पहावें. गुरूंनीं शिष्याच्या मतानें वागावें असा जर कोणाचा समज असेल तर

शिष्यांना तरी आपलीं पूर्वमतें सोडून खरीं मतें बनविण्याचा प्रसंग कसा येणार? शिवाय तसें कोणी करीत असल्यास खुशाल करावें. मी कधीं करणार नाहीं. इतकें जरी लिहिलें तरी दुसऱ्या वर्गांतील मंडळीचा माझ्यावर निष्कपट प्रेम आहे हें मी सांगून ठेवतों. परंतु त्याचा बदला त्यांना कधींना कधीं मिळेलच. त्यांच्या प्रेमा-करितां मी आपला धर्म कां बुडवून घ्यावा? आतां मी विशेष कांहीं धर्म करीत नाहीं असा कोणाचा समज असेल तर जितका करतो तितकाच माझ्या पदरीं पडला म्हणजे पुरे. थोडासा चिमोटा घेतला म्हणजे महाराजांनीं आपल्यास सांगितलें तेवढें पुरे आहे, जास्त कांहीं नको. व जास्त ते कांहीं मागतही नाहींत, असें ज्या कोणा वकीलादिकांना वाटत असेल त्यांना मी हारलों असें स्पष्ट जयपत्र देऊन दुसरा महात्मा पहाण्यास तात स्मरून आज्ञा देतों. * * * दान गाजराचें व बाद विसाराची अशी लोकांची स्थिति असल्यामुळें पैसे परत देण्याचा मी निश्चय केला आहे. निष्कलंक राहून कुत्र्याप्रमाणें पोट भरणें बरें पण कलंकाला खोटें देखील कारण होणें चांगलें नाहीं असें माझें मत आहे. आपल्या-कडून कलंकाला कारण न होतां लोकांचा आरोप घेण्याची हौस असणें हें मी पूर्व पत्रांत महात्म्याचें लक्षण लिहिलेंच आहे. व प्रमाण विष्णुपुराणाचे श्लोक दिले आहेत. * * * इतर मंडळी-विषयीं जें आपण लिहिलें त्यांत आपण ग्रंथ वाचून पाहिजे तें मिळवून घेऊं असा मला भेट झालेल्यांचा समज आहे, पण त्यांना वाक्याचा अर्थ देखील लावतां येत नाहीं असें मी सिद्ध करून देण्यास तयार आहे."

आज्ञापालनपूर्वक श्रवण नसलें म्हणजे शास्त्रचिंतनांतहि अनेक शंका उद्भवून "पूर्वोपलब्धपरिहार" नांवाचा दोष कसा उत्पन्न होतो हें महाराजांनीं एका पत्रांत चांगलें प्रतिपादन केलें आहे. तें पत्र महत्वाचें असल्यामुळें येथें घेतों:—

## पूर्वोपलब्धपरिहारदोषदर्शक पत्र.

" सां० प्र० वि० वि० मला येथें दिनकर गोखले भेटून त्याच्या व माझ्या ज्या एकंदर गोष्टी झाल्या त्यांवरून तेथील मंडळीच्या मनांत माझ्याविषयीं पांच गोष्टी घोळत असाव्या असें मी अनुमान करून हें पत्र लिहित आहें. हें माझें अनुमान चुकलें असल्यास दोष माझा आहे दिनकरचा नाहीं.

१ ला मुद्दा, असा कीं माझ्यामध्यें चमत्कार नाहींत.

२ रा मुद्दा, मंडळींच्या महत्वाकांक्षा, माझें थोडें ज्ञान बाहेर पडेल म्हणून, मी मारून टाकतो.

३ रा मुद्दा, माझ्या सर्व युक्ती जुन्या पुस्तकांतीलच असतात.

४ था मुद्दा, मला आपल्या युक्तीचा अभिमान असून, दुसऱ्याच्या युक्ती वजनदार असल्यास मी चिरडतो, म्हणूनच मंडळींच्या आलेल्या पत्रांतील प्रयत्नवादावर मी ताशेरा झाडला.

५ वा मुद्दा, वादीशीं प्रसंग आला म्हणजे मी तोंड फिरवून पळून जातो.

या माझ्या विकारानें काढलेल्या अनुमानांतील पांच गोष्टींसंबंधीं मी कांहीं लिहितो.

### चमत्कारमीमांसा.

पहिल्या मुद्यासंबंधांत मला सांगावयाचें तें इतकेंच कीं चमत्कार ज्याचा त्याला स्वतंत्र वाटत असतो. आणि ज्याच्या त्याच्या कर्मप्रमाणें किंवा विशेषाप्रमाणें स्वतंत्र होतही असतो. कोणाचा चमत्कार कव्हाऱ्यावर आला असें कधींच झालें नाहीं. गोकुळांतलें दावाग्निपान काळयवनाचे भीतीनें पळणाऱ्याच्या ठिकाणीं संभवनीयच नाहीं असे माझ्या इष्ट देवतेविषयीं देखील तर्क होऊं शकतात तेव्हां माझी कथा काय? जवळ

नऊ लक्ष गोपाळ होते, तेव्हां एकेक गोपाळाला एक एक कृष्णाचा वेश देऊन वाममार्गी शिवशक्तिप्रमाणें गाटली गोंधळानेंच नांव रासक्रीडा. दुसरें काय ? या प्रश्नाला मी, माझा बाप, माझा आजा, प्रत्यक्ष व्यास असले तरी काय उत्तर देणार ? रावण मारणें शूराचें काम तर वाळीला पाठीमागून मारणें गांडूचें काम नव्हे काय ? वसिष्ठानें ब्रह्मज्ञान सांगतांना जर खरें वैराग्य झालें होतें तर बायकोचें नांव घेऊनच वनांत झाडें आलिंगन्याचें कारण काय ? ते ऋषी होते, त्यांना उद्धरायचेंच होतें तर मायचें नांव घेऊन झाडें आलिंगायला काय झालें होतें ? लोकांच्या म्हणण्यावर बायको वनांत पाठविल्यावर मग तिच्यासंबंधीं रडून गोंधळ करण्याचें कारण काय ? बायकोच्या पातिव्रत्याचा मोठा निश्चयच होता तर लोकांच्या म्हणण्यावरून वनांत पाठविण्याचें कारण काय ? नारदांनीं एक बायको मागितली तेव्हां त्याला बायको करून लागलाच प्रत्यय दाखविला, पण दुसऱ्याच्या, हजारों बायका स्वतः व गड्यासुद्धां मिळून भ्रष्ट केल्या तेव्हां प्रत्यय कसा दिसला नाहीं ? शंकराचार्य शंकराचाच अवतार होते तर दुसऱ्याच्या शरीरांत शिरूनच मैथुनाचा अनुभव घेऊन कामशास्त्राची परीक्षा देण्याची काय जरूर होती ? पूर्व शंकरदेहांतील उमासंयोगाचा अनुभव नव्हता वाटतें ? शंकरानें शरभ होऊन नृसिंहाला मारलें तेव्हां यांचा परस्पर प्रेम कसा ? व प्रसंगीं मांगासारखे कठोर कसे झाले ? व्यासाच्या प्रारब्धानें जर व्यासाला गाढव व्हावें लागलें अशी कथा काशीखंडांत आहे तर आमच्या सर्वांच्या नशिबानें त्यांच्या तोंडांतून चुकीचें ज्ञान निघालें नसेल कशावरून ? आठ वर्षांच्या नंदाच्या पोराला काम उत्पन्न होणें संभवनीय नाहीं असें म्हणतां येत नाहीं. कारण दूध वाजीकरणामध्यें श्रेष्ठ असून बालाला व वृद्धाला देखील काम उत्पन्न करणें हें वाजीकरणाचें लक्षण चरकादिकांनीं सांगितलें आहे. दूध तर त्याची माय यशोदा विळांतून सात वेळ पाजीत होती. धर्म स्थापण्याकरितां व देवांच्या कार्याकरितांच जर अवतार होता तर मुद्दाम इंद्राची पूजा कशाला मोडली ? मग काय म्हणे गोवर्द्धन उचलला. पण पूर्वीच त्या पर्वताखाले Spring लाऊन ठेवली नसेल कशावरून ? सर्वांमध्यें जर गोपिकाच प्रेमळ होत्या तर मथुरेला निघून कां गेल्या नाहींत ? लग्नाच्या राहूं द्या. पण कात्यायनि व्रत करणाऱ्या कुमारींनी तरी जावयाचें होतें. पुढें दुसऱ्या पतींशीं जर

त्या व्यभिचारिणी कुमारीचें लग्न लागलें असेल तर परमार्थानंतर हा संसार कसा शोभला ? अन्न दिलें नाहीं म्हणून यज्ञ करणारे ब्राह्मण वायां गेले आणि त्यांच्या बायका पूज्य झाल्या, अशा प्रकारच्या गोष्टी भोंदू साधूंना बायकीं शिष्यिणी मिळविण्यास मदत करीत असतात. ही जर सर्वेच लीला तर मग एखाद्या व्यभिचारी पुरुषाची लीला कां नाहीं ? वेदान्तानें मंडन तर कुत्र्याच्या मैथुनाचेंही करतां येईल. मग रासक्रीडेंत विशेष काय ? अशा प्रकारचे कोट्यवधि तर्क असून त्यांत न्यायदृष्टीचा हेत्वाभास नाहीं. पण यांतील एकाही तर्काचें उत्तर मजजवळ नाहीं. माझें उत्तर एवढेंच आहे कीं अझून मला स्वप्नांत स्त्रीसंयोग होऊन धातुपात होत असतो; तेव्हां जेथें आमच्या इष्ट देवतेची अशी स्थिति तेथें आम्हां अनुयायांची स्थिति काय पहावयाची आहे ? बरें, गोपिका तरी किती भोळ्या ! काय म्हणे डोळ्यांत खडा गेला आणि न कळतांना कृष्णानें मुका घेतल्याबरोबर डोळ्यांची आग नाहींशी झाली. आणि नीतीचा पुतळा तुकाराम बोवा त्याचें वर्णन करतो ! साराच खुळ्यांचा बाजार ! ! पण या बाजारांतीलच मीहि एक खुळा आहे. तेव्हां तसे चाळे माझ्यांत कांहीं असल्यास आश्चर्य नाहीं. कारण माझी माय व्यभिचारिणी असली तरी ती सतीच होती असें मला धेऊन चाललें पाहिजे. नाहीं तर पुढें अनंताचें लग्नच होणें कठीण आहे. पण मी चमत्कार सांगून कोणाला पैसे मागितले नाहींत, मागत नाहीं व मागणार नाहीं. हें पहिल्या मुद्याचें उत्तर झालें.

दुसऱ्या मुद्याचें उत्तर लिहितों:—

संस्कृताकरितां मी श्रीअण्णासाहेबांना गुरु केलें हें सर्वांना माहितच आहे. आपल्या घरचें काम कोणी करतो म्हटल्यास त्याला मी नको म्हटलें असेल असें मला जन्मांत आठवत नाहीं. प्राज्ञविशारद शास्त्रीपरीक्षेला बसण्याला मी कोणाला मनाई केली नाहीं. मंडळीच्या शिकून येण्यानेंच जर माझें ज्ञान बाहेर पडत असेल तर तें पाडण्याला आजच पुष्कळ जण तयार आहेत. कारण मंडळीपेक्षां व माझ्यापेक्षां अधिक ज्ञान पुष्कळांनाच असलें पाहिजे असें म्हणावें लागेल म्हणून मला भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. पण खरी गोष्ट अशी आहे कीं माझें काम म्हणून करण्याकरितां मला विचारल्यास मी माझ्या मनाच्या हजारों वेडेपणामुळें कांकूं करतों. व प्रवृत्तिनिवृत्ति कांहीं करीत नाहीं.

माझें काम नसेल तर कोठेंहि जाण्याकरितां मला विचारण्याची गरजच नाहीं. हें दुसऱ्या मुद्याचें उत्तर झालें.

## जुन्या युक्ती व नवी योजना.

तिसऱ्या मुद्याचें उत्तर—या मुद्यासंबंधीं येवढेंच सांगावयाचें कीं असें म्हणणाऱ्यानें तें दाखवून दिल्यास मजवर मोठे उपकार होतील. युक्तिसाम्य तर कांटचें व शंकराचार्याचेंहि मिळतें. माकेटिसपासून तुकाराम महाराज यांनि शिकलें असतील तर माझ्या सर्व युक्ती जुन्या पुस्तकांतील असतील. नव्या युक्ती कोणत्या व जुन्या पुस्तकांतील माझ्या युक्ती कोणत्या ह्यांची निवड माझ्या ग्रंथांतून करणें मला शक्य आहे असें मला वाटतें. पुन्हां जुन्या युक्ती देखील जें तत्व सिद्ध करण्याकरितां मी लावल्या आहेत त्याच युक्ती जुन्या ग्रंथकारांनीं लावल्या आहेत काय ? मी रसाची अभिव्यक्ति वृत्तिसंधिस्थानीय मानत असल्यामुळें अनभ्यस्त विवर्त व ज्ञानोत्तर भक्ति मानणें मला सोपें जात आहे. वृत्तिस्थ रस मानणाऱ्या उज्वलनीलमणिकारादि भक्तांना व साहित्यदर्पणकारादि पंडितांना आणि स्वप्रेश्वरादि भाष्यकारांना माझें अनभ्यस्तविवर्त तत्वच मानतां आलें असतें हें मला कोणी सिद्ध करून दाखवील तर बरें होईल. आतां रस मात्र मी जुन्या ग्रंथांतून घेतला आहे खरा. किंबहुना जुन्या ग्रंथांतीलच सिद्धांत मला मान्य आहे. आगमनिर्णयांत शब्दाच्या अर्थाचे नवीन नियम काढून ठेवून कांहीं जुनेंहि घेतले आहेत ते नव्या युक्ती कोणत्या व जुन्या युक्ती कोणत्या हें दाखविण्याला स्पष्ट उदाहरणच आहे. जेथें जुन्या युक्ती आहेत तेथें माझी योजना नवी आहे व जेथें नव्या आहेत तेथें अवयवनिश्चय नवा आहे. अनुभव जुना असून जेथें जुन्या ग्रंथांत त्याला शब्द नाहीं तेथें परिभाषा नवी आहे. प्राचीन शास्त्रकारांनींहि कांहीं यापेक्षां नवीन केलें असेल असें मला माहित नाहीं. शंकराचार्यांनीं देखील ब्रह्मसूत्रावरील भाष्य, सूत्रसंहितेचें नुसतें वृत्तबंधन तोडून प्रत्येक सूत्राचे ठिकाणीं तसेच्या तशाच अक्षरांनीं गद्य घेतलें आहे. हें मी पुराणवाक्यावरून व आपल्या परिशीलनावरून सिद्ध करून देण्यास तयार आहें. अत्यंत नवीन तत्वज्ञानाची सवय सेनेका वगैरे स्टोइकस लोकांत आहे आम्हां हिंदूत नाहीं. " त एव पदविन्यासास्त एवार्थविभूतयः । तथापि नव्यं भवति काव्यं

ग्रथनकौशलात् ॥ " या श्लोकाप्रमाणेंच माझी ही कांहीं तरी मानकल्पना आहे. आतें. कोणाला पसंत नसल्यास ग्रंथ विकत घेऊन वाचण्यांत आपला वेळ दवडूं नये.

## पूर्वोपलब्धपरिहारदोष.

चवथा मुद्दा—यासंबंधीं कांहींहि लिहिलें तरी बाजू संभाळली अशा समजुतींतच त्याचें पर्यवसान होण्याचा संभव आहे. तथापि त्या पत्रांत हेत्वाभास होते असें मी उत्तरांत लिहिलें आहे. ज्या युक्ती पत्रांत लिहिल्या होत्या त्या युक्तीची चर्चा माझेजवळ स्वतः आपली होऊन गेली आहे. हें समजून मी थोडीशी भाषा उत्तरांत कडक वापरली होती. एखाद्या गोष्टीवर लिहितांना किंवा शंका काढतांना पूर्वोपलब्धपरिहार नांवाचा दोष उत्पन्न होत असतो तो होऊं नये एवढेंच मला उत्तरांत दाखवावयाचें होतें.

पूर्वोपलब्धपरिहार म्हणजे पुन्हां पहिल्या ठिकाणीं येणें. याचें स्पष्टीकरण असें कीं कल्पना करा. एक लोकायत आहे. त्यानें प्रत्यक्षच प्रमाण आहे, इतर प्रमाणें नाहींत, असें म्हटलें असतां त्याला अलोकायतानें असा प्रश्न केला कीं स्वप्रत्यक्ष प्रमाण आहे असें तूं म्हणतोस कीं सर्वांचें प्रत्यक्ष प्रमाण आहे असें तूं म्हणतोस ? पहिल्या पक्षीं तुझें बोलणेंच आम्हांस ऐकूं येत नाहीं असें आम्ही म्हणतों. प्रत्युत्तर देतां म्हणून माझें बोलणें तुम्हांला ऐकूं येतें असें म्हणशील तर हेतुसाध्यादि अवयववास्तव हें अनुमान आहे. प्रत्यक्ष नव्हे. दुसऱ्या पक्षीं तर अनुमान स्पष्टच आहे. या अलोकायताच्या बोलण्यांत लोकायत आस्तिक झाला. व कांहीं दिवस आचरण करूं लागला. नंतर त्यानें काढली प्रयत्नवादावर शंका. कीं सर्वच कांहीं प्रयत्नानें मिळत नाहीं. म्हणून मनुष्य परतंत्र आहे. अत्यंत परतंत्र म्हणजे जडाचा मनुष्य तयार होणें. मग आत्मा कशाचा ? या युक्तीनें पुन्हां तो लोकायत पहिल्याच ठिकाणीं येतो. मग त्याला म्हणावें लागतें कीं अरे तूं प्रत्यक्षवादी जर आहेस तर दुसऱ्याला तरी अनुमानानें कसा अडवितोस ? या बोलण्यानें पुन्हां तो आस्तिक होतो. मग एक दोन वर्षांनीं काढतो कृष्णचरित्रावर शंका, कीं ईश्वरालाही जर असे चाळे सुचतात, तर ऋण काढून सण करावा. मेल्यावर कोणकोणाचें ? या लोकांतच जें कांहीं आहे तें आहे. ईश्वर मानून देखील या शंकेनें तो पुन्हां पहिल्याच ठिकाणीं येतो.

मग अकृताभ्यागम कृतप्रणाश इत्यादि दोष दाखविणाऱ्या जुन्या युक्तीनें पुन्हां तो आस्तिक होतो. मग दहापांच वर्षांनीं काढतो रामाच्या वनवासावर शंका. कीं, ईश्वरालाहि कर्मभोग चुकला नाहीं. तेव्हां सर्व पारतंत्र्यच भरलें आहे. जडांत आणि चैतन्यांत कांहीं विशेषसा फरक नाहीं. या शंकेनें तो पुन्हां पाहिल्याच ठिकाणीं येतो आणि शंका काढतांना पूर्वीच्या युक्तीची आठवणहि ठेवीत नाहीं. विकाराच्या भरांत येऊन विचार करणाऱ्या सर्वांच्या भाषणांत हा दोष उत्पन्न होत असतो. म्हणूनच योगशास्त्रांत चित्तनिरोधानंतर विवेकख्यातीचें महत्व वर्णिलें आहे. आपण लोकायत नव्हता हें मला पक्कें ठाऊक आहे. आपलें माझ्या जवळचें पत्र हारपलें आहे. तेव्हां आपल्याजवळ तें कायम असल्यास पुन्हां पाठवावें म्हणजे त्यांत पूर्वोपलब्धपरिहार नांवाचा दोष कसा झाला आहे हें मी शब्दाशब्दावर लिहून पाठवीन. पत्रांत माझ्या पूर्व युक्तीचें खंडणहि केलें नव्हतें. हा एक दोष जुनाच असून त्याला मी नवीन नांव दिलें आहे. हा एक दोष दुसऱ्याच्या म्हणण्यांतील काढतां न आला म्हणजे खंडणमंडणाचे एकावर एक न्यायामृत, अद्वैतसिद्धितरंगिणी, शतदूषणी, ब्रह्मानंदी, सहस्रदूषणी, आदि द्वेषजनक ग्रंथावर ग्रंथ होत जातात. पारतंत्र्याचें

## शिक्षण-लक्षण व दैवी पौरुषाची नवी मीमांसा.

आणि स्वातंत्र्याचें मूळ तर असें आहे कीं, वृत्ति जेव्हां सत्ताविषयिणी असते, तेव्हां सामान्य चेतनस्थ अविद्येमुळें परतंत्र होते, व प्रारब्धादि पारतंत्र्य सामग्रीला उत्पन्न करिते. जेव्हां ती चितिविषयिणी असते तेव्हां विशेष चैतन्यामुळें अविद्येच्या विक्षेपांशनाशानें स्वतंत्र होते. आणि प्रयत्नादि स्वातंत्र्यसामग्रींना उत्पन्न करिते. जेव्हां ती आनंदविषयिणी असते तेव्हां तिला दोहींचेंहि खरें फळ मिळतें. आतां प्रवृत्तिमार्गांत सत्ताविषय बलवान झाल्यास चितिविषयाची मदत कशी घ्यावी हें समजून घेण्याचेंच नांव शिक्षण आहे. सच्चिदानंद वस्तुतः एक आहे तरी वृत्तिभेदानें ते पृथक भासतात या पंचपादिकाकारांच्या म्हणण्यावरून मी ही दैवी पौरुषाची नवी मीमांसा सांगितली आहे. स्थलसंकोचास्तव इच्या विषयींच्या संपूर्ण युक्ती लिहितां येत नाहींत. अशाच रीतीनें कोण्या पुस्तकांत ही सिद्ध केली असल्यास दाखविल्यानें उपकार होतील. समजा इच्या-

वर जर कोणास शंका काढावयाची असेल तर प्रथम ब्रह्माचें सच्चिदानंद स्वरूप वृत्तीनें भासत नाहीं असें कबूल केलें पाहिजे. नंतर वेदान्त कांहीं तरी सांगतो असें कबूल केलें पाहिजे.परंतु असें मानणाराला आम्हीही युक्तिच सांगत नाहीं. कारण तो पहिल्याच ठिकाणीं म्हणजे पूर्वोपलब्धपरिहारांत सांपडतो. तेव्हां शंका करितांना इतक्या गोष्टी मला मान्य आहेत व इतक्या नाहींत हें प्रति-ज्ञेशीं विरोध येऊं न देतांना प्रतिज्ञापूर्वक आरंभीं सांगावें लागतें. आणि अशीच सर्व प्राचीन पद्धति आहे. नाहीं तर निर्णयाच्या ऐवजीं " जिव्हाग्रास्च्छेदनं नास्ति न तालुपतनाद्भयम् । निर्विशेषेण वक्तव्यो वाचालः को न पंडितः ॥ अशी स्थिति होते. अशापुढें "तयाची फजिती करूं आम्ही" "तोंवरी तोंवरी माळामुद्रांचीं भूषणें । जंव तुकयाचें दर्शन झालें नाहीं॥"असा ज्ञानाचा अभिमान बाळगणाऱ्या समर्थांनींहि हात टेकले आहेत. मग आमची कथा काय? तो अभंग येणेंप्रमाणेः--पाखंड्यांनीं पाठीं पुरविला दुमाला । तेथें मी विठ्ठला काय बोलों ॥ १ ॥ कांद्याचा खाणार चोजवी कस्तुरी । आपण भिकारी अर्थ नेणें ॥ २ ॥ नकळे तें मज पुसती छळुनी । लागतां चरणीं न सोडिती ॥ ३ ॥ तुझ्या पायां-विण दुजें नेणें कांहीं । तूंचि सर्वांठायीं एक गज ॥ ४ ॥ तुका म्हणे खीळ पडो त्यांच्या तोंडा । किती बोलों भांडा वादकांशीं ॥ शेवटीं त्यांना देखील " तुका म्हणे तुम्ही करा घटापटा । नका जाऊं वाटा आमुचीया ॥ " असें म्हणणें भाग पडलें. त्यांच्यापेक्षां मी अधिक शहाणा आहें असें मला वाटलें नाहीं, वाटत नाहीं. व वाटूंहि देणार नाहीं. अनभ्यस्तविवर्त आम्ही मान्य करूं पण ऐतिह्य प्रमाण मानणार नाहीं, असें म्हणणाऱ्याला कृष्णमूर्तीची आम्ही अनभ्यस्त विवर्तता सिद्ध करतो, पण ऐतिह्यप्रमाण ज्याला मान्य नाहीं त्याला कृष्णच मान्य नाहीं तेव्हां त्याची सर्व अवतारांवरच शंका होणार व त्यामुळें ईश्वराच्या साकार-तेवर शंका होणार व त्यामुळें मूर्तिपूजेवर शंका येणार म्हणून हा पूर्वोपलब्धपरि-हारच होतो.याशिवाय मी दुसरें काय उत्तर देणार ? कोणी म्हणेल आम्ही इतक्या शंका करतो आणि इतक्या शंका येत असल्या तरी करीत नाहीं. तर त्याला मी इतक्या प्रश्नांचीं उत्तरें देतों व इतक्या प्रश्नांचीं उत्तरें खुशी आहे नाहीं देत, असें मी म्हटलें असतां कोठें चुकतें ? युक्तीचा मुद्दा मननात्मक असून तो बाधकयुक्ति अभिमानियांना अपुरा आहे. म्हणून श्रुत्यर्थसाधक युक्तींच्या संग्रहाचेंच नांव

मनन आहे. वृत्तिलोप कांहीं करतां येत नाहीं, सर्व शब्द अनियतार्थ नाहींत म्हणून. व त्यामुळें मतभेद असला तरी कोणालाहि कोणत्या शब्दाचा अर्थ फिरवितांच येत नाहीं हा एक नवीन नियम मी आपल्या आगमनिर्णयांत शब्दाच्या अर्थाविषयीं घालून ठेविला आहे. हा जुन्या पुस्तकांत दाखवून द्यावा किंवा खंडण तरी करावें अशी माझी इच्छा आहे. याप्रमाणें चवथ्या मुद्याचें उत्तर दिलें.

## अतिवादाचें स्वरूप.

### आतां पांचव्या मुद्याचें उत्तर देतो:—

मला संस्कृत भाषा म्हणजे कौमुदी येत नाहीं. म्हणजे पाठ नाहीं. यामुळें व पंडितांना धातु विचारण्याची संवय असल्यामुळें मी पळून जातो. जें मला येत नाहीं तें मी स्पष्ट कबूलहि करतो. तत्वनिर्णय करतां येत नाहीं या भीतीनें पळून जात नाहीं. आतां कोणी म्हणेल मग तुमच्या शब्दाचे अर्थ बरोबर असतात हें आम्ही कशावरून समजावें ? तर त्याला माझें उत्तर असें आहे कीं, वाचस्पत्यादि कोश व शब्दकौस्तुभादि ग्रंथ समोर ठेवून जो शब्दाचा अर्थ वादीला मान्य होईल तोच घेऊन मी स्वभाषेंत बोलण्याला तयार असतों. ज्या-प्रमाणें फुकट धातूंच्या काथ्याकुटीला मी भीतों त्याप्रमाणें शुष्क तर्कालाहि भीतो. न्यायांत प्रमाण व तर्क हे दोन निराळे सांगितले असून अनिष्टापादन हें तर्काचें लक्षण असून त्याला भ्रमज्ञानांत घातलें आहे. वाद, जल्प, वितंडा या या तीनकथा शास्त्रामध्यें प्रसिद्ध असून त्या तिहींतून कोणतीही उपपादनाच्या उपयोगी आहे असें " वादजल्पवितण्डानामन्यतमां कथामाश्रित्य उपपादनीयम् । " या अद्वैत सिद्धींतील वचनावरून सिद्ध होते. स्वपक्ष व परपक्षाच्या निर्णया-साठीं जें भाषण तो वाद. आपलाच पक्ष सिद्ध करण्यासाठीं जें भाषण तो जल्प आणि परपक्षाच्या खंडणाकरितां जें भाषण तें वितंडा. या तीनहि कथा प्रमाणाच्या आश्रित असून तर्काच्या आधानें एकापेक्षां एक दुर्बल आहेत. तथापि, या वितण्डेंत देखील मननांशानें साधक तर्काचाच समावेश होतो. बाधक तर्काचा नाहीं. प्रमाणरहित तर्काला अतिवाद म्हणून नांव दिलें आहे. " छलजात्यादिभिर्जीयात् स महापातकी भवेत् " असें सूतसंहितेचें वचन असून " अतिवादी नव्हे शुद्ध या बीजाचा । ओळखा जातीचा अधम तो ॥ वेदश्रुती

नाहीं ग्रंथ ज्या प्रमाण । श्रेष्ठाचें वचन न मानी जो ।। तुका म्हणे मद्यपानाचें मिष्टान्न । तैसा तो दुर्जन शिवों नये ।। " असें तुकाराम महाराजांचें वचन आहे. आतां अतिवादक म्हणजे काय यांचें थोडक्यांत स्पष्टीकरण करतों. अधिक तर्क क.ण्याला अतिवाद म्हणतात. जी गोष्ट थोडक्या तर्कानें सिद्ध करावयाची व सरळ सिद्ध करावयाची तिला वाचाल युक्तीचें स्वरूप देणें. जसें, मूर्तिपूजा कां करावी ?

**सिद्धांती:**—आमच्या बुद्धीला आलंबन पाहिजे म्हणून.

**अतिवादी:**—त्या मूर्तीच्या व्यक्तींत ईश्वर आहे कीं जातींत ईश्वर आहे हो ? प्रथम पक्षीं ईश्वर परिच्छिन्न झालाच पाहिजे. आणि द्वितिय पक्षीं व्यक्ति-भेद विच्छिन्न झाला पाहिजे. अथवा जातीलाच मूर्त्यवयव कल्पिला पाहिजे. इत्यादि एक नाहीं कोटिशः अतिवाद आहेत. त्यांनाहि मी भितो. मला जें कांहीं माझ्या संबंधाचें लिहावयाचें होतें तें मी या पत्रांत लिहिलें आहे. " मुक्काम कुऱ्हा. ता० २९।५।१३

**शुद्धप्रज्ञा:**—- ह्याप्रमाणें धर्म, प्रेम, व गुर्वाज्ञापालन या त्रिपुटीचें दिव्यांजन आमच्या डोळ्यांत घालून व आमच्या विविध मनो-दोषांचें आविष्करण करून आमची प्रज्ञा सोज्वळ करण्याकडे महारा-जांचें सर्व लक्ष्य होतें. शुद्ध प्रज्ञेवांचून सद्गुरूच्या उक्ती मनांत ठसत नाहींत, शुद्ध प्रज्ञेवांचून सेवेची आवडी उत्पन्न होत नाहीं, शुद्ध प्रज्ञेवांचून बाह्य देहबुद्धि नाहींशी होत नाहीं, शुद्ध प्रज्ञेवांचून सर्व इंद्रियें सद्गुरुसेवेंत तटस्थ होऊन एकेंद्रियता प्राप्त होत नाहीं, शुद्ध प्रज्ञेवांचून संबंधदीक्षेचा अधिकार येत नाहीं, शुद्ध प्रज्ञेवांचून लालन वात्सल्यादि संबंध भजनाच्या खुणा व अभिगमन उपादानादि पंचविध भगवद्भजनाचें रहस्य कळत नाहीं, व शुद्ध प्रज्ञेवांचून प्रमादरहित श्रवणाहि घडत नाहीं. म्हणूनच " ज्ञप्तेस्तु कारणं

साक्षात् शिष्यप्रज्ञैव केवला " असें भगवान् वसिष्ठाचार्यांनीं योगवासिष्ठांत म्हटलें आहे.

ही शुद्ध प्रज्ञा सद्गुरुभक्तीनेंच प्राप्त होते व गुरु सांगतील तोच धर्म व ते म्हणतील तेथेंच प्रेम ठेवून त्यांच्या वृत्यनुसार वागणें हेंच गुरुभक्तीचें यथार्थ स्वरूप होय. आमच्या पारमार्थिक उन्नतीचें बीज यांतच सांठविलेलें असून आमच्या स्वावलंबनाचा—आमच्या आत्मविश्वासाचा—हा भक्कम पाया आहे. आम्हांला सानन्य दीनतेची जोड देऊन सद्गुरुभक्तीचें रहस्य शिकविणारी व महाराजांसारख्या दयाळ सद्गुरुमाउलीचें स्तन्यामृत पचनीं पाडून माधुर्य प्रेमाची पुष्टि देणारी ही दिव्य मात्रा आहे. यांतच धर्म, प्रेम व गुर्वाज्ञापालन यांचा समुच्चय साधतो. यानेंच निरहंकार सेवेचें तत्व कळूं लागतें, हळूहळू सत्वशुद्धि होत जाते, व बुद्धीला बोधग्रहणयोग्यता प्राप्त होऊन प्रमादरहित श्रवणानें वेदांतचिंतनाचा मार्ग सुलभ होतो.

**श्रवणविधिः**—गुरूजवळून श्रवण करीत असतांना कोणकोणते प्रमाद उत्पन्न होतात ते ' प्रमादकल्लोळांत ' महाराज सांगतातः— " एकवेळ झालिया श्रुती । आलवें घे देहाहंकृति । न करी श्रवणाची आवृत्ति । प्रमादी तो ॥ उक्त नियम त्यजून । जो करी वेदांतश्रवण । फळीं उतावेळ प्रयत्नावीण । प्रमादी तो ॥ " म्हणून हे प्रमाद टाळण्याकरितां वरील गुरुसेवेचें तत्व दृढ पाळलें पाहिजे. भागवत महात्म्यांत म्हटलें आहेः—

विश्वासो गुरुवाक्येषु स्वस्मिन्दीनत्वभावना । मनोदोषजयश्चैव कथायां निश्चला मतिः । एवमादि कृतं चेत्स्यात्तदा वै श्रवणे फलम् ॥

अध्याय ५ श्लो० ७५।७६

अशा प्रमादरहित श्रवणानेंच देहत्रयाचा निरास होऊन माधुर्य-संबंधयोग्यता प्राप्त होते. याविषयीं अगस्तिसंहितेचें वचन आपल्या "प्रेमनिकुंजांत" प्रमाण घेऊन महाराजांनीं त्याचें स्पष्टीकरण केलें आहे तें असें:---

"देहत्रयविनाशं च कृत्वादौ गुरुवक्त्रतः। ततः संबंधयोग्यत्वं प्राप्नोति मुनिसत्तम ॥" अगस्तिसंहिता.

**ओव्या:**---एवं झालिया साधनभक्ति। ज्ञान होय सद्गुरु उक्ती। तैं देहत्रयाची आसक्ति। सुटोनि जाय ॥ जैसें स्वप्नींचें घर-दार। जागृती येतां आटे समग्र। तैसें सद्गुरुमुखें श्रवण सुंदर। करितां देहत्रय विनाशु ॥ देहत्रयविनाश झालिया। संबंधयोग्यता ये भक्त-राया। साधनभक्तीचे तया। फलदात्री होय ॥"

प्रेमनिकुंज---तृतीया वल्ली.

हें श्रवणाचें फळ निश्चयानें मिळण्याकरितां अवधान मात्र पूर्ण असलें पाहिजे हें ज्ञानेश्वर महाराजांनीं प्रतिज्ञेनें सांगितलें आहे. ते म्हणतात:---"तरी अवधान येकलें दीजे। मग सर्व सुखासी पात्र होइजे। हें प्रतिज्ञोत्तर माझें। उघड आईका ॥"

श्रवणकालीं चंचल चित्त करून जर स्वतःच प्रतिबंध करून घेतला तर मात्र सद्गुरुमाउलीच्या कळवळ्याचा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं. याविषयीं महाराजांचा पुढील अभंग पहा:---

अभंग:---पतितही संत तारितील कोणी। कृपावलोकनीं आपु-लिया ॥ १ ॥ न मागतां माय पाजील कीं स्तन। तीसची म्हणून बाळचिंता ॥ २ ॥ परी बळें मुख मिटवितां बाळ। राहीजे स्नेहाळ

ठायीं ठायीं ॥ ३ ॥ तेवीं प्रसंगची आवडी दवडितां । स्तब्ध होणें संता लागे तेव्हां ॥ ४ ॥ मौनें येऊं द्यावें सांगतीं तें चित्ता । पुढील तों चिंता ज्ञानराया ॥ ५ ॥

महाराजांची अभंगाची गाथा अभंग १३३६

**श्रवणानंदानें समाधिः**—सावधान चित्तानें श्रवण केलें असतां श्रवणानंदानेंच समाधी कसा प्राप्त होतो याविषयीं वासुदेवराव मुळ्यांच्या एका पत्रांत महाराज म्हणतातः—

" तुम्हांला जेवढी मार्गाची उतावळी आहे तेवढी ज्ञानाची नाहीं. परंतु ज्ञान आणि मार्गाचा समुच्चय असतो. उदाहरणः—जसें ज्ञानानें परमात्मा जाणावा आणि मार्गानें त्याचा संयोग करावा. अशा अनेक गोष्टी आहेत. श्रोत्रीय आणि ब्रह्मनिष्ठ होणे हेंच जगांतील मुख्य कर्तव्य आहे. ब्रह्मनिष्ठतेवांचून श्रोत्रीयता जशी आंधळी, तशीच श्रोत्रीयतेवांचून ब्रह्मनिष्ठताही लंगडी आहे. एकवेळ ब्रह्मनिष्ठतेची गोडी लागल्यावर विद्वत्तेवर त्याचें मन बसत नाहीं. म्हणून याचा उपक्रम पहिलेच तसा आहे. त्यावर तुमचें म्हणणें कदाचित " मग तुम्हीं आम्हांला शद्बकिटकिटच सांगणार कीं काय? " असें येईल. परंतु आम्ही तुम्हाला विद्वत्ता व ब्रह्मनिष्ठता या दोन्ही पक्षानें सारखें नेणार. शिवाय, शद्बकिटकिटही सांगितली तरी तुम्हांला शद्बकिटकिट म्हणण्याचा काय अधिकार आहे? कारण शास्त्रावर अलंबुद्धि झाल्याशिवाय शास्त्रें नकोत असें म्हणण्याचा कोणासही अधिकार नाहीं. ग्रहण होत नाहीं म्हणून कंटाळा येऊन आतां शास्त्र पुरे अशी तुमच्यासारखी अलंबुद्धि अज्ञानी पुरुषांना आणि बायकांनाही असते. त्याला आम्ही अलंबुद्धि म्हणत नाहीं. ती तर शद्बानुविद्ध समाधीमध्यें होत असते. जसें भगवत्कथेमध्यें प्रेम येऊन प्रेमानें मूर्च्छित पडला म्हणजे कथा ऐकणें आपोआप बंद पडतें, त्याप्रमाणें श्रवणानंदानेंच प्रथम समाधींत गुंग झाला म्हणजे आपोआपच शास्त्रावर अलंबुद्धि होत असते. भालेरावांनीहि मागें तुमच्या

प्रमाणेंच स्थिति झाली होती. किंचित् कारणा करितां आत्मसार्थक करणाऱ्या पुरुषांना आम्ही आपल्या हातचे सोडीत नसतों. ”

द्वि. यष्टि. उत्त. पृष्ठ २८—२९

सच्छास्त्रश्रवणाविषयीं अशाच अर्थाचा उपदेश भगवान वसिष्टांनीं श्रीरामास योगवासिष्ठाच्या उत्पत्ति प्रकरणांत केला आहे तो संग्राह्य असल्यामुळें येथें प्रमाणार्थ घेतों:—

“ **श्रीवसिष्ट**—तुला बोध व्हावा एवढ्यासाठीं मी ज्या कथा सांगणार आहें त्या जर तूं लक्ष्य देऊन ऐकशील तर बा साधो ! तूं ज्ञानी व मुक्त होशील. पण तसें न करितां उद्विग्न होऊन जर तूं मध्येंच उठून जाशील तर सच्छास्त्रश्रवणास अयोग्य असलेल्या पशु पक्ष्यांप्रमाणें तुला कांहीं लाभ होणार नाहीं. जो ज्याची इच्छा करितो व त्याकरितां प्रयत्न करितो त्यास तें अवश्य प्राप्त होतें. पण थोडासा प्रयत्न करून जर तो कंटाळला व त्यानें प्रयत्न सोडला तर त्यास इष्ट वस्तूचा लाभ होत नाहीं. यास्तव इष्टप्राप्तिपर्यंत प्रयत्न केला पाहिजे. * * याचें श्रवण नित्य करावें. म्हणजे बुद्धीमध्यें ज्ञानोदय होतो. पण पापाच्या दुष्परिणामामुळें पुष्कळांस हें रुचत नाहीं. त्यांनीं पाहिजे असल्यास दुसऱ्या शास्त्रांचा अभ्यास करावा. किंवा पशुतुल्य विद्याहीन होऊन रहावें. त्याबद्दल आमचें कांहींच म्हणणे किंवा आग्रह नाहीं. पण ज्यास अध्यात्मशास्त्राची चर्चा आवडत असेल त्यानें त्याचा आदरानें अभ्यास करावा. म्हणजे औषधपानानंतर जसें आरोग्य हें प्रत्यक्ष फळ मिळतें, त्याप्रमाणें जीवन्मुक्ति अनुभवास येते.

सद्गुरुवाक्यश्रवणानें जसजशी आपली बुद्धि शुद्ध होत जाईल तसतसें आपल्यास परोक्ष ज्ञान अधिकाधिक होत जातें. परंतु विश्वास मात्र दृढ पाहिजे. याविषयीं महाराज काय म्हणतात तें पहा:—

" आपला विश्वास मजवर सत्यच आहे, तर मीही आपणास सोडून जाण्याची इच्छा करीत नाहीं. तुह्मी मला खरोखरच प्रेमपाशांत बांधिलें तर मला एक पाऊलही पुढें निघवणार नाहीं असें मी ज्ञानेश्वर साक्ष घेऊन सांगतों. परंतु माझ्या सर्वज्ञत्वाबद्दल जसा सर्वांचा निश्चय आहे तसा सर्वशक्तिमत्वाबद्दल दिसत नाहीं. * *

हे तात, आपण जितका जितका विश्वास मजवर ठेवाल तितक्या तितक्या आपणास या जन्मांत व पुढच्या जन्मांत अनंत प्रतीति येतील. आतां आपणास वाटेल कीं हा आम्ही अंधविश्वास ठेवावा कीं काय? तर बाबा तुह्मांला डोळेच नाहींत. तुह्मी आंधळे आहांत ह्मणूनच तुह्मांस अंधविश्वास ठेवावा लागतो. आंधळ्यानें जर डोळसाचा हात धरून मग त्याच्याविषयीं भलभलत्या कल्पना केल्या तर काय फळ मिळेल? पत्र. द्वि. उत्तरार्ध. पृ० २६

**अंधश्रद्धा व शास्त्रदृष्टि:**—याचा अभिप्राय असा कीं जोंपर्यंत सद्गुरुमुखानें आपली शास्त्रदृष्टि निर्मळ झाली नाहीं तोंपर्यंत आपण आंधळे आहोंत. ही दृष्टि तीन प्रकारची असून शास्त्रदृष्टिच सर्वांत श्रेष्ठ होय. याविषयीं महाराजांनीं तां० भय्यसाहेब तांबे यांच्या पत्रांत फार सुंदर विवेचन केलें आहे. तें येणे प्रमाणें:—

" दृष्टि तीन प्रकारची आहे. वैय्यक्तिक, सामाजिक, व शास्त्रीय. आपल्या मनाच्या जें जें विरुद्ध तें ते दोष असें समजणें ही वैय्यक्तिक दृष्टि आहे. ही दृष्टि

भयंकर व गुणालाही दोष करून दाखविणारी आहे. घरांत, देशांत व धर्मांत कलह माजविणारी हीच दृष्टि आहे. एखाद्या सुखी मनुष्याला पैसा मिळत असला म्हणजे दुःखी सद्गुणी मनुष्यालाही तो पापी समजतो, हें याच दृष्टीचें पाहणें होय. वाटेल तशा ढोंगानें पैसे मिळवून हजारों लोकांना जेऊं घालणारा साधु शांत आणि एकांतीं असणाऱ्या मुनीला दरिद्री म्हणतो तो याच दृष्टिमुळें. बाप मुलांला व मुलें बापाला याच दृष्टिमुळें वाईट म्हणत असतात. म्हणून ही वैय्यक्तिक दोषदृष्टि सर्वस्वी नाश करणारी व भयंकर असल्यामुळें हिच्या मागें शहाणे पुरुष जात नाहींत.

दुसरी दोष पाहण्याची दृष्टि म्हणजे सामाजिक. ही थोड्या अंशीं बरी आहे व पुष्कळ अंशीं वाईट आहे. समाजाच्या विरुद्ध असण्याला दोष म्हणणें हेंच या दृष्टीचें स्वरूप आहे. परंतु प्रत्येक समाजाची घटना निरनिराळी असल्यामुळें प्रत्येक समाज प्रत्येक समाजाच्या दृष्टीनें सदोष आहे. पुन्हां प्रत्येक मनुष्यांत समाजाच्या दृष्टीनें कांहींतरी दोष असतातच. समाजशास्त्री ( सोशालिस्ट ) लोकांनीं समाजाला सारखें धन वाटण्याचा प्रयत्न करून पाहिला असतां तो साधला नाहीं ही गोष्ट प्रसिद्ध आहे. समाजाला अती अनुकूल राहिल्यास कुटुंब दोष देतें व कुटुंबाला अनुकूल राहिल्यास समाज दोष देतो. म्हणून सामाजिक दोषदृष्टि इकडे आड व तिकडे विहीर अशा स्वरूपाची असून अंधुक आहे. तथापि, हिच्या योगानें मनुष्याला इहलोकांत बरें म्हणून घेण्याचा आव घालतां येतो.

तिसरी शास्त्रीय दोषदृष्टि होय. ही धन्यतमा असून गरीब मुमुक्षूंचें रक्षण करणारी माता आहे. शास्त्राच्या विरुद्ध म्हणून जें जें असेल तें ते दोष असें समजणें हिचें स्वरूप आहे. अशा प्रकारची दोष पाहण्याची शास्त्रीय संवय ज्याला लागली आहे तो मनुष्य पोटभरू साधूंच्या तडाक्यांत येत नाहीं. व कुटुंबाच्या तडाक्यांतही फसत नाहीं. व शेवटीं समाजाकडून पराभूत न होतां आपलें परलोकचें कल्याणही साधून घेतो. परंतु ही दृष्टीही गुरूजवळूनच शिकलें पाहिजे- शास्त्रें वाचून किंवा वादविवादानें तर्क करून शास्त्रीय कोणतें व शास्त्राच्या विरुद्ध कोणतें हें समजत नाहीं. आपल्या मतानें शास्त्रें वाचूं लागल्यास आपल्या पहिल्या मताला अनुकूल असतील अशींच वचनें आपण काढून घेतों. एखाद्या

वेश्येनें भागवत ऐकल्यावर गोपिकांच्या गोष्टीवरून जारकर्म करणें शास्त्रीय आहे असें तिला वाटल्यास तिची सुधारणा काय होणार? शास्त्रानें आपल्या पहिल्या मतांत बदल पडला नाहीं तर त्यानें आपल्याला ज्ञान तरी काय शिकविलें? पाहुणें म्हणून गेल्यावर शिळें अन्न मिळाल्यास पाहुणचार कोण म्हणेल? ह्मणून शास्त्र म्हणजे काय हें सद्गुरूजवळूनच समजून घेतलें पाहिजे."

याप्रमाणें आम्ही मुलें शास्त्रदृष्टिविहीन म्हणून महाराजांनीं आपला हस्तावलंब देऊन आम्हास ब्रह्मभुवनाचा सोपान चढण्याचा उपदेश केला. श्रीमद्भागवतांत ब्रह्मस्तुतींत हेंच म्हटलें आहे:—

"एवंविधं त्वां सकलात्मनामपि स्वात्मानमात्मात्मतया विचक्षते। गुर्वर्कलब्धोपनिषत्सु चक्षुषा ये ते तरंतीव भवानृतांबुधिम्॥" "ब्रह्मदेव म्हणतात हे भगवन्! अशा प्रकारच्या सर्व जीवांच्याही स्वरूपभूत तुज भगवंताला जे पुरुष, गुरुरूपी सूर्यापासून प्राप्त झालेल्या उपनिषज्जन्य ज्ञानरूप उत्तम नेत्राच्या योगानें आपल्या अंतर्यामि स्वरूपानें पाहतात, ते पुरुष संसाररूप जो खोटा समुद्र त्याला तरल्यासारखे होतात."

महाभारताच्या मोक्षधर्मपर्वांत भीष्म युधिष्ठिराला सांगतात:—

"यथांधः स्वगृहे युक्तो ह्यभ्यासादेव गच्छति। तथा युक्तेन मनसा प्राज्ञो गच्छति तां गतिम्।" अध्याय २९८–१८

म्हणजे पुरुषाला आज जरी मोक्षाची वाट उघड दिसत नसली तरी त्यानें गुरुवचनावर विश्वास ठेवून सर्वदा योगाचा अभ्यास करीत रहावें. म्हणजे ज्याप्रमाणें नेत्रहीन असाही मनुष्य सवयीचे बळावर घरांत वावरतो, त्याप्रमाणें हा पुरुषही अभ्यासबलानें ज्ञानी होऊन अखेर मोक्षपदाला पोहचतो.

" तुका म्हणे कैसे आंधळे हे जन। गेले विसरून खऱ्या देवा ॥"
ही तुकोबारायाची प्रसिद्ध अभंगवाणी सर्व आबालवृद्धांच्या ओळखीची आहेच. यांत त्यांनीं " आधीं पूजा सद्गुरुनाथा। चाले देवावरी सत्ता " ह्या वाक्यानें सद्गुरूला देवापेक्षांही श्रेष्ठ ठरविलें आहे.

सारांश, गुरुवचनावर विश्वास न ठेवतां जप, तप, अनुष्ठानादि साधनाचे कितीही काबाड कष्ट केले तरी ते तुषकंडणवत् व्यर्थ होत. निपटनिरंजन म्हणतातः—"जोगजुगत करदेखे, ध्यानकूं धरदेखे, करमकूं करदेखे, कुचभी भयो नहीं । स्नानसंध्या करदेखे, देवपूजा करदेखे, पवन शीस चढा देखे, बालभी उखाडो नही । काशीरामेसर फिर देखे, द्वारकाजगन्नाथ देखे, अजोध्यामथुरा देखे, देव तो मिला नहीं। तनमों खाक चढाई, जटादाढीभी बढाई, नींबकी पात खाई, इयांट भी भयो नहीं । कहे निपटनिरंजनलाल, मिले जब सद्गुरु दयाल, तब एक पलखमों उजाल, सब खलकभर अलख दिखायो ॥ १ ॥

आगम व आप्त, म्हणजे वेद आणि गुरु, यांजवर ठेविलेली श्रद्धा ही अंधश्रद्धा नसून सकारण व सप्रमाण कशी आहे याविषयीं महाराजांनीं जें सोपपत्तिक विवेचन केलें आहे त्याचें दिग्दर्शन उमरावती प्रकरणांत केलें आहे तें पहावें.

**शिष्याची सानंन्यदीनता**—याप्रमाणें शिष्याची उपाधी ओळखून श्रवणामृतदानानें सद्गुरु त्याची बुद्धि वाढविण्याचे उपाय योजीत असतात. पण सद्गुरु जितके निरपेक्ष दयालु असतात तितकाच शिष्यही खऱ्याखुऱ्या अंतःकरणानें अनन्य शरण असला

पाहिजे. विनीत शिष्याची बुद्धि वाढविणें हें जसें गुरूच्या दयाशीलपणाचें लक्षण आहे, तसें धर्म, प्रेम व गुर्वाज्ञापूर्वक सानन्य दीन असणें हे शिष्याच्या सेवाशीलपणाचें लक्षण आहे. शिष्याची उपाधी तोडण्यांत सद्गुरु जसे प्रक्रियाचतुर असतात तसें सद्गुरूचें मनोगत ओळखून वागण्यांत शिष्यही श्रीगुरुचरणचतुर असला पाहिजे. श्रीगुरु जसे ब्रह्मकांचनाचीं नवभूषणें शिष्याला लेववून वात्सल्यप्रेमानें सुखी होतात तसेंच शिष्यानेंहि निष्काम भावनेच्या नव्या नव्या उपचारांनीं श्रीगुरुमाउलीचें पूजन अर्चन करून सुखी झालें पाहिजे. तनुमनप्राणाच्या पादुका त्यांच्या चरणीं लेवविल्या पाहिजेत, भोगमोक्षसुखांची त्यांच्या चरणावरून ओवाळणी केली पाहिजे, व "संतोषं जनयेत्प्राज्ञो तदेवेश्वरपूजनम्" या न्यायानें त्यांस संतोष देऊन "तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशयंते महात्मनः" या श्रुतिवचनाचा प्रयत्नपूर्वक अनुभव घेतला पाहिजे.

श्रीगुरूच्या चित्ताला जेणेंकरूण संतोष होईल असेंच आचरण शिष्यानें ठेवलें पाहिजे. याविषयीं सूतसंहितेच्या ब्रह्मगीतेंत पुढील श्लोक आहेतः—

"स्वस्यानिष्टमपि प्राज्ञःप्रकुर्याद्गुरुणोदितः । गुरोरिष्टं प्रकुर्वाणः परं निर्वाणमृच्छति ॥३१॥ स्वाश्रमं च स्वजातिं च स्वकीर्तिंच तथैव च । स्वादृष्टं लोकविद्विष्टं बंधुपुत्रादिसंगमम् ॥ ३२ ॥ गृहक्षेत्रधनादीनां हानिं क्लेशं सुखं तथा । अनवेक्ष्य गुरोरिष्टं कुर्यान्नित्यमनंद्रितः ॥ ३३ ॥"

त्याप्रमाणेंच शिष्याची बुद्धी न वाढवितां मायिक पदार्थ देऊन

संसारदुःखांत लोटणारे गुरूच नव्हेत असें पुढील श्लोकांत सांगितले आहे:—

"अनात्मरूपं देहादि यो ददाति पिता तु सः। न गुरुः कथितः प्राज्ञैः क्लेशहेतुप्रदोहिसः ॥ ३८ ॥ अष्टैश्वर्यप्रदस्तद्वद्धर्वादिपदप्रदः । सार्वभौमप्रदश्चापि न गुरुः क्लेशदो हि सः ॥३९॥ मंत्रतंत्रादिदस्तद्वल्लौकिकोपायदस्तथा॥ न गुरुः कथितः प्राज्ञैःक्लेशहेतुप्रदोहिसः॥४० ” ब्रह्मगीता अ० १२ * * * *

तात्पर्य, शिष्याची वृद्धि वाढविणें हे गुरूचें मुख्य लक्षण असलें पाहिजे व शिष्य अनन्यगतिक सेवाशील असला पाहिजे तरच जगाला भक्तिसाम्राज्याचा सुदिन दाखविण्याला ते दोघे समर्थ होतात नाहीं तर परमार्थाची कशी विटंबना होते याविषयीं संप्रदाय सुरतरूंत महाराजांनीं मोठें रहस्यमय वर्णन केलें आहे. ते म्हणतातः—

" शिष्याची वृद्धि वाढविणें । हेंचि श्रीगुरूचीं मुख्य लक्षणें । एरवीं करामती दाखविणें । तें झकविणें लोकांतें ॥ केवळ गुरूचा आशिर्वाद । जरी होय सुखप्रद । तरी तेथ व्यभिचार सिद्ध । गुरुत्वनियामक तो नसे ॥ भलताही भलत्याप्रती । आशिर्वाद देई क्षितीं । आतां दाविणें कराभती । गुरु न ह्मणिजे तयातें ॥ चमत्कार दाखविणें । तरी तें घडे मायागुणें । माया तुच्छ या शब्दाविणें । आन उपाय नसे मोक्षा ॥ म्हणोनि नाना उपायें करून । शरण आलियाचें वृद्धिवर्धन । हेंचि मुख्य श्रीगुरुलक्षण । सर्वज्ञात्माचार्य सांगती ॥ " एतदेवहि दयालु लक्षणं यद्विनेयजनवृद्धिवर्धनं । "

( संक्षेपशारीरक. अ० ४ श्लो.३ उत्तरार्ध )

चमत्कार दाखविणें । एथ दुसरीयासी न्यून पाहणें । वृद्धि वाढविल्याविणें आपणा ऐसें करणें न घडे ॥ म्हणोनि सद्गुरु तोचि आधीं । जो वाढवी शिष्याची वृद्धि । जयाचा तयासी आत्मनिधि । देतां त्रिशुद्धि काय गर्व ॥ गर्वें गुरु मार्ग चुकी । गर्वें शिष्यही कुंभीपाकीं । गर्वातें नाहीं निकी । प्रशंसा कोठें ॥

कलियुगाचा ऐसा पगडा । लागला गुरुशिष्यांचा झगडा । दोघेही शुष्कदगडा-स्तव भांडती ॥ गुरूचें जें सात्विक लक्षण । तेंचि अंतःकरणीं धरून । समयदोष निरखून । शिष्य गुरूतें निंदिती ॥ सात्विक गुरु पाहिजे म्हणती । आपण तामसचि राहती । ऐसीची आहे गुरूंची स्थिति । झडपली मति गर्वरूपें ॥ शिष्याचीं लक्षणें घेऊन सात्विक । आपणा इच्छिती देहसुख । एवं गुरुशिष्य दोघेही नरक । शेवटीं निःशंक पाहती ॥ अदघे सात्विकचि असावे गर्विष्ठ कोणीही नसावें । विषयामाजीं न फसावें । कोणीही कदा ॥ गुरु गर्वे देहाभिमानी जाहला । आणि शिष्य गर्वे काय मोक्षा गेला । यालागीं गर्व अवधियाला । नाशचि करी ॥ तथापि गुरुगर्वाच्या ठायीं । ज्ञान असतां बाध नाहीं । शिष्य साधक म्हणोनि तया कांहीं । गर्व लवलाही नसावा ॥ आतां हें बोलणें न रुचे जया । तरी शास्त्रचि न रुचे तया । दीना अभय देयावया । गुरुगर्वोक्ती मी अपेक्षीं ॥ पीडित असतां भवदुःख । जो शरण आला नावेक । तयासी अभय न दे जो सम्यक । तो गुरु नपुंसक मी म्हणें ॥ जो म्हणे माझा राग निमाला । आणि गुरुआज्ञेसी कुचर झाला । तो शिष्य सर्वांगसुंदर असला । तथापि निःशेष त्यागावा ॥ गुरुप्रतीति शास्त्रप्रतीति । तिसरी ती आत्मप्रतीति दिवशीं दिवशीं जयाप्रती । घडती तो महायोगी ॥ एक स्वयें शास्त्र पाहती । स्वमतें शास्त्रार्थ विचारिती । मग गुरुवाक्यातें दूषिती । आपुलिया बळें ॥ तयासीं गुरुअभिमत ज्ञान । मिळेचिना निश्चयेंकरून । एक ते गुरुचि बैसती धरून । शास्त्रवचन नेणती ॥ ते भलतेहि संप्रदाय । पाहतांचि फसती स्वयें । एक दोन्हींचा समन्वय । करिती जरी ॥ तरी नेणती आत्मप्रतीति । तेणें स्वहिता सर्वथा मुकती । जैसे चाचपटे चालती । आंधारीं आंधळे ॥ जो साच कृतकृत्य जाहला । गुरुदोष न दिसती त्याला । जो वचनाधीन राहिला । तो शास्त्रास वा गुरुला दूषी ॥ केवळ गुरुवरी ज्याचें प्रेम । तो दूषितो स्मृतिनिगम । केवळ शास्त्रावरी ज्याचें प्रेम । तो सद्गुरुस दूषितो ॥ केवळ देहप्रेम जयासी । तो प्रसंगीं दूषी दोहींसी । म्हणोनि निश्चयें गुरुशास्त्रासी । विचारावें ॥ शास्त्र सांगेल तो गुरु । गुरु सांगेल तो शास्त्रविचारु । जैसा का बिजांकुरु । अन्योन्याश्रय तैसा हा ॥ सृष्टींत ईश्वरें बीज निर्मिलें । म्हणजे अनादिपणें धोतिलें । तें मानुषें नेवोनी क्षेत्रीं पेरिलें । तरी ते वाढलें तेणेंचि मानें ॥ तेवि ईश्वर गुरु शास्त्रबीज । पुढती गुरुफल संप्रदाय

वांजे । एवं गुरु आधीं शास्त्र सहज । अनंतर आहे ॥ गुरु असतो जीव । तो भलतेंही सांगेल स्वयमेव । यालागीं शास्त्र पाहणें म्हणती सर्व । मंदबुद्धि ॥ जे का शास्त्राचे दास । तयाचें म्हणणें योग्य तयास । परी हें भय वेदांतियांस । कदा नुमटे ॥ जीजी प्रक्रिया करी बोध। तीत्ति तीत्ति आहे शुद्ध । ऐसे बोलिले प्रसिद्ध । वार्तिककारही ॥

यया यया भवेत्पुंसां व्युत्पत्तिः प्रत्यगात्मनि ।
सासैव प्रक्रिये हस्यात् साध्वी साचानवस्थितिः ॥

प्रणव उपासनेसमान । होशके म्हैसा ब्रह्मज्ञान । वेदान्ताची खूण । ऐसीचि आहे ॥ कोणी बळेंचि शास्त्र निंदिती । प्रक्रियाही रचूं नेणती । ऐसे जे गुरु म्हणविती । जीवें मारांत घालावे ॥ एका मूर्खाचिये मनी । गुरु सर्वज्ञ असावा म्हणोनी । परी मिथ्या जगति कोणी । सर्वज्ञता मिरवावी ॥ गुरु जितुका अल्पज्ञ असेल । तितुका तो अधिक शोभेल । कारण जयाच्या ज्ञाना अल्प बोल । तोचि उत्तम अधिकारी ॥

श्लोकेनच तदर्धेन श्लोकपादेन वा यदि ।
ब्रह्मज्ञानं भवेद्यस्य श्रीणं तस्य प्रयोजनम् ॥

इत्यादि श्रुतिस्मृतिपुढें । सार्वज्ञादि तर्क बापुडे । एकानें स्वप्नींचें पुसिलें कोडें। ते जागृतींत कोणे का सांगावें ॥ तैसें ब्रह्मज्ञानिया समोर । सर्वज्ञतादि हास्याकार । यालागीं बोधसमर्थ विचार । असावा श्रीगुरु ॥ सात्विक असतां सात्विक पहावा । तामस असालिया स्वस्वभावा । गुरु मिळेल तैसा पहावा । उपासनार्थ ॥ तामस स्वभावासीं ज्ञान । सर्वथा नोव्हेचि जाण । म्हणोनि घेयावें उपासन । कवणेही परी ॥ आपुले आंगीं दोष असतां । तरी दुसऱ्यासी कां निंदावें वृथा । उपदेशावीण श्रीगुरुनाथा । आन श्रमदाता सच्छिष्य नोहे ॥ सात्विकही जाहला तामसत्वनें ज्ञाना भेटला । तरी तामसही आला । सात्विका गुरु ॥ परी येथही अपवाद बहु असती । यालागीं राजमार्ग सत्वसंपत्ति । अथवा योग्य गुणत्रयोपयोग विश्वसुधारणार्थी । करी तो गुरुमूर्ति मानवे मातें ॥ एक गुरु धरिती शांति । जवळी शिष्यशिष्यिणी येती । मग आपसांत मिसळती । वधुवरपणें ॥ परी झणीं ढळेल साधुपण । यासाठीं न बोलती वचन । तया साधु म्हणोनि करावें नमन । परी गुरुपण शोभेना ॥ ब्रह्मज्ञान जाहलें। तेणें अन्यायीं जग हें जाळिलें।

तरी पाप न लागे वाहिलें । महात्मया तया ॥ म्हणोनि होका भलती रीति । परी लोकांसि दाखविण शांति । ते दाखवी साधक स्थिति । संसार भीति अनिवार ॥ एक ते धरोनि अति शांति । शिष्यांचे चाळे डोळियां पहाती । आणि आपणही करूं लागती । त्यांच्या तोंडावरी थुंकावें ॥ एक ते आम्ही ज्ञानी म्हणोन । लोकांस बोधिती इच्छा नसून । जैशा मुरळ्या भंडार घेऊन । बळेंचि लाविती कपाळा ॥ ते ज्ञानाभिमानी खळ । न होती गुरु निखळ । एक म्हणती संत केवळ । लोकहितार्थ धुंडिती ॥ तिहीं आमुच्या घरीं यावें । आम्हांसी बोध करावे । पटेल तें घेवोंद्यावें । सुखेंचि आम्हां ॥ ऐसियांच्या घरीं कोणी । जाय तो साधु पापखाणी । त्या स्थळींचें अन्नपाणी । निश्चयें करूनि वर्जावें ॥ "

आतां, " विनेयजनबुद्धिवर्धनम् " या पदाचा स्पष्टार्थ सांगून एकंदर निरूपणाचें सार पुढील ओवींत महाराज सांगतात--" एवढिया निरूपणाचा सार । कीं प्रथम शरण यावा शिष्यवर । मग गुरूनें देवोनि अभयकर । योग्य तयासी शिकवावें ॥ तेथ चुकलिया दंड देयावा । परी उगाचि लोकीं बंडाळा न करावा तंव वादी म्हणे स्मृतींत बरवा । मातापिता गुरुरूप ॥ "

संप्रदाय सुरतरु. अध्याय २२

## शिष्याच्या मनाचें दमन करणें हीच खरी संतकृपा—सारांश,

शिष्याच्या मनाचें दमन करून त्याची बुद्धि वाढविणें हें महाराजांनीं गुरूचें मुख्य लक्षण सप्रमाण ठरविलें आहे व आपल्या 'प्रमादकल्लोळांत' " न दमवितां शिष्याचें मन । दैहिक परीक्षा पाहे कसोन । घेऊं नेदी धड सलिलान्न । प्रमादी तो ॥ " असें म्हणून शिष्याचें मन न दमवितां नुसतेंच त्याला कसून पाहणाऱ्या गुरूला प्रमादी म्हटलें आहे हें यद्यपि खरें आहे, तथापि अगोदर सद्गुरूच्या स्वाधीन संपूर्ण मनोवृत्ति शिष्यानें केल्यावांचून गुरूला त्याची बुद्धि वाढवितां यावयाची नाहीं, व त्यांच्या दयाळुपणाचाही उपयोग व्हावयाचा नाहीं ही अत्यंत महत्वाची गोष्टही महारा-

जांनीं आपल्या शिक्षणक्रमांत कंठरवानें प्रतिपादन केलेली आहे. साधुजवळ राहून नुसती आयुरारोग्यादि ऐहिक संपत्ति विपुल मिळाली व मन जसेंच्या तसेंच अशिक्षित राहिलें तर हें कांहीं संतकृपेचें फल नव्हे. "न मोचयेद्यः समुपेतमृत्युम्" म्हणजे मृत्यु-पासून सोडविणें हेंच खरें संतकृपेचें फल होय. व मूर्खत्व हेंच मरण होय. किंबहुना मनच महामरण होय. "मनोह्यविद्या भवबंधहेतुः" हें मोठमोठ्या संतमहात्म्यांचें म्हणणें आहे. म्हणून मनोनाश होणें हीच खरी संतकृपा होय. प्रसंगविशेषीं संतांची एकदम कृपा होऊन शरीरावर दृष्ट परिणामही झाला तरी मनोवृत्तीवर मात्र कांहींच परिणाम होत नसतो. याविषयीं महाभारताच्या शांतिपर्वां-तील पुढील कथानक उत्तम उदाहरण आहे. तें कथानक थोडक्यांत असें:—

एका निर्जन अशा महावनांत कोणीएक ऋषि फलमूलांवर राहून उपवासा-दिकांनीं अंतःकरणशुद्धि करून नेहमीं सत्वस्थ वृत्तीनें राहत असत. त्या ठिकाणीं एक गांवठी कुत्रा त्या मुनीवर प्रेम व भक्ति ठेवून फलमूलांवर उदर-निर्वाह करून उपवासानें अंग सुकवीत त्यांना कधींहि न सोडतां त्यांचे जवळ राहत असे. एके दिवशीं एक मोठा चित्ता त्या कुत्र्यावर झडप घालण्यासाठीं तेथें आला. त्याच्यापासून आपलें संरक्षण करण्याविषयीं त्या कुत्र्यानें मुनीला विनविलें. मुनींनीं त्याचा भाव व भयाचें कारण ओळखून त्याला चित्ता केला. तेव्हां तो वनांत निर्भयपणें फिरूं लागला. पुढें एक वाघ त्याला मारण्यासाठीं चालून आला. तेव्हां फिरून तो चित्ता ऋषींस शरण गेला असतां त्यांनीं त्याला वाघ बनविला. याप्रमाणें हा कुत्रा वाघ बनल्यावर मांस खाऊं लागला.

---

१. पुढील प्रश्नोत्तर पहा:—गुरुजी मरण कवण हें सांगुनि मजला निवृ-त्ति द्या विपुला । बाळा मूर्खत्वचि रे निधन महा तें नसो नसो रिपुला ॥

आचार्यकृत् प्रश्नोत्तरमाला.

फलमूलें खाईनासा झाला. वनामध्यें राहणाऱ्या वाघाप्रमाणेंच तो अरण्यांतील श्वापदांना मारूं लागला. एके दिवशीं एक मोठा मदोन्मत्त हत्ती त्याला मारण्या-करितां आला. तेव्हां तो वाघ पुन्हां ऋषीला शरण गेला असतां ऋषींनीं त्याला मोठ्या मेघाप्रमाणें विशाळ हत्ती केला. याला बरेच दिवस लोटल्यावर एके दिवशीं एक सिंह त्या हत्तीला मारण्यासाठीं आला. तेव्हां पुन्हां तो हत्ती शरण आला असतां ऋषींनीं त्याला सिंह केला. पुढें कांहीं दिवसांनीं सर्व प्राण्यांचा फडशा उडविणारा आठ पायांचा व वर डोळे चढविलेला एक शरभ त्या वनांत त्या सिंहाला मारण्यासाठीं आला. तेव्हां त्या मुनींनीं त्या सिंहाला बलानें रसरसणारा असा शरभ बनविला. तेव्हां त्या उग्र ऋषींच्या शरभाला आप-ल्यापुढें पाहून तो वन्य शरभ त्या वनांतून पळून गेला. याप्रमाणें शरभाच्या योग्य-तेला चढविलेला तो कुत्रा त्या मुनीजवळ सुखांत राहत असे. त्या शरभाला भिऊन सर्व पशु तेथून पळाले होते. तो शरभही प्राण्यांना मारण्यामध्यें गुंग होऊन मांसाहारी बनून फलमूलांकडे लक्ष देखील देईनासा झाला. तेव्हां रक्ताची लज्जत लागून गेल्यामुळें कुत्र्याच्या जातीला अनुसरून कृतघ्नपणानें एके वेळेला मुनीला मारण्याची त्याची बुद्धि झाली. तेव्हां तपाच्या सामर्थ्यानें मुनींनीं ज्ञानचक्षूनें त्याचा हेतु ओळखून त्याला ते म्हणाले, तुझ्यावर स्नेह जडल्यामुळें कुत्र्याचा मी तुला या योग्यतेला चढविला. परंतु जातिस्वभाव तूं सोडला नाहींस. ज्याअर्थीं मला निरपराध्याला तूं मारूं इच्छितोस त्याअर्थीं तूं फिरून कुत्रा होशील. याप्रमाणें शाप मिळाल्याबरोबर तो फिरून कुत्रा झाला. तात्पर्य, शरीर जरी शरभाचें बनलें होतें तरी मन कुत्र्याचेंच होतें, म्हणून मुनीच्या कृपेचा त्याच्यावर तात्पुरता परिणाम झाला व शेवटीं तो पूर्वस्थितीवर आला.

असाच अर्थाची दुसरी आख्यायिका 'सोनाबाबा' महारा-जांच्या चरित्रांत, सच्चरितमाला नामक मासिक पुस्तकांत छापली आहे. तीही येथें घेतो:—

वऱ्हाड प्रांतांत बुलढाणा जिल्ह्यांत कसबें सोनाळें येथें सुमारें दीडशें वर्षां-पूर्वीं 'सोनाबाबा' नांवाचे एक अवतारी पुरुष होऊन गेले. यांचें राहणें कधीं कधीं नागपूर येथें श्रीमंत रघोजीराव भोंसलेसरकार यांच्या वाड्यांत होत असे.

तेथें ते असतांना, एके दिवशीं त्यांच्याकडे एक महारोगानें अति त्रस्त झालेला ब्राह्मण आला. त्याच्या हातापायांचीं बोटें गळालीं असून जागजागीं अंग फुटून त्यांतून पूमिश्रित रक्त वहात होतें आणि त्याची दुर्गंधीहि येत होती. * * * आपलें सर्वांग कपड्यांत गुरफटून घेऊन तो दूर महाराजांसमोर नमन करण्यास दंडायमान पडला, तो कांहीं केल्या उठेना. महाराजांनीं त्याला धीर देऊन उठविलें व बिछायतीवर येऊन बसण्यास सांगितलें. तो संकोच करूं लागला, कारण त्याचे पाय रक्तानें थबथबीत झाले होते. अत्याग्रहानें महाराजांनीं त्याला आपल्याजवळ बिछायतीवर बसविलें. महाराजांस नीति घालण्याची किंवा त्यांच्या कृतीस तिरस्कार करण्याची कोणाची मगदूर होती ! प्रत्यक्ष राजा ( श्रीमंत खंडेराव ) अदर्शनीय दुर्गंधीयुक्त पुरुषाचा संपर्क निमुटपणें सहन करीत होता. मग इतरांची काय कथा ? त्या ब्राह्मणास विचारणी केली असतां समजलें कीं, त्याचें नांव एकनाथ असून दक्षिण देशांतील राहणारा होता. सुमारें ८।१२ वर्षांपासून रक्तपितीचा प्रादुर्भाव सुरू झाल्यामुळें सर्व आप्तांनीं त्याचा परित्याग केला होता. कुटुंब माहेरीं निघून गेलें होतें. भाऊबंद, आईबाप व इष्टमित्र कोणीच त्याला विचारीत नसत. तो कोणीकडे तरी फिरून व भिक्षा मागून उदरपूर्ति करीत असे. पंढरपुराकडे महाराजांबद्दल ख्याति ऐकून तो शोध करीत इकडे आला होता. महाराजांनीं त्याचा प्रतिपाळ करण्याचें कबूल केलें. तो क्षणैक महाराजांसन्निध बसतांच त्याच्या प्रकृतींत पुष्कळ फरक झाल्याचें त्यानें कळविलें. एका महिन्यांत त्याचा कुष्ठ रोग जाऊन त्याचें सर्वांग सुंदर झालें. मुखावर तारुण्य टवटवीत दिसूं लागलें. जरी त्याची चिशी उलटून गेली होती तरी तो वीस वर्षांच्या तरुण पुरुषाप्रमाणें दिसूं लागला. हातापायांचीं गळून पडलेलीं बोटें नवीन अंकुर फुटून पूर्ववत् बनलीं हें पाहून लोकांस फारच आनंद व आश्चर्य वाटूं लागलें. सदरहू एकनाथ, महाराजांची अत्यंत एकनिष्ठपणें सेवा करूं लागला. त्याच्याकडे महाराजांनीं एक कर्तव्य लावून दिलें. तेथेंच आपल्या वाडींत एक मूर्ति स्थापन करून त्यावर पुजारी एकनाथास ठेविलें. महाराजांच्या सांनिध्यामुळें हजारों भाविक लोक त्यांच्याकडे येऊं लागले व आपले मनोरथ पूर्ण करून घेऊं लागले. पुढें पुढें तर हे इतकें प्रसिद्धीस आलें कीं, लोक [illegible]

करीत असत व हे नदमाला देखील पावत असत. महाराजांच्या आज्ञेवरून यांनीं आपलें कुटुंबहि जवळ बोलाविलें होतें.

एक वेळ महाराज नागपुरीं असतांना राजानें आपल्या भगिनीस मूळ पाठवून बोलावून घेतलें. तिच्या आंगांत पुष्कळ दिवसांपासून ब्रह्मसंबंधानें ठाणें दिलें होतें. तिनें महाराजांची सेवा केल्यामुळें तिची संबंधबाधा दूर झाली. याप्रमाणें अनेक स्त्रिया आपआपल्या हेतु इच्छेस्तव महाराजांची नानाप्रकारें सेवा करीत असत. हें पाहून एकनाथ पुजारी याच्या मनांत महाराजांविषयीं विकल्प येऊन त्यास वैषम्य वाटूं लागलें. तो कुटुंबाबरोबर विषयसुखाचा उपभोग घेत राहिल्यावरून त्याची विवेकबुद्धि मलीन झाली. आणि म्हणून तो महाराजांसहि तदाकारच पाहूं लागला. बिचाऱ्यानें आपल्या सुंदर शरीराचा अवघा ५ वर्षेंच उपभोग घेतला. इतक्यांत विषयांध झाल्यामुळें कुकल्पनारूप विवशीनें त्याजवर झडप घालून त्याची दुर्दशा मांडली. महाराजांस त्याचा अंतर्भाव कळून चुकला होता. एके दिवशीं सदर एकनाथबुवा दिशेस जाऊन परत येत असतां त्यांच्या उजवे पायाचे टांचेला एक काडी रुतली. त्याला त्यानें मुर्दाड तेल लाविलें. हें महाराजांस अंतर्ज्ञानानें समजलें. राजमंडळांतील एका व्यवस्थापकास जवळ बोलावून एकनाथबुवाची कुशलवार्ता विचारून येण्याविषयीं आज्ञा केल्यावरून तो गृहस्थ एकनाथबुवाकडे गेला व कुशल विचारूं लागला. बुवानें यथास्थित असल्याबद्दल कळविल्यावरून महाराजांस तसें त्यानें येऊन कळविलें. याप्रमाणें सतत चार दिवस झाले. रोजच्या रोज ती जखम वाढत जाऊन चवथ्या दिवशीं तींत पू होऊन ठणक लागली व कृमी झाल्याचें दिसूं लागलें. पण कुशल विचारितां यथास्थित आहे असेंच कळविलें. पांचवे दिवशीं पुन्हां त्या गृहस्थास समाचारास पाठविलें. तो बुवाकडे जाऊन विचारूं लागला. बुवानेंहि महाराजकृपेनें सुखरूप असल्याचें कळविलें. गृहस्थास वाटलें कीं यांत कांहींतरी गूढार्थ असावा. म्हणून बुवास म्हणूं लागला कीं, काहो बुवा ! रोज महाराज मला आपल्या समाचारास पाठवितात, पण आपण कुशल कळवितां ! आपल्यास एखाद्या गुप्तरोगानें पछाडलें आहे असें मला वाटतें; तें आपण चोरून ठेवून आम्हांस सांगत नाहीं. बुवानें हें मर्मभेदक भाषण ऐकून झालेलें वर्तमान कळविलें व जखम दाखविली. ती गृहस्थानें पाहतां तींत

कृमी दिसून आले. हें वर्तमान त्या गृहस्थानें येऊन महाराजांस सांगितलें. तेव्हां महाराज म्हणाले कीं, जर खरोखरीच असा प्रकार असेल तर त्या मनुष्याला दूर नेऊन एकीकडे ठेविलें पाहिजे. अशा माणसाला कोणी स्पर्श करीत नाहींत व कदाचित् झाल्यास प्रायश्चित्त घेऊन शुद्ध व्हावें लागतें हें आपणांस ठाऊक नाहीं काय? त्याला तेथें ठेवल्यास देवी विटाळेल आणि लोकही त्याला स्पर्श करतील. म्हणून सांगतों कीं याला कोठें तरी पाठवून द्या. याप्रमाणें आज्ञा होतांच त्याला गाडींत घालून रामटेकच्या किल्ल्यांतील सरोवराच्या कांठीं नेऊन पोंचविलें. तेथें थोड्या दिवसांत त्याचें सर्वांग सडून गेलें आणि त्यांत किडे पडून तो मरण पावला.

वरील दोन कथानकांवरून, सत्संगतींत मनाला सुशिक्षण मिळणें व त्याकरितां सद्गुरूला मोकळ्यामनानें—निष्कपट प्रेमानें—शरण रिघणें ह्या गोष्टींचें केवढें मोठें महत्व आहे हें स्पष्ट कळून येतें व तें महत्व ओळखूनच धर्म, प्रेम व गुर्वाज्ञापालन यांतून एखादें न्यून असल्यास सगळीकडे आंधारच होऊन रहातो असें महाराजांनीं म्हटलें आहे. सुंदरदास म्हणतात:—

जो परब्रह्म मिल्यो कोउ चाहत,
तौ नित संतसमागम कीजै ॥
अंतर मेटि निरंतर ह्वैकरि,
लै उनकूं अपनो मन दीजै ॥
वे मुखद्वार उचार करैं कछु,
सो अनयास सुधारस पीजै ॥
सुंदर सूरप्रकाश भयो जब,
और अज्ञान सबै तम छीजै ॥

सामान्यतः व्यवहारदृष्टीनेंही उत्तम एकनिष्ठ सेवकाची वागणूक

धन्याशीं किती निरहंकारपणाची असते याविषयीं एका मार्मिक ग्रंथकारानें मोठे मजेदार उद्गार काढले आहेत तो म्हणतोः—

" इमानी चाकराची बलाय काय सांगावी? तो धन्याच्या संपत्तींत व विपत्तींत सारखा असतो. धनी बरोबरीच्या नात्यानें बोलला तरी तो आपला नम्रपणा सोडीत नाहीं. स्तुतीनें चढत नाहीं. टपका दिला तरी रागावत नाहीं. तोंडांतून वाईट शब्द निघाला तरी उलट जबाब देत नाहीं. विचारलें तर ज्यांत धन्याचें हित व प्रिय असेल तेंच सांगतो. कर्तव्य असेल तें करायला आज्ञेची वाट पहात नाहीं. चांगलें काम केलें तरी आढयता मिरवीत नाहीं. तोंडानें वल्गना न करितां जें करावयाचें तें हातानें करून दाखवितो. चुकून वाईट काम हातून घडलें तर शरमतो व क्षमा मागतो. लढाईच्या प्रसंगीं जरीपटक्यासारखा पुढें फडकतो. पैशापेक्षां इमानदारीला अधिक जपतो. धन्यासाठीं प्राण देतो. जीवित तुच्छ मानतो. धन्याच्या चाकरींत हजर रहाण्याशिवाय त्याला दुसरा लोभ ठाऊक नसतो. त्याच्या दर्शनाशिवाय त्याला दुसरें व्यसन नसतें. धन्यापासून दूर राहणें हेंच त्याचें दैन्य. त्यानें आपलीं सर्व इंद्रियें स्वामिचरणीं अर्पण केलेलीं असतात. तो धन्यासाठीं डोळस असून आंधळा होतो. कान असून बहिरा होतो. तोंड असून मुका होतो. सगळें जाणत असून अजाणपणाचें सोंग घेतो. हातपाय शाबूत असून लंगडा होतो. फार काय सांगावें? पुरुष असून धन्याच्या हितासाठीं नपूंसक बनतो. म्हणूनच म्हटलें आहे कीं " भाग्येनैव हि लभ्यते पुनरसौ सर्वोत्तमः सेवकः । "

ह्याच कल्पनेचें अत्युच्च पारमार्थिक स्वरूप पहावयाचें असल्यास तुकाराम महाराजांचे पाइकाचे अभंग वाचावे.

**निरहंकार सेवा**—आतां उत्तम शिष्याचें लक्षण व निरहंकार सेवेची सुंदर उपपत्ति महाराजांच्या प्रसादशब्दांनीं ऐकाः—

**ओव्याः**— + + + + सेवक असावा अति निर्मळ । कीं आंत बाहेरी गंगाजळ । सेवक असावा प्रतापशीळ । सूर्य जैसा ॥ सेवक असावा प्रेमळ । सेवक असावा चतुर केवळ । सेवक असावा कुशळ । स्वामिकार्यी ॥ जो स्वामिभाग्यें भाग्यवंत । जो स्वामिकार्य करावया निश्चयवंत । जयाची प्रज्ञा मंहत ।

होऊनि बैसे ॥ जयाच्या क्रियेचें फळ । स्वामीचि भोगी सकळ । परी भाग्यपणाचें[१] शिरोळ । जयास लाहे ॥ स्वामीची आज्ञा परम प्रमाण । सर्वदा गर्वरहित दीन । परी न करीच याचन । विषयी जना ॥ स्वामी सद्गुरु नारायण । सेवक पालनशील विदितगुण । तरीच स्वामीसेवकपण । अक्षय चाले ॥ एरवीं मोलाचियासाठीं । धावती स्वामीचिया पाठीं । ते द्रव्यसेवकता गोमटी । उपयोगा नये ॥ कोणाचें सेवकपण । जितां स्वामीहित नेणती आपण । मग मेलिया विकारवश होवोन । देती प्राण जनलाजे ॥ एकान्तीं परसंगसंपत्ति । भोगोनि गेलिया निजपति । जनलाज जावया सती । जिये जैसी ॥ असा हें आणिकांचें मत । सेवक वर्णू प्रस्तुत । जयाचिया सेवे भगवंत । स्वामिपणा घेवों लाजे ॥ कीं मजहूनि या जगीं कीर्ति । सेवकास देवोंपाहती श्रुतिस्मृती । हेंचि ईर्ष्या धरोनि चित्तीं । चाले श्रीपति मागें पुढें ॥ जे अभिमान वाहतीं आंगीं । आम्ही हरीचे भूषावयालागीं । या तातवचन चौरंगीं । बैसला जो ॥ विषयाचें करितां ध्यान । संग होय दारुण । आणि संगापासून । उपजे काम ॥ कामात्क्रोध क्रोधें मोह । मोहें हारपे स्मृतिसमूह । स्मृतिनाशीं प्रज्ञाडोह । आटे सकळ ॥ प्रज्ञानाशें विनाशन । या अवघियांचें कारण । निश्चयें विषयचिंतन । तिया चिंतनाकारण । अनात्माहंता ॥ ती मारोनि अनात्माहंता । ज्यानें साधिली दीनता । तेणें सगोत्र रिपूच्या माथां । घातले घाय ॥ लीनता घेवोनि अंतरीं । होवोनि साखरेची सुरी । प्रवेशोनि जिव्हारीं । मारिले वैरी कामादि ॥ एक दास्य करावयासाठीं । लटिकी देहबुद्धि पुवोनि पोटीं । जहाले भगवच्चरणपेटी । हृदय जयांचें ॥ देहाचे माथां वर्णाश्रम । वर्णाश्रमा विहित कर्म । विहित कर्म सांगे निगम । निगम आज्ञा स्वामीची ॥ सेवका आज्ञा स्वामीची प्रमाण । तेथ कामानये हूंचूंपण । याचलागीं वेदवचन । निष्कारण पाळी जो ॥ तया सेवकत्वाचिया गुणीं । ऐसेंही वाहे अंतःकरणीं । कीं काळ खाये क्षणोक्षणीं । शरीराइसा । माझा गेलिया प्राण । मग स्वामिआज्ञा पाळील कवण । येणें भयें शिकवी जन । वेदाज्ञा पाळोनी ॥ जयाचा सकाम कर्मी संन्यास । निष्काम कर्मी अति हव्यास । आपणा ऐसें स्वामीस । सेवक यावें म्हणूनी ॥ स्वामी आपुला बळवंत । तया जिंकूं न शके कोणी हे यथार्थ । परी भयें अंतरी अद्भुत । न होवावे कोणी ॥ स्वामी आपुला अति उदास । हाता-

---

१ शिरोमणित्व

तळींचे जीव निःशेष । जाहाले दारापुत्र दास । तरी तिकडे पाहेना ॥ ऐसा आपुलिया सद्गुणीं । सेवक हाट भरोनी । विना मोलें स्वामिचरणीं । अर्पावे ते ॥ एवं सेवकाची देखोनि सेवा । ऐसें वाटों लागे देवा । कीं माझी नित्यतृप्ति जीवा । जिंकणें शक्य ॥ सेवकाचिया मोहेंकरून । स्वामी विसरे स्वामीपण । तें हळुहळु आपण । सेवकआंगीं जडों पाहे ॥ मग अत्यंत भेदाचा ठावो पुसे । स्वामीच्छेनें संबंध उल्हसे । जो निरूपिला असे । अगास्तिगीतेमाजीं शिवें ॥ ※ ※ ※ प्रेमनिकुंज. तृ॰ वल्ली.

याप्रमाणें सेवक लक्षण सांगून पुढें महाराज निरहंकार सेवेची युक्ति वर्णन करितातः—

जे दास्यादि भाव । ज्ञानापूर्वी सकाम सर्व । तेचि निष्काम होती स्वयमेव । ज्ञानोत्तर ॥ तरी मुक्तीहून श्रेष्ठ हरीचे गुण । अद्वैती आहार्यद्वैतें भजन । केलिया मधुराद्वैताश्रयान । कळतो ते निर्वाण ॥ भागवत सांगे ॥ "नैवात्मनः प्रभुरयं निजलाभपूर्णो मानं जनादविदुषः करुणो वृणीते । यद्यज्जनो भगवते विदधीत मानं तच्चात्मने प्रतिमुखस्य यथा मुखश्रीः ॥"

भागवत स्कं॰ ७ अ॰ ९ श्लो. १०

ओव्या—अज्ञ जीवापासोनी । पूजा न इच्छी मोक्षदानी । जो नित्यतृप्त सर्वांहुनि । एक आणि अद्वितीय ॥ जो सर्वदां पूर्ण जगजेठी । तो सेवा इच्छील कासयासाठीं । परी दयाळू म्हणोनि शेवटीं । अनुमोदन दे सेवेसी ॥ थोडी परीक्षा पहावया जरी ॥ सेवा इच्छील पूतनारी । तथापि जीवाकडोनि क्षणभरी । सेवा सर्वथा घडेना ॥ पन्नास सहस्र योजनें शरीर । जयाचा पलंग कश्यपकुमर । तयासी चंदन लावावया साचार । कोण निर्धार करील कैसा ॥ गरुडासी धुवोनि चारील अन्न । ऐसें कोण निर्मील पक्वान्न । कीं वैकुंठीं चंदनसडासंमार्जन । कोण संपूर्ण पाळील हो ॥ क्षीराब्धीहूनि श्वेतवर्ण । ऐसें रमेचें लुगडें धुईल कवण । जयाचे शशीसूर्य दोन्ही नयन । कोण अंजन घालील ॥ जो चराचराचा करी ग्रास । कोण नैवेद्य दावील त्यास । सेवा करूं म्हणतां विशेष । कोण जाणता लाजेना ॥ जो नित्यतृप्त जगजेठी । तो भक्तास्तव आला वैकुंठीं । जयविजयादिकांची सेवा पोटीं । दावासाठीं

अंगिकारी ॥ जो यज्ञांत नेघे अवदान । तो गोपाल शिदोऱ्या मिटक्या देऊन । प्रेमें करीतसे भक्षण । नवलविंदान देवाचें ॥ म्हणवुनी स्वामीसेवाकरणी । हे स्तुतीमात्रचि बोलणी । परी करुणानिधान चक्रपाणी । तो अनुमोदन दे भक्तासी । मियां अनुमोदन न देतां । तरी सेवाचि अपराध होईल तत्वतां । तेणें जाणे लागे यमपथा । माझिया भक्ता प्रेमळा ॥ ईश्वरानुमोदनाविण । जें करणें निषिद्ध पूर्ण । म्हणूनि सेवेसी अनुमोदन । देतो आपण परमात्मा ॥ गरुडासारिखें सुंदर आसन । तयासी संध्यापात्र देऊन । काय पूजेचें प्रमाण । अधिक होय ॥ कौस्तुभ भूषण जयाचे कंठीं । तयासी वाहणें कांचोटी । चंद्रसूर्य नयन जगजेठी । अलंकार घालणें काय तया ॥ जया क्षीराब्धीमाजों शयन । चरणीं वाहे गंगाजीवन । तया पंचामृतादि स्नान । महाछल जाण सेवाभिमानें ॥ रायावरीं केर उधळतां । दंडयोग्य अपराध सर्वथा । तैसी जीवाची सेवा भगवंता । न अनुमोदितां अपराधू ॥ इतकेंही असोनि पाहिजे भोग । तरीं सत्यसंकल्प गोपिकारंग । तो भिकारिया जीवासी चांग । भीक कासया मागेल ॥ परंतु तैसें सर्वथा नाहीं । जो करुणावल्लभ शेषशायी । तो अनुमोदन देतो लवलाहीं। भक्ताचि साठीं॥ कोठें माला वैजयंती। कोठें गुंजांचे हार मिरविती । कोठें अमृतपाल देव वाढिती । गौळियां लोणी मागणें कोठें ॥ इंद्रादिकांच्या मुकुटांचें तुकडे । नमन करितां पडती द्वारापुढे । तयासी मयूर-पिच्छ भूषण रोकडें । कोण नवल न मानील ॥ " म्हणोनि मयाजी जे जाहले । ते माझिया सायुज्या आले । जिहीं उपचार मिचें दिधलें । आपणपें मज ॥ अर्जुना माझे ठायीं । आपणपेंवीण सौरस नाहीं । मी उपचारें कवणाही । नाकळे गा ॥ एथ जाणीव करी तोचि नेणें । आथिलेपण मिरवी तेंचि उणें । आम्ही जाहलों ऐसें जो म्हणे । तो कांहींचि नव्हे ॥ अथवा यज्ञदानादि किरिटी । कां तपें हन जे हुटहुटी । ते तृणा एकासाठीं । न सरे येथ ॥ पाहे पां जाणिवेचेनि बळें । कोणी वेदापासूनि असे आगळें । कीं शेषाहूनि तोंडाळें । बोलकें आथी ॥ तोहि आंथुरणा तळवटीं दडे । येरु नेतिनेति म्हणोनि बहुडे । एथ सनकादिक वेडे । पिसे जाहले ॥ करितां तापसांची कडसणी । कवण जवळां ठेविजे शूळपाणी । तोहि अभिमान सांडोनि पायवणी । माथां वाहे ॥ नातरी आथिलेपणें सरिसी ।

कवणी आहे लक्ष्मीये ऐसी । श्रियेसारखीया दासी । घरीं जियेतें ॥ तिया खेळतां करिती वरकुलीं । तयां नामें अमरपुरें जरी । तेविलीं । तरी न होती काय वाहुलीं । इंद्रादिक तयांचीं ॥ तिया नावडोनि जेव्हां मोडती । तेव्हां महेंद्राचे रंक होती । तिया जिया झाडाकडे पाहती । ते कल्पवृक्ष ॥ ऐसिया जियेंचिया जवळिका । सामर्थ्य घरींचिया पाइका । ते लक्ष्मी मुख्य नायिका । न मनेचि येथ ॥ मग सर्वस्वें करूनि सेवा । अभिमान सांडोनि पांडवा । ते पाय धुवावयाचिया दैवा । पात्र जाहली ॥ म्हणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे । एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे ॥ जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळिक माझी ॥ अगा सहस्रकिरणाचिये दिठी । पुढां चंद्रहि लोपे किरीटी ॥ तेथ खद्योत कां हुटहुटी । आपुलेनि तेजें ॥ तैसें लक्ष्मियेनें थोरपण न सरे । जेथ शंभूचेंही तप न पुरे ; तेथ येर प्राकृत हेंदरें । केवीं जाणों लाहे ॥ यालागीं शरीरसांडोवा कीजे ; सकल गुणांचें लोण उतरीजे । संपत्तिमद सांडिजे । कुर्वंडी करोनि ॥ ''

ज्ञानेश्वरी अ० ९ श्लो० २५

एवं हृदयाचार्यवचनें । सेवा सांगति निरभिमानें । एरवीं तेथ प्रमाणें । सामर्थ्य कायां ॥ परी नित्य तृप्त देव । म्हणोनि सेवा न करील जीव । घालील वेदान्ताचा आव । तरी आसुरस्वभाव गणावा तो ॥ रायाचे घरीं पैका थोर ; म्हणोनि न दे नेमिला कर । तरी प्रजा नव्हे तो चोर । दंडावा सान्तार सर्वभावें । आपण यथेष्ट विषय भोगी । नित्य तृप्त मानोनि देवालागीं । जो सेवाचोर होय श्रीरंगीं । तया असिपत्रचौरंगीं यम दंडी ॥ अल्पहि देवासि वहावें । परी जीवितान्त श्रम करावें । कोटीकल्प श्रम करोनियां आघवे । अल्पचि होय ईश्वरा ॥ परंतु श्रमहि केलियाविण । केवळ प्रेमें फळफूलपान । उदकहि वाहतां घे नारायण । हें करुणानिधान स्वयें वदती ॥ '' पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ गीता, अ०. ९ श्लो० २६ आपण वैसे पलंगीं । देवासी वैसवी शिलाचौरंगीं । आपण पुरणपोळी भक्षी घृतांगी । देवासी वाहे उदक जरी ॥ तरी ती सेवा नव्हे थट्टा । उगा दंभ कां दावितो चोरटा । परी प्रेम असलिया अंतरीं मोठा ! मग त्याचा अव्हाटा हरि न पाहे ॥ भक्तमालेंत कथा ऐसी । कीं विदुरगृहीं हृषीकेशी । केळें उकलोनि तयासी । विदुरपत्नि देतसे ॥ जेऊं घालावें देवा लौकरी । म्हणवुनी

साल्टेंचि घाली करीं । आणि आपण बैसावें देवाबरोबरी । म्हणोनि केलेंचि भक्षी ॥ परी तेंहि आनंदें देवाधिदेव । सेवितां प्रफुल्लित स्वभाव । विदुर पातला तंव । अकस्मातचि ॥ तयानें क्रियेचा प्रमाद दाविला । तेव्हांचि नियेसी उमज पडला । मग क्षमा मागोनि स्तविला । देवराणा ॥ परी नाहीं केलें मंडण । कीं निलतृप्त नारायण । तयासी सालें दिधलिया जाण । नैवेद्यचि घेई म्हणोनी ॥ चुकीचाकी नसे प्रेमीं । देह स्मरल्या दास्यधर्मी । वर्तावें मनोवाचाकर्मी । सेवार्थ झटूनीं ॥ हृदयाचार्य पुढती । द्वापरींच्या श्लोक मंत्राचें उपानषत करितां । तेंहि ऐकावें अधिकारीं समस्तीं । जे भक्तिपंथीं ब्राम्हण जाहले ॥

“ मग निःसीम भावउल्हासें । मज अर्पावयानिमित्तें । फळ एक आवडे तैसें । भलतयाचें हो ॥ भक्त माझियाकडे दावी । आणि मी दोन्ही हात वोडवीं । मग देठ न फेडितां सेवीं । आदरेंसी ॥ कां गा भक्तीचेनि नांवें । फूल एक मज द्यावें । तें लेखें तरी म्यां तुरंबावें । परी मुखींचि घाली ॥ हें असो कायसीं फुलें । पानचि एक आवडतें जाहलें । तें साजुकहि न हो सुकलें । भलतैसें ॥ परी सर्वभावें भरलें देखें । आणि भुकेला अमृतें तोखे । तैसें पत्रचि परि तेणें सुखें । आरोगूं लागे ॥ अथवा ऐसेंहि एक घडे । जे पालाहि परी न जोडे । तरी उदकाचें सांकडें । नव्हेल कीं ॥ तें भलतेथ निर्मोलें । न जोडतां आहे जोडलें । तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें । जेणें मज ॥ तेणें वैकुंठापासोनि विशाळें । मजलागीं केलीं राउळें । कौस्तुभाहोनि निर्मळें । लेणीं दिधलीं॥ दुधाचीं सेजारें । क्षीराब्धिऐसीं मनोहरें । मजलागीं अपारें । सृजिलीं तेणें ॥ कर्पूर चंदन अगरु । ऐसेया सुगंधाचा महामेरु । मज हातिवा लाविला दिनकरु । दीपमाळे ॥ गरुडासारिखीं वाहनें । मज सुरतरूंचीं उद्यानें । कामधेनूंचीं गोधनें । अर्पिलीं तेणें ॥ मज अमृताहूनि सुरसें । वोनीं ओगरिलीं बहुवसें । ऐसा भक्ताचेनि उदकलेशें । परितोषे गा ॥ हें सांगावें काय किरीटी । तुवांचि देखिलें आपुलिया दिठी । मी सुदामयाचिया सोडीं गांठी । पव्हयासाठीं ॥ पैं भक्ति एकी मी जाणें । तेथ सानें थोर न म्हणें । आम्ही भावाचे पाहुणे । भलतेया ॥ येर पत्रपुष्पफळ । हें भजावया मिस केवळ । वांचूनि आमुचियालागीं निष्कळ भक्तितत्त्व ॥ म्हणोनि

अर्जुना अवधारीं । तूं बुद्धि एकी सोपारी करीं । नगें सहजें आपुलिया मनोमंदिरीं । न विसंबे मातें ॥ " ज्ञानेश्वरी ९-२६

परी कुवरपणाविण । हें प्रेमेंचि लाभे संपूर्ण । प्रेमें तटस्थाहि होतां जाण । भक्ति म्हणोन पैं थारे ॥ भक्ति देणें आणि रक्षणें । हेंहि स्वयेंचि कीजे नारायणें॥ म्हणोनि प्रेमाचिया अभिमानें । फुंजतां नये ॥ 'जे अभिमान वाहती आंगीं ।' इत्यादि वचनें प्रसंगीं । कीं अभिमानहि प्रेमसंगीं । शोभा पावे ॥ परी अभिमानाचिया चौरीं । प्रेमाचें नव्हे हळुवें भारी ॥ म्हणोनि निराभिमानेंहि कुसरीं । वदले तात ॥

" पैं सर्व भावेंसि उखितें । जे वोपिले मज चित्तें । जैसा गर्भगोळ उद्यमातें कोण्याहि नेणे ॥ तैसा मीवांचूनि कांहीं । आणिक गोमटेंचि नाहीं । मजचि नाम पाहीं । जिणेया ठेविलें ॥ ऐसें अनन्यगतिकें चित्तें । चिंतितसाते मातें । जे उपासिती तयांतें । मीचि सेवीं ॥ ते एकवटोनि जिये क्षणीं । अनुसरले गा माझिये वाहणी । तेव्हांचि तयांची चिंतवणी । मजचि पडली ॥ मग तिहीं जे जें करावें । तें मजचि पडलें आघवें । जैसी अजातपक्षाचेनि जीवें । पक्षिणी जिये ॥ आपुली तहानभूक नेणे । तान्हया निकें तें माउलीयाचि करणें । तैसे अनुसरले मज प्राणें । तयांचें सर्व मीं करीं ॥ तयां माझिया सायुज्याची चाड । तरि तेचि पुरवीं कोड । कां सेवा म्हणती तरी आड । प्रेम सुये ॥ ऐसा मनीं जो जो धरिती भावो । तो तो पुढां पुढां लागे तया देवों । आणि दिधलियाचा निर्वाहो । तोहि मीचि करीं ॥ हा योगक्षेम आघवा । तयांचा मजचि पडला पांडवा । जयांचिया सर्वभावा । आश्रय मीं ॥

ज्ञानेश्वरी अ० ९ श्लोक २२

एवं हृदयाचार्यश्रुति । आणि ' मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा ' हें भक्तिसूत्रोक्ति । समन्वय करीत प्रीति । कीं संतकृपें वा भगवत्कृपालेशें प्रेम मिळे॥ येथ विकल्प यावयाचें कारण। कीं खरा दास साधूचा आपण । यालागीं भगवंत भेटेचि तयाकारण । परी सत्संगनिरपेक्ष । नोहे विकल्पार्थू ॥ आतां श्री तुकारामवाणी । ती तंव प्रत्यक्ष विनवणी । भगवंतासी करोनी । याचिला प्रेम ॥ अभंग । माझे हातीं आहे करावें चिंतन । तुम्ही कृपादान प्रेम द्यावें ॥१॥ मायबापें भोळीं आळवण । नामाचें जतन दातियासी ॥ २ ॥ बाळक धांवोनी

आड निघे स्तनीं । घालावा जननी कृपें पान्हा ॥ ३ ॥ तैशापरी पुढें तुझिया मी आशं । धांवोनी ओरसें देई भेटी ॥ ४ ॥ तुका म्हणे करी कासवाचे परी । आहे सूत्रदोरी तुझे हातीं ॥ ५ ॥ प्रेमनिकुंज. तृतीया वल्ली.

याप्रमाणें निरहंकार युक्तीनें सद्गुरूला शरण गेलें म्हणजे त्यांच्या शिक्षणचर्येनें मनाचे रागद्वेष नाहींसे होतात, रागद्वेष नाहींसे झाले म्हणजे बुद्धीचे दोष क्षीण होऊन साधक 'सततयुक्त' होतो व सततयुक्त मनानें सद्गुरूची श्रवणादि नवविध भक्ति घडूं लागली म्हणजे त्यांच्या प्रसादानें मधुराद्वैतबोधक बुद्धियोग त्याला प्राप्त होतो.

बुद्धीचे एकंदर तीन दोष, त्यांचे अनर्थ. व सद्गुरूच्या शिक्षण-चर्येनें ते टळण्याचे उपाय त्रिपुरारहस्याच्या ज्ञानखंडांत सांगितले आहेत. ते येणेंप्रमाणें:---

"बुद्धौ तु बहवो दोषाः संति सर्वार्थनाशनाः । यैर्जनाः सततंत्वेव पच्यंते घोर संसृतौ ॥ तत्राद्यः स्यादनाश्वासो द्वितीयः कामवासना । तृतीयो जाड्यता प्रोक्तास्त्रिधैवं दोषसंग्रहः ॥ द्विविधः स्यादनाश्वासः संशयश्च विपर्ययः । मोक्षोस्ति नास्ति वेत्याद्यः संशयः समुदाहृतः ॥ नास्त्येव मोक्ष इत्याद्यो भवेदत्र विपर्ययः । एतद्द्वयं तु तात्पर्ये मुख्यं स्यात्प्रतिबंधकं ॥ विपरीतनिश्चयेन नश्येदे-तद्द्वयं क्रमात् । अनाश्वासस्य मूलं तु विरुद्धतर्कचिंतनम् ॥ तत्परित्यज्य सत्तर्का-वर्तनस्य प्रसाधने । कामादिवासना बुद्धेः श्रवणे प्रतिबंधिका ॥ कामादिवास-नाविष्टा बुद्धिर्नैव प्रवर्तते । कामादि वासनां तस्माज्जयेद्वैराग्यसंपदा ॥ यस्तृतीयो बुद्धिदोषो जाड्यरूपो व्यवस्थितः । असाध्यः सोऽभ्यासमुखैः सर्वथा ऋषिस-त्तम ॥ येन तात्पर्यतश्चापि श्रुतं बुद्धिमनारुहेत् । तत्रात्मदेवतासेवामृते नान्यद्धि कारणम् ॥ "

सामान्य जीवांचें मन विषयध्यानानें अयुक्त झालेलें असतें व "नास्ति बुद्धिरयुक्तस्य" या भगवद्वचनाप्रमाणें त्यांचे सर्व व्यवहार निर्बुद्ध स्थितींत होत असतात. त्यामुळें त्यांचा बुध्दिनाश होऊन

स्वर्गसंसारादि दुःखपरंपरा त्यांस कशी भोगावी लागते हें "ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते । संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते । ............................ स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥" ह्या भगवद्गीतेच्या श्लोकयुग्मांत व वर दिलेल्या महाराजांच्या ओव्यांत सांगितलें आहे. तथापि सुखाची इच्छा ही सर्वांच्या व्यवहारप्रवृत्तीला मूळ आणून व सुखाच्या गोडीला चिकटून राहण्याचा मनाचा सद्गुण ओळखून भगवत्प्रेमाच्या युक्तीनें संत त्याला युक्त बनवितात व आपल्या रक्षण-शिक्षणादि अनुग्राहक पध्दतीनें त्यांत सद्बुध्दीचें बीजारोपण करून, पुढें सततयुक्त होऊन बुध्दियोगाच्या प्रसादाला पात्र करण्याकरितां त्याला सद्गुरुशरणैकत्वाचा बोध करितात.

येथपर्यंत अल्पमतीनें महाराजांच्या रक्षण व शिक्षणचर्येचें वर्णन झालें. आतां, शिष्य सर्वस्वी आधीन झाल्यावर सद्गुरु त्याची निष्ठा कशी कसून पाहतात, व त्याच्या मनाचें दमन करून आपल्या वृत्तिविद्याप्रभावानें कामक्रोधांचे वेग सहन करण्यास त्यास कसे शिकवितात याविषयीं वैदिक गुरूंच्या पध्दतीचें किंवा महाराजांच्या शिक्षणक्रमांतील तिसऱ्या रक्षणशिक्षणपध्दतीचें थोडें दिग्दर्शन करूं.

**शिष्याच्या अंतर्निष्ठेची कसोटी**—शिष्याच्या मनाला शिक्षण देऊन त्याची अंतर्निष्ठा परिक्षून पाहण्याची प्राचीन रीति गुरुचरित्रांत वर्णन केली आहे. त्या ओव्या ह्याः—पूर्वी गुरूची ऐसी रीती । शिष्याकरवीं सेवा घेती । अंतःकरण त्याचें पाहती । कैसें निर्वाण शिष्याचें ॥ पाहोनियां अंतःकरण । असे भास्कि निर्वाण ।

कृपा करितां तत्क्षण । मनकामना पुरवितो ॥

अध्याय १६ ओ० ४४–४५

ह्या रीतीचें अधिक स्पष्टीकरण श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या 'स्वात्मानुभवांत' सांपडतें तें येणेंप्रमाणें:—" शिष्याचे तोडावया पाश । समाधानें न बोले तयास । शब्दाप्रति काठिणांश । बोलोनिचि जाय ॥ जो जो शिष्याचा अवगुण । तितका सांडवी तयाकडोन । नायके तरी एक क्षण । न राहे तेथें ॥ अथवा पडलिया हठीं । क्षणक्षणा सांगे निजगोठी । जितुकें पडे तयाचे दृष्टी । तयाचा सांगे निरास ॥ शिष्यासि म्हणे सावधान । आपण राहे द्रष्टा होऊन । चित्त स्वस्थ करून । प्रवर्ते हिता ॥ शिष्य आडवाटा भरूं जाय । विषय अथवा सगुण ध्याय । वज्रप्राय वचनघाय । हाणोनि करी दृढता ॥"

मोठमोठ्या-संयमशीलांचेंहि मन विषयवासनेंत कशा उड्या मारीत असतें याविषयीं " यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः । इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः " ॥ हें गीतावचन प्रसिध्दच आहे. व " येऱ्हवीं बाह्य विषय तरी नाहीं । परी मानसीं होईल जरी कांहीं । तरी सावंतांचे पाहीं । संसार असे ॥ जैसा कां विषाचा लेशु । घेतलेया होय बहुवसु । मग निभ्रांत करी नाशु । जीवितासी ॥ तैसी विषयाची शंका । मनीं वसतां देखा । घात करी अशेखा । विवेकजातां ॥ × × ज्ञाने० २–६१ × × पैं तोंड भरो कां विचारा । आणि अंतरीं विषयांसी थारा । तरी कोटी वेंचें धनुर्धरा । न पविजे मातें ॥" असें ज्ञानेश्वरीतहि वर्णन आहे.

ह्या आपत्तींतून शिष्याची सोडवणूक करण्याकरितां सद्गुरु त्यांच्या मनोरूप उपाधीला कसे त्रास देत असतात व क्षणोक्षणीं त्यांची ज्ञाननिष्ठा व भक्ति कशी कसून पहात असतात याविषयीं योगवासिष्ठांतील चूडालाख्यान व महाभारताच्या आदिपर्वांतील धौम्यऋषींचें कथानक हीं पुरेशीं उदाहरणें आहेत. महाराज आपल्या साधुबोधांत म्हणतात:—" परमार्थांत मनालाच शिक्षा द्यावयाची असल्यामुळें गुरु हे देहउपाधीपासून दूर करण्याकरितां त्याला त्रास देतात. परंतु परमार्थाकरितां मृत्युसारखाच ज्याचा निश्चय झाला आहे तो त्या त्रासाविषयीं कुरकुरहि करीत नाहीं. " पृ० १७५

परमार्थाच्या आवडीसाठीं उत्तम शिष्याला मृत्युसारखाहि निश्चय किती गोड वाटत असतो या विषयीं ज्ञानेश्वरीमधील दोन तीन सुंदर दृष्टांत येथें घेतों:—

" जरी आवडी आथि साच । तरी जीवितहि वाटे असलच । काय सती जातां रोमांच । देखिजती सतीये ॥ × × माझी तनु आणि प्राण । इया पाउवा लेवूं श्रीचरण । करूं भोगमोक्ष निंबलोण । पायां तयां ॥ × × देईल गुरुसेवा । इया बुद्धि पांडवा । शत जन्माचा सांडोवा । करिती जे ॥ " मयूरपंत म्हणतात:—
असोत तुज आमुचीं सकल भावुकायुर्बळें । जगोनि बहु काय म्यां सुकृत जोडिलें दुर्बळें । असें प्रियसख्या सुखी बहुतकाळ माया-तमीं— । जनां सुपथ दाखवीं मुदित सत्तमा यांत मी ॥

**प्राचीन गुरुशिष्यपद्धतिः**—हें वर्णन धर्मग्लानीच्या ह्या सद्यः-स्थितींत समाजाला मोठेंसें रुचिर वाटणार नाहीं हें स्वाभाविक आहे.

कारण सांप्रत गुरुत्वाची जबाबदारी बहुतेक गुरुवर्गांतून नाहींशी होऊन शिष्यावरच तेवढी शिष्यधर्माची जबाबदारी लादली जात आहे व पूर्वी-चा देव आणि भक्त किंवा पिता आणि पुत्र यांच्याशीं तुलना करण्या-सारखा गुरुशिष्यसंबंध जाऊन त्याठिकाणीं हल्लीं दुकानदार व गिऱ्हाइक अशा सारखा केवळ भाडोत्री संबंध झालेला आहे; त्यामुळें या प्राच्य पोपरीच्या ( Popery ) जुलुमाला कंटाळून नवशिक्षित वर्गातून पुरातन उदात्त स्वरूपाच्या गुरुशिष्यपद्धतीला बहु-तेक फाटा मिळत आहे. अशास्थितींत वरील प्रकारचीं वैदिक कालांतील गुरुशिष्यसंबंधाचीं वर्णनें निरस किंबहुना क्रूरपणाचीं वाटावीं यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

तथापि, गुरुभक्तिवर्णनाच्या ह्या वैदिक आर्षकथा व प्राचीन महाराष्ट्रसंतांनीं गाइलेल्या कथा म्हणजे त्यांच्या क्रूर स्वभावाचीं प्रदर्शनें नसून, तीं निस्सीम मातृप्रेमाच्या वात्सल्यरसाचीं रसाळ कथानकें, किंवा वत्सलसंमित उपदेशाचीं अभिनव उदाहरणें होत. याविषयीं प्रसिद्ध महाराष्ट्रसंतशिरोमणी तुकाराम महाराजांचा एकच अभंग येथें प्रमाण घेतो:—

पुढिलिया मुखें निंब देतां भलेबहुत वारले होय दुःख॥१॥हें तों वर्म असे माऊलीचे हातीं। हाणी मारी प्रीति हितासाठीं॥२॥ खेळतां विसरे भूकतानघर। धरूनियां कर आणी बळें॥३॥ तुका म्हणे पाळीं नोंडीचिया घांसे। उदार सर्वस्वें सर्वकाळ॥ ४॥

हा विषय महाराजांच्या " साधुबोधांत " फार समर्पक दृष्टांतानें वर्णन केलेला आहे व त्यांत विरुद्ध आक्षेपांचें उत्तम खंडणहि केलेलें आहे. तीं प्रश्नोत्तरें प्रसंगोचित जाणून येथें उतरून घेतो:—

प्रश्न.--अहो पण तुमच्या वैदिक धर्मांतले गुरु अतिशय क्रूर असतात. महाभारतांत अशी कथा आहे कीं, एका गुरुनें आपल्या शिष्याला खाण्यापिण्याची इतकी बंदी केली कीं, शेवटीं तो रुईचें दूध पिऊन आंधळा होऊन विहिरींत पडला. तसेंच वैदिक धर्मांतील देवहि अतिशय क्रूर आहेत. श्रियाळराजाचा बाळच महादेवानें खाण्यास मागितला.

उत्तर.--जिला जेऊं घालण्याची संवय आहे तीच आई तोंडांत थापड मारण्याला समर्थ असते. नेभळ्या नपुंसकाची शांति कांहीं सुधारण्याला कारण होत नाहीं. रुईचें दूध पिऊन विहिरींत पडलेल्या शिष्याला त्याच्याजवळ जाऊन गुरुनेंच त्याला कुमारांचें स्मरण करावयास सांगितलें व डोळे देवविले. श्रियाळाचा मुलगा शंकरानेंच आणून दिला. असन्निहित वाक्य घेऊन शंका करणें सारसन्निवेशाचें अज्ञान होय. शिवाय ज्या उपाधीला शिक्षा द्यावयाची असते त्या उपाधींत त्रास देणें, हें शिक्षकाचें प्रासंगिक कर्तव्यच आहे. याविषयीं लहानपणची मी एक गोष्ट सांगतों:--लहानपणीं मास्तरांस मी रंगोपंताच्या शाळेंत जात असे; परंतु तेथें खोड्या फार करीत असे. रंगोपंत वारंवार म्हणत असत कीं हा गुणासाठीं मार खात नाहीं; पण खोड्यासाठीं मार खातो. एके दिवशीं मी खोड्या केल्या तेव्हां तरवडचे फोक तोडून आणून रंगोपंत म्हणाले, काढरे गुलाम्या आंगरखे; व नंतर आंगरखे काढल्यावर मला तरोड्याच्या फोकानें चांगलें झोडून काढलें. यावरून काय बोध घ्यावयाचा कीं, आंगरख्याच्या आंत जो माझा देह होता त्याला शिक्षा करावयाची असल्यामुळें आंगरख्याचा उपाधी दूर करून नंतर देहाला झोडून काढलें. याप्रमाणेंच परमार्थांत मनाला शिक्षा द्यावयाची असल्यामुळें, गुरु हे देह उपाधींपासून दूर करण्याकरितां त्याला त्रास देतात; परंतु परमार्थाकरितां मृत्युसारखाच ज्याचा निश्चय झाला आहे तो त्या त्रासाविषयीं कुरकुरहि करीत नाहीं. तितका ज्याचा निश्चय नाहीं, त्यालाहि सक्तीनें शिक्षा देणारे गुरु मात्र खरे. हल्लींच्या आमच्यासारख्या गुरूंत व पूर्वींच्या ऋषींत इतकाच काय तो फरक आहे. बाकी त्या ऋषींच्या क्रौर्याचें आम्हांला भूषणच वाटतें; व त्यांच्यासारखे आतां जे असतील त्यांच्याविषयींहि वाटतें.

प्रश्न.--तर मग गुरु, शिष्याला एकदम कापून कां टाकीत नाहींत ?

उत्तर.--एखाद्या रोग्याला कापण्याकरितां विष सुंगविणारा वैद्य एकदम मारूनच कां टाकीत नाहीं? असें विचारण्यासारखाच हा प्रश्न आहे. देहापासून मन व मनापासून आत्मा जो वेगळा करावा लागतो, तो मंथन करून करावा लागतो. मेल्यावर मन महानिद्रेंत जातें. त्या ठिकाणीं मंथन होऊन लोण्याप्रमाणें तें उपाधीपासून पृथक करणें शक्य नसतें. गुरूनें दिलेला प्रणव ही वरची अरणी आणि आपला देह खालची अरणी, या दोहोंमध्यें ध्यानरूपी निर्मंथन केलें असतां आत्मरूप अग्नि उत्पन्न होतो, अशी श्वेताश्वतर श्रुति सांगते. तव्हां हें काम जागृतींतच व्हावयाचें असल्यामुळें, अधिकारी शिष्याच्या नाशाचें गुरूला कांहीं प्रयोजन नाहीं; आणि जो उन्मत्त आहे, ज्याचा अधिकार अन्य जन्मावर अवलंबून आहे, त्याचा शापानें नाश करून अन्य जन्मीं दया करण्यासहि तपस्वी गुरु समर्थ असतातच, याविषयीं उपनिषदेंतील इंद्रानें केलेल्या कोटि संन्याशाच्या वधाची कथा प्रमाण आहे; परंतु यांत एक रहस्य आहे, तें हें कीं, गुरुजनांचा वर भयंकर नाहीं, तसा शापहि भयंकर नाहीं; पण उपेक्षा मात्र भयंकर आहे; कारण या जन्मीं अशरणाला अन्य जन्मींहि तो तारक होत नाहीं. सर्व वैदिक ग्रंथांचा असाच सिद्धांत आहे.

प्रश्न.--वेदानें एक खरें सांगितलें असतां अनेक प्रकारचे ग्रंथ तयार कशाला झाले? व अनेक प्रकारचे ग्रंथ असतांहि पुनः गुरु कशाला पाहिजेत?

उत्तर.---याविषयीं तुला एक गोष्ट सांगतोः---एका आईचें मूल सर्वदां खेळण्यामध्यें निमग्न असे. जोपर्यंत खेळगडी जवळ असत, तोंपर्यंत जेवण्याची देखील त्याला आठवण राहत नसे. खेळगड्यापासून दूर झालें म्हणजे तें आपल्या आईच्या म्हणण्याप्रमाणें जेवीत असे. म्हणून त्याच्या आईला खेळगड्यापासून दूर करून त्याला घरीं जेवावयास बोलावण्याकरितां रोज नव्या युक्त्या कराव्या लागत असत. एक दिवस सांगावें लागत असे, तुझे बाबा बोलावितात. एखादे दिवशीं तुझ्याकरितां भातकें आणलें आहे म्हणून सांगावें लागे. एखादे दिवशीं आपल्या घरीं चित्रकार आला आहे तो पहा, म्हणून सांगावें लागे. एक दिवस तर तुझी आई आजारी आहे म्हणून त्याला सांगावें लागलें. एक दिवस तुझा बाप मेला म्हणून सांगावें लागून तो रडत घरीं आला, तेव्हां बापानें सांगितलें कीं, तूं जेवावयास आला नस-

तास तर मी खराच मेलों असतों. जेवण रोजचें भाजीभाकरीचेंच होतें; परंतु खेळगड्यापासून दूर करण्याकरितां रोजच्या नव्या युक्त्या कराव्या लागत असत. त्याप्रमाणें आपलें मन इंद्रियरूपी खेळगड्याच्या स्वाधीन होऊन अनेक विषयरूपी खेळांत नेहमीं गुंतलें असतें. कधीं स्त्रीरूपी माकडाच्या गळ्यांत तें आपल्याला बांधून घेतें. कधीं कारस्थानरूपी बुद्धिबळ खेळत असतें. कधीं तें पदव्यांकरितां सारिपाट खेळतें. आत्मज्ञान व ध्यानरूपी अन्न जरी एकच द्यावयाचें असतें तरी मनाला इंद्रियरूपी खेळगड्यापासून निराळें करण्याकरितां अनेक ग्रंथांची व नित्य गुरूची अपेक्षा आहेच. ग्रंथ हें मागें झालेल्या उपाधी निराकरण करणाऱ्या उपायांचीं उदाहरणें असून सजातीय उपायाकरितां प्रमाणभूत आहेत, व गुरूंना विजातीय उपाय सुचविण्याकरितां उत्तेजक आहेत. साधुबोध पृ० १७४ ते १७७.

अशी ही आपली प्राचीन गुरुशिष्यपद्धति केवळ अमृतमधुर व मुमुक्षुजनांची स्नेहकल्पलता असून आज तिचें खरें स्वरूप लुप्तप्राय कां व कसें झालें? तिच्या विपर्यासानें पुष्कळ पंथांचा अधर्मपर व भयंकर परिणाम कसा झाला? व त्यामुळें हल्लींच्या नवशिक्षित मंडळीस तिच्याविषयीं कुतर्क करण्यास कसें फावलें? या प्रश्नाचें उत्तर महाराजांच्या अलौकिकव्याख्यानमालेंत पुढील प्रमाणें दिलें आहे:—

"गुरु हें एक परब्रह्म चैतन्य असून त्याची निराकाराश्रित व साकाराश्रित अशी दोन प्रकारची भक्ति आहे. पहिली म्हणजे गुरु जेव्हां अध्यारोप करितात तेव्हां ते ब्रह्मा, सर्व शंकांचें निराकरण करून व योग्य अपराध सहन करून शिष्याचें रक्षण करितात तेव्हां विष्णु, बाध करितात तेव्हां शिव, व ऐक्य होतें तेव्हां परब्रह्म, अशी प्रीत्यात्मक वृत्ति होणें होय. ही निराकाराश्रित सद्गुरुभक्ति केवळ परमात्मस्वरूपिणीच आहे. परंतु, गुरुशरीराचे ठिकाणीं शिष्यदृष्टीनें होत असलेला विकाराभास निराकाराश्रित सद्गुरुभक्तींतून पुनर्वृत्युत्थान करितो म्हणून त्या विकाराभासाला देखील पूर्वभक्त्यनुकूल करणें

दुसऱ्या प्रकारची सद्गुरुभक्ति म्हणतात. ज्या ज्या विकाराचा आभास होईल तत्तद्विकारोपहित साक्षीचैतन्य व्यतिरिक्त ब्रह्मचैतन्य गुरुला समजणें हें तिचें स्वरूप आहे. म्हणजे पुत्रोत्पादनकाली प्रजापतित्व, कुटुंबपालनकालीं विष्णुत्व, क्रोधारोहणकालीं रुद्रत्व, वनिताभिलाषकालीं कृष्णत्व, इत्यादि गुरूचे ठायीं समजून विकाराभासानें भक्तींत अंतर पडूं न देणें, हाच ह्या द्वितीय भक्तीचा उद्देश आहे. परंतु पहिली गुरुभक्ति शुद्ध पारमार्थिक व अद्वैत मतांतच होण्यासारखी असल्यामुळें ती सोडून देऊन पुष्कळ मतवाद्यांनीं दुसऱ्या गुरुभक्तीचाच शिष्यांना उपदेश केला. पहिल्या गुरुभक्तीचा उपदेश करण्यांत गुरुवर जी जबाबदारी आहे ती अर्थातच तिचा त्याग केल्यामुळें वगळली गेली; व भोळेभाळे लोक दुसऱ्या गुरुभक्तीनें प्रतिबद्ध झाल्यामुळें, गुरूंनीं क्रोध केला असतां त्याला रुद्र समजावें, अशा प्रकारची समजूत करून देऊन पुष्कळ साधू म्हणवून घेणारांनीं गरीब लोकांवर इटालियन लोकांप्रमाणें आर्यधर्मांतही पोपरी स्थापिली. त्या पोपसत्तेमुळें हल्लींचे सुशिक्षित लोक कंटाळून, होईल त्या रीतीनें गुरुशिष्यपद्धतीला फांटा देण्याचा निश्चय करूं लागले आहेत. गुरूंनीं स्त्रीची इच्छा केली म्हणजे तो कृष्ण समजावा, या समजुतीच्या आश्रयानेंच कांहीं पंथांत अश्लील प्रकार दृष्टीस पडतात. पहिली गुरुभक्ति गुरु व शिष्य दोघांनाही दुःसाध्य असल्यामुळें सामान्य अद्वैतवादी लोकांनींही तिचा त्याग करून सांसारिक लाभाकरितां दुसरीचाच अवलंब केला आहे. तांत्रिक लोकांनीं तर ह्या दुसरीचें बंड इतकें माजविलें आहे कीं, त्यांतील गर्ह्य प्रकार मनांत देखील आणतांनां लाज वाटते. ही दुसरी गुरुभक्ति धेनूच्या दुधाप्रमाणें उत्तम असूनहि हिजपासून विपर्यासामुळें कसे अनर्थ झाले हे आपणाला कळून आलें असेल.

पहिल्या भक्तीची जोड असूनहि, दुसरी भक्ति करणारा शिष्यच धन्यतम आहे असें मी म्हणतों. परंतु पहिली विशेषतः परमार्थाला व दुसरी किंचित् व्यवहाराला धरून असल्यामुळें दुसऱ्या भक्तींत जशी शिष्याकडे जबाबदारी आहे, तशी गुरुपणा अंगीं न येऊं देण्याची गुरुकडेहि जबाबदारी आहे. म्हणजे शिष्यानें साधूचे ठिकाणीं क्रोधाभास पाहिला तर त्यावेळीं त्याला रुद्र समजावें, परंतु साधूनें क्रोधामुळें आपल्याला रुद्र समजूं नये, तर होईल .

त्या रीतीनें त्याचा त्याग-करण्याचा यत्न करावा. शिष्याला रुद्रदर्शनाची इच्छा झाली असतां गुरुस क्रोध केव्हां येईल असें त्याचे ठिकाणीं जसें आक्षिप्त आहे, तसेंच क्रोधादिक विकार न येतां शिष्यासुद्धां माझी ब्रह्मबुद्धि केव्हां होईल असें शिक्षकाचे ठिकाणींहि आक्षिप्त आहे. ''

अलौकिक व्याख्यानमाला पृ. ४९—५१

शास्त्रें हीं प्रमाणप्रवीण आहेत व गुरु प्रक्रियाप्रवीण आहेत असें म्हणून गुरूचा व शास्त्रांचा महाराजांनीं जो सुंदर मेळ घातला आहे त्याचें दिग्दर्शन मागें धर्म, प्रेम व गुर्वाज्ञापालन यांच्या विवेचन-प्रसंगीं आलें आहे. हें प्रक्रियाप्रावीण्य आपल्या ठिकाणीं एकनाथतुकारामांच्या तोडीचें होतें याविषयीं महाराज एका पत्रांत म्हणतातः—'' उपदेश करणें म्हणजे आपल्या जवळ असलें नसलें तेवढें सांगून आपण कोरडें ठणठणीत बनणें असा अर्थ नव्हे तर आपण जितक्या ज्ञानानें तृप्त झालों असूं त्याच्या लेशमात्र ज्ञानानें दुसऱ्यानें तितकेंच तृप्त होणें असें करणें होय. अभ्यास नसतां नुसत्या वाचिक ज्ञानाची पहिल्या उपदेशकाप्रमाणेंच गति होते. मी शब्द-सामर्थ्यांत नसलों तरी अर्थज प्रक्रिया रचण्यांत आपल्या कृपेनें प्रबल आहे. आणि हाच माझ्यामधील विशेष आहे. नाथतुकारामा-दिकांतहि शब्दसामर्थ्यापेक्षां हाच विशेष होता. म्हणूनच मला पृथ्वींतील कोणत्याहि पंडिताची आपल्या कृपेनें भीति वाटत नाहीं. '' अमरा निर्जरा देवा '' इ० श्लोक मला पाठ नाहींत. हवे तर ते करून देतां येतील. '' अस्तु.

वर दिलेल्या साधुबोधांतील आईच्या दृष्टांताप्रमाणें महाराजांच्याहि शिकवणींत निरनिराळ्या युक्त्यांची योजना नवी नवी असे. आपल्या

स्वयंसिद्ध प्रज्ञेंत स्फुरणाऱ्या वेदान्तज्ञानाचा कवळ भरून व शीघ्रसारग्राही बुद्धीनें निवडलेल्या वेदपुराणोपनिषच्छास्त्रादि ग्रंथांतील ज्ञानानें तो अधिक रुचिकर करून त्याच्या सेवनपाचनानें आम्हां अज्ञानी व अल्लड अर्भकां वा भवरोग नाहींसा करण्याची व भक्तिज्ञानाची पुष्टि देण्याची महाराजांची हातवटी अपूर्व होती व तींत त्यांचें लोकोत्तर प्रक्रियाप्राविण्य व वृत्तिविद्या हीं प्रगट होत असत.

**महाराजांची वृत्तिविद्याः**—अधिकारपरत्वें नूतन प्रक्रियामय-बोध, निरूपणें, आख्यानें, व्याख्यानें, पत्रें, भजनकीर्तनादि प्रसंग, पुराणप्र-वचनें, ग्रंथरचनादि प्रकार, सहवासांतील स्त्रीपुरुषमंडळींचें प्रतिक्षणीं वृत्तिनिरीक्षण व चित्तपरीक्षण करून व त्यांच्या मनांत चोरून संचार करीत असलेल्या विकारांवर अचानक घाला घालून ते बाहेर प्रगट कर-ण्याकरितां व त्यांची देहबुद्धि सोडविण्याकरितां क्रोधाविर्भाव आणणें, चारचौघांत उघड दोष बोलून दाखविणें, प्रसंगविशेषीं खोटे आरो-पहि आणणें, किंवा शिव्या देणें व रागावणें, कधीं एकदम दुसऱ्या ठिकाणीं निघून जाणें, किंवा कोणास हाकून द्यावयास सांगणें, लवकर स्वयंपाक करावयास सांगून तीन तीन प्रहर शौचस्नानादि करीत बसणें, व मग स्वयंपाक यातयाम झाला म्हणून पुन्हा ताजा करविणें, किंवा महाराजांच्या शौचस्नानादिकांस आज वेळ लागणार असें वाटून स्वयंपाकास उशीर लागल्यास लवकरच सर्व आन्हिक कृत्यें आटपून ताट वाढावयास सांगणें व ताट वाढून न आल्यास रागावणें, शिव्या देणें, बाहेर निघून जाणें, किंवा निजून राहणें; स्नान, पूजा, भोजनादि प्रसंगीं परिचारक-

मंडळीची धांदल व वृत्तींची खळबळ उडवून देणें, व अनेक प्रसंगीं झोंप, जेवण व पार्थिवादि पूजेसारख्या अत्यावश्यक गोष्टींचीहि त्यांस फुरसत न देणें, पण तितक्या गोष्टींची आठवण स्वतः ठेवून त्या पुन्हां बरोबर करवून घेणें, प्रसंगविशेषीं मंडळीं-तून कोणी उलट रागावलें असतां तितक्यापुरती त्यांची मर्जी सांभाळून घेऊन पुढें भजनकीर्तनादि प्रसंगीं किंवा कथा-पुराणादि निरूपणप्रसंगीं गुप्त मनोदोषांची अचुक ओळख पटवून देणें. कितीही मंडळी जवळ असली तरी अहोरात्र त्यांनां परमार्थकार्यांत गुंतवून त्यांचा संतोष वाढविणें, सद्गुणाला उत्तेजन देणें व दुर्गुणाला वचक बसविणें. धार्मिकप्रेमानिष्ठा परीक्षून पहाण्या-करितां निषिद्धाचरणाचा वरकरणी आभास दाखविणें, कात्यायनि वगैरे व्रतांत येणाऱ्याकरितां कडक निर्बंध घालणें. ते मोडून येणाऱ्यांस दंड करणें व परत जातेवेळीं पुन्हां ती दंडाची रक्कम त्यांस परत देणें, इत्यादि विविध गोष्टींचें संमिश्रण महाराजांच्या शिक्षणपरिपाटींत मोठें मजेचें व अचिंत्य होतें.

ह्या वृत्तिविद्येच्या प्रभावापुढें मंडळीच्या मनांत चोरून राहिलेल्या राजस तामस वृत्ती, त्यांचीं दुष्कर्में, धरून बांधून ठेवलेली श्रद्धा, कुंथून आणलेला प्रेम, वरपंगी भक्तीचा डौल इ० दोषांनां थाराच मिळत नसे. अनेक युक्त्या प्रयुक्त्या करून व प्रसंगीं मोठमोठे घोळ मचवून अशा दोषांची ते परिस्फुटता करीत व त्या दोषी मनुष्याला प्रेमदानानें पावन करून पुन्हां आपल्या प्रेमप्रवाहाबरोबर वाहून नेत. अत्यंत सकाम मनुष्याची तर ते एका शब्दांतच परीक्षा करून त्याला

वाटेस लावीत याविषयीं त्यांच्या पुष्कळ गोष्टी मंडळीच्या पहाण्यांत आलेल्या आहेत, व याविषयीं त्यांचा पुढील अभंगही त्यांच्या गाथ्यांत प्रसिद्ध आहे:—एक आम्हांपाशीं एकचि गोष्टी । व्हावें समदृष्टी सर्वांभूतीं ॥ १ ॥ नारळ जैसें का वरती कठीण । अंतरीं प्रमाण गोडरूप ॥ २ ॥ वानरें तयासी अव्हेरूनि जाती । मानव सेविती गोड भाग ॥ ३ ॥ तैसा दुष्टजनीं साधु अव्हेरावा । सज्जनीं सेवावा प्रेमभावें ॥ ४ ॥ ऐसेंचि वर्तन जेव्हां आंगीं बाणे । मग नाहीं उणे त्रिभुवनीं ॥ ५ ॥ ज्ञानेश्वर-कन्या नंदनंदनाचा । धरितसे साचा वाम कर ॥ ६ ॥

गाथा १०७४

वृत्तिसर्वस्व समर्पण करण्यांत जो जितका पुढें असेल तितकीच त्याची विशेष सुधारणा करण्यांत महाराजांच्या वृत्तिविद्येचें व शिक्षणकलेचें प्राविण्य दिसून येत असे. याविषयीं महाराजांची पत्नी सौ० मनकरणिका आई यांचा पुत्रमोह महाराजांनीं नाहींसा केला हेंच एक उदाहरण पुरे आहे. ही कथा उमरावती प्रकर-णाच्या शके १८२७ संवत्सरांत आहे.

यांप्रमाणें, परमार्थशिक्षणांत महाराजांचें धोरण किती विविध प्रकारचें व व्यापक होतें हें एक त्यांचे तेच जाणोत. त्यांच्या योगानें सामान्य जनांस भ्रांति व भाविकांस शांति मिळून “ वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ” या भवभूतीच्या वचनाची सत्यता अनुभवास येत असे.

आपल्या वृत्तिविद्येविषयीं महाराज आपल्या लहानशा आत्म-

चरित्रांत म्हणतात:—" मला वृत्तिविद्या जशी अवगत होती तशी भाषाविद्या अवगत नव्हती म्हणून मी शास्त्रीबोवाला ( श्रीनिवासशास्त्री हरिदास ) गुरु समजून सदैव त्यांची स्तुती करीत असे. "

याप्रमाणें मानवी वृत्तीचें, मानवी वाङ्मयाचें, मानवी समाजाचें व मानवी शास्त्रादिकांचें दोषाविष्करण करून निर्दोष स्वरूपाचा निश्चय प्रगट करण्यांत महाराजांच्या वृत्तिविद्येचे जे विविध चमत्कार आहेत ते त्यांच्या वाङ्मयांत व विशेषतः साधुबोध, प्रेमनिकुंज व संप्रदायसुरतरु या ग्रंथांत पहावयास सांपडतात. त्यांतल्या कांहीं स्थलांचा उल्लेख मागील प्रकरणांत आलेला आहे व पुढेंहि ओघानें येईल.

महाराजांच्या वृत्तिविद्येचें एक मात्र विशेष रहस्य येथें सांगितलें पाहिजे. तें रहस्य म्हणजे शरणागताला अभयदान हें होय. " सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते । भगवन् सर्वभूतेभ्योऽभयदानं व्रतं तव ॥ " याचा भावार्थ महाराजांच्या रसभरित काव्यशब्दांनींच सांगतों:—

" चुकल्याची चिंता आपण ईश्वर करी । मोकळें तयाला शरण रिघावें तरी । तिळ खाकसभरहि गर्व नको अंतरीं ॥ " इ०

पदांची गाथा पृ० ३७२

एवं, शरणागताला अभयदान देणें हें महाराजांचें अढळ व्रत आहे.

सारांश, आपल्या संगतींत कोणत्याहि रीतीनें सत्त्वरूपी धर्म उपजवून भक्तितत्त्वाची पात्रता मिळवून देणें व हळुहळु धार्मिक-

पूर्णता संपादन करून पूर्ण सुखस्वातंत्र्य किंवा अद्वयशक्ति मिळविण्या-करितां शिष्याला शास्त्रीय प्रयत्नाची दिशा दाखवून देणें हें महाराजांच्या शिक्षणांचें मुख्य ध्येय आहे. व या शिक्षणाची मांडणी त्यांनीं सुहृत्प्राप्तीच्या तत्त्वावर केलेली आहे.

**सुहृत्प्राप्ति सिद्धि**---मागें चार प्रकारचा सत्त्वोत्कर्ष सांगतांना आंतर ऐश्वर्याच्या ज्या आठ सिद्धि सांगितल्या आहेत त्यांतली सुहृत्प्राप्ति ही सातवी सिद्धि होय व या लोकांत कामक्रोधांचे वेग भगवत्पर करावयास शिकवून परलोकांत देवता, पितर व संप्रदाय—पुरुष यांचें सहाय्य मिळवून देऊन जन्मोजन्मीं संतसंग व गुरुशिष्यसंबंध दृढ करून देण्याच्या कामांत सुहृत्प्राप्ति ही भरंवशाची व न डळमळणारी अशी आहे असें महाराजांनीं म्हटलें आहे. ही सुहृत्प्राप्ति याहच्छिक, जन्मांतरीय, व आधिकारिक अशी तीन प्रकारची आहे.

याहच्छिक सुहृत्प्राप्ति म्हणजे कांहीं आकस्मिक कारणामुळें सत्पुरुषाचा व आपला संबंध जुळून त्यांनीं आपल्यास उपदेश करणें. जसें विदुरानें धृतराष्ट्रास उपदेश केला. जन्मान्तरीय सुहृत्प्राप्ति म्हणजे पूर्वजन्मीं सत्पुरुषाची कांहींतरी निष्काम सेवा घडून त्या सुकृतानें दुसऱ्या जन्मीं आपण कांहीं खटपट न करितां ते सत्पुरुष आपल्यावर प्रसन्न होऊन मित्रपणानें सर्व ज्ञान करून देतात. जसें, शिवलीलामृतांत शिवयोगियानें भद्रायुला उपदेश केला.

आधिकारिक सुहृत्प्राप्ति म्हणजे सद्गुरुसेवेनें परमार्थांत अखंडैकरस होऊन सद्गुरुप्रेमाच्या आवडीनें जगदुद्धरण करण्यासाठीं अनंत

जन्म घेण्यास तयार असणें. या स्थितींत सेवेची लालसा इतकी प्रबल असते कीं. तो आपल्या तीव्र भक्तियोगानें सद्गुरूलाच अवतार घ्यावयास लावतो. किंबहुना तो स्वतःच श्रीगुरूचें अपर स्वरूप असतो. गोपिका, अर्जुन, उद्धवादि भक्तमंडळ व एकनाथ-तुकारामादि संतमंडळ हीं सर्व याचींच उदाहरणें होत. याविषयीं ज्ञानेश्वरीमधल्या पुढील ओव्या फार मननार्ह आहेतः—

" कनकत्वदीक्षा गुरु। लोहा परीस होय कीरू। परी जगा पोसिता व्यवहारु। तेंचि जाणे ॥ येथ गुरुत्वा येतसे उणें। ऐसें झणें कोण्ही म्हणे। वन्हिप्रकाश दीपपणें। प्रकाशी आपला ॥ तैसा देवाचिया शक्ती। पार्थ देवासीच बहुती। परी साने इये स्तुती। गौरव असे ॥ आणि पुत्रें श्री सर्वगुणीं। जिणावा हे बापा शिराणी। तरी ते श्लाघ्यपणी। फळा आली ॥ × × द्रष्टा श्रीगुरुमूर्ती। न रिगता दृश्यपथीं। तरी का ह्या उपास्ती। आकळता तो ॥ × × अ० १८ × × हें परिसतां जरी कानडें। तरी जाण पां पार्थ उघडें। श्रीकृष्ण सुखाचोंचि रूपडें। वोतलें गा ॥ × × म्हणवूनि भावार्थ तो ऐसा। अर्जुन मैत्रियेचा कुवासा। कीं सुखें शृंगारलिया मानसा। दर्पण तो ॥ यापरी बाप पुण्यपवित्र। जगीं भक्तिबीजासी सुक्षेत्र। तो श्रीकृष्ण कृपे पात्र। याचिलागीं ॥ होका आत्मनिवेदनातळींची। जे पीठिका होय सख्याची। पार्थ अधिष्ठात्री तेथींची। मातृका गा ॥ पार्सोनि गोसांवीवर न वानिजे। मा गा पाइकाचा गुण घेइजे। ऐसा अर्जुन तो राहुंजे। पढिये हरी ॥ पाहा पां अनुरागें भजे। जे प्रियोत्तमें मानिजे। ते पतीहूनि काय न वानिजे। पतिव्रता ॥ तैसा अर्जुनचि विशेषें स्तवावा। ऐसें आवडलें मज जीवा। जे तो त्रिभुवनींचिया दैवा। एकायतन जाहाला ॥ जयाचिया आवडीचेनि पांगे। अमूर्तही मूर्ति आवगे। पूर्णाहि परी लागे। अवस्था जयाची ॥ " अ० ६ ओव्या १२५ ते १३१

आधिकारिक ब्रम्हवेत्ते पुरुष स्वयं निजलाभानें पूर्ण असतात, त्यांचे देह सामान्य जीवांसारखे भौतिक नसून चिन्मय अजन्मस्व-

विवर्त अर्थात अवतारी असतात, व पूर्ण ब्रह्मानुभव, संसाराचा अविरोध, व संसारी जनांस मुमुक्षु करण्याची इच्छा या तीन गोष्टींचा त्यांचे ठिकाणीं समुच्चय असतो म्हणून त्यांच्या ठिकाणीं विश्ववात्सल्य प्रगट होऊन सगळ्या जगाचें गुरुत्व ओघानेंच त्यांच्याकडे येतें. याचें वर्णन महाराजांनीं प्रेमनिकुंजांत मधुराद्वैताच्या रीतीनें केलें आहे तें असें:--

ओव्या---एवं गुणानिर्गुणा विराध नाहीं । तरी निवटावें कवणें कार्यी । म्हणोनि जगाचिया ठायीं । पुत्रत्व सगळें ।। तया विश्वपुत्रा-साठीं । भूतदया भरली पोटीं । तिनें उघडली तारणपेटी । आधिकारिक होयोनी ।। एवं ऐक्य पावोनियां तत्त्वतां । अधिक सुख भोगोनि परतंत्रता । या विरोधानुभूत्यैक्या पतिव्रता । वांचोनि नेणती इतर ।। तूं स्वतंत्र ह्मणतां क्षणीं। मुदित होय व्यभिचारिणी । तैसे फुगती ज्ञानाभिमानी । भक्तिरहित शब्दपाठें ।। × × ऐक्यें साधिली मोक्षस्थिति । वियोगोपलालनें दीनता भुरती । संयोगें भगवद्भक्ति साधिला पंचम पुरुषार्थ ।। एवं हें सेवकपण । स्वामित्वाहि संपादोन । स्वामिनीपणाचा गर्व. सांडोन । श्रयी पतिचरण ह्मणोनि पतिहि लाजे ।। × × भगवंत बाप संत माता । जे अपराधाचिया कोटिकशता । उपसाहती अनंता । रिझवोनियां ।। + + + एवढें संतमहिमान । असावया हेंचि कारण । कीं भगवान सामान्य चेतन । विशेष चेतनप्रदीप संत ।। " प्रेमकुंज पृ० १३९,१४२

परंतु हें संतांचें वात्सल्य दुसरे अज्ञानी व आपण ज्ञानी असें लौकिक आईबापांसारखें द्वैतमूलक नसतें, तर " सर्वभूतेषु यः

पश्येद्भगवद्भावमात्मनः । " असें सर्वात्मभावाचें असतें. " लोकवत्तु लीलाकैवल्यम् " या न्यायानें त्यांची वाचा अनावर होऊन समाधीनिरोधरूपानें ती प्रगट झालेली असते. तें त्यांचें धर्मकीर्तन असून त्यापासून धर्माचा जीर्णोद्धार होतो. ह्याविषयीं ज्ञानेश्वरींतलें प्रसादवचनें पहा:—" पैं गुरुशिष्यांचिया एकांतीं । जे अक्षरा एकाची वदंती । ते मेघाचियापरी त्रिजगतीं । गर्जती सैंघ ॥ जैसी कमळकळिका जालेपणें । हृदयींचिया मकरंदातें राखों नेणें । दे रायारंका पारणें । आमोदाचें ॥ तैसेंचि मातें विश्वीं कथित । कथितेनि तोषें कथूं विसरत । मग तया विसरामाजीं विसरत । आंगें जीवें ॥ ऐसें प्रेमाचेनि बहुवसपणें । नाहीं रात्री-दिवो जाणणें । केलें माझें सुख अव्यंगवाणें । आपणपेयां जिहीं ॥ "

ज्ञानेश्वरी अ० १० श्लो०९.

आतां तुकाराम महाराज आपला अनुभव वर्णन करतात—
" विषयां विसर पडला निःशेष । आंगीं ब्रह्मरस ठसावला ॥
माझी भज झाली अनावर वाचा । छंद या नामाचा घेतलासे ॥ "

संतांच्या या धर्मकीर्तनांतच मेघवृष्टिन्यायानें यादृच्छिक सुहृत्प्राप्तीचें बीज असून जन्मांतरीय व आधिकारिक सिद्धींचा उगम त्यांतूनच होतो.

**सुहृत्प्राप्तीचा उपाय**—अशा सत्पुरुषांच्या दर्शनकीर्तनाचा लाभ यदृच्छेनें मिळाला असतां त्यांचा धार्मिक प्रेम संपादन करून निष्काम बुद्धीनें त्यांचा उपदेश ऐकत जावा. म्हणजे सहजच त्यांच्या रक्षणशिक्षणक्रमानें आपला दृष्टादृष्ट अधिकार वाढत जातो

व सुहृत्प्राप्तिसिद्धि मिळते. एकवेळ संतांनीं आपला म्हटल्यावर मग ते जन्म जन्म आपला पिच्छा पुरवून आपल्या उद्धाराची काळजी वाहतात. व त्यांच्या प्रसन्नतेला मोठासा सोपस्कार करावा लागतो अशांतलीही गोष्ट नाहीं. खरेंखुरें निष्काम प्रेम—मनाचा मोकळेपणा—त्यांना पाहिजे असतो. मग ते चुकीचाकी कांहीं पहात नाहींत. सर्वांभूतीं अभयदान हें त्यांचें ब्रीदच असतें. सारांश, सुहृत्प्राप्तीची ही जोड मिळाल्यावर अधोगतीची भीति समूळ नाहींशी होऊन जन्मोजन्मीं आपला भक्त्युत्कर्ष निश्चित असतो. व जसजसें आपलें ' उपदेशसाध्य वर्तन ' वाढत जाईल तसतसा आपला अधिकार वाढून उपदिष्ट तत्त्वाचा आंतर अनुभव येऊं लागतो. ह्या संबंधानें महाराज अलौकिक व्याख्यानमालेंत म्हणतात " शिक्षकानें सांगितलेल्या गोष्टींचें प्रथम बाह्य ज्ञान होऊन अधिकारानुरूप त्याचा आंतर अनुभव होत असतो. जसा मैथुन शब्द कोणी उच्चारला असतां वयानुरूप त्याची अंतर्बाह्य ओळख पटत जाते, तद्वतच येथेंहि समजावें. "

**व्यवहारांत समतोलता व परमार्थांत एकतानता**—सुहृत्प्राप्तींत गुरुशिष्यांचा परस्पर प्रेमसंबंध—त्यांच्या अंतरमनांचा स्नेहात्मक तंतु जन्म जन्म दृढ रहाण्याकरितां व्यवहारांत समतोलता व परमार्थांत एकतानता हीं दोन तत्वें महाराजांनीं मुख्य सांगितलीं आहेत. व सुहृत्प्राप्तिसिद्धि ही एका जन्माची नसल्यामुळें तींत हीं दोन्हीं तत्वें सहज येतात असें त्यांनीं म्हटलें आहे. हीं दोन्हीं तत्वें

साध्य करण्याकरितां परस्पर गुरुशिष्यांनीं आपापली जबाबदारी ओळखून कशी वागणूक ठेविली पाहिजे याविषयीं महाराज अलौकिक व्याख्यानमालेंत म्हणतात:—

" गुरूनें व्यवहारांत तुळेसारखें व परमार्थांत गंगेसारखें असलें पाहिजे. म्हणजे तुळेचीं पारडीं जशीं एकीकडेच जाऊं देणें इष्ट नाहीं, तर आपल्या परस्पर वजनानें सारख्या मानांत ठेविलीं असतांच व्यवहार करणें इष्ट आहे. तद्वत सर्वेच व्यावहारिक गुरु आपणाकडे किंवा शिष्य आपणाकडे ओढून घेईल, तर सृष्टिनियमानेंच गुरुशिष्यसंबंधांत फुट पडण्याचा पुष्कळ संभव असतो. म्हणून व्यवहारांत शिष्यानें गुरूला व गुरुनें शिष्याला एका रेषेंत येतील असे सल्ला व मदत वगैरे करून हक्क दिले पाहिजेत. मग तो शिष्य अज्ञानी असो किंवा पूर्ण ज्ञानी असो. भेद इतकाच कीं, ज्याप्रमाणें तुळेंत एका पारड्यांत सुवर्ण व एका पारड्यांत दगड ठेविला, तर सुवर्णाच्या मोला-इतके जरी त्या दगडाचे हक्क नसले तरी सुवर्णाच्या वजनाइतके तरी दगडाचे हक्क असले पाहिजेत. त्याशिवाय सुवर्णाचें देखील वजन समजणें कठीण होऊन शेवटा मोलाविषयां देखील संशय राहील. आतां कांहीं क्रियेनें दगडाचें सुवर्ण झालें तर मग मोलांत व वजनांत सारखेपणा साहजीकच आला. एवं बुद्धिमत्तेंत व लोकांना ज्ञानानें थक्क करण्यांत जरी एखादा शिष्य पूर्ण नसला तरी त्याच्याकडून होईल त्यांत व विशेषतः आपल्याला उपयोग असेल त्यांत, व तसेंच आपल्याप्रमाणें त्याला ज्या रीतीनें शक्ति येईल त्यांत, अपूर्ण शिष्यालाही हक्क देण्याइतकें औदार्य गुरूंनीं केलें पाहिजे. ज्याप्रमाणें दगडाचें सुवर्ण होणें हें क्रियेवर अवलंबून असून, मूळ सुवर्णाच्या वजनांत येणें, हें त्या सुवर्णाच्या शक्तीवर अवलंबून आहे; तद्वत् पूर्ण धार्मिकपणा हा स्वतःच्या क्रियेनें संपादून, गुरूच्या मापन अधिकारास पात्र होणें हें गुरुकृपेवर अवलंबून आहे. याप्रमाणें गुरुशिष्यसंबंधीं व्यावहारिक उत्क्रान्ति परमार्थाच्या पायथ्याशीं जाऊन भिडली म्हणजे मग मात्र शिष्याला आपलें सर्वस्व गुरूच्याच स्वाधीन करावें लागतें. ज्याप्रमाणें एखाद्या नदीला सागराला मिळावयाचें असल्यास गंगेला मिळाल्यावर गंगा नेईल तिकडे

तिला जावें लागतें, त्याप्रमाणेंच परमार्थांत सर्वस्व गुरूच्या हातीं देऊन तद्वृत्ति प्रवाहानेंच जावें लागतें. एवं परमार्थांत एकतानता व व्यवहारांत समतोलता जेव्हां गुरु व शिष्याचे ठिकाणीं प्राप्त होते व दोघेही आप-आपली जबाबदारी पूर्ण सांभाळतात, तेव्हां ते गुरुशिष्य पुष्कळ युगेंपर्यंत जगाला सुधारणेचा मार्ग लावून देण्याला पात्र होतात. तथापि व्यवहारांत देखील निरभिमान राहण्यासाठीं गुरूनें शिष्याचे शिक्षक देव आहेत, असें मानलें पाहिजे. शिष्याला श्रवण करण्याची शक्ति अधिक असेल तर ती मजपासून नसून श्रोत्रदेवता जी दिशा तिजपासून आहे. तद्वत गुरु-निर्माल्य सेवनाची इच्छा अश्विनीकुमारांपासून, दृष्टियोग किंवा अलोक योगांत प्रगति सूर्यापासून, ग्रहण होणें ब्रह्मदेवापासून व हातानें कलादिक करणें इंद्रापासून त्याला मिळाली आहे, असें निरभिमान रीतीनें गुरूनें समजलें पाहिजे. व शिष्यानें त्याच्या उलट सर्वदेवसमन्वय श्रीगुरु आहेत असें समजलें पाहिजे. दुसरें, श्रीगुरूंनीं होईल तितक्या रीतीनें श्रवण करविलें पाहिजे व शिष्यानें त्याचें मननही केलें पाहिजे. प्रतिदिवशीं शंभर भाग श्रवणामध्यें पांच भाग तरी मननाचे मिसळले पाहिजेत. मननावांचून श्रवण केलें असतां शतजन्मही ज्ञान होणें शक्य नाहीं.

"मननावेगें श्रवण करी । जैसे पालथिया घागरी । पर्जन्यांत ठेवितां जन्म-वरी । परी अंतरा बिंदू न सांठवे" ॥ (श्रीधर).

पुनः शिष्य पेटिकान्यायार्ह नसून भूमिकान्यायार्ह असला पाहिजे. म्हणजे पेटींत ठेवलेलें बीज जसें आपोआप कुजून जातें व भूमींत घातलेलें वाढीस लागतें, तद्वत् श्रवणज्ञानाची त्यानें आपल्या मननज्ञानानें चीज केली पाहिजे. समाधींत पारमार्थिक संबंध व व्युत्थानकालीं व्यावहारिक संबंध निबिडतर दृढ असला पाहिजे. तसेंच परमार्थांत अखंडैकरस होऊन व्यवहारांत जगदु-द्धरण करण्यासाठीं अनंत जन्म घेण्याला दोघांनींहि तयार असलें पाहिजे असें मी स्पष्ट म्हणतों. गुरूंनीं घातलेल्या परम बीजाचे अनंत पट करणें हें खरोखर देवतांच्या स्वाधीन असल्यामुळें देवपितरांचा व आपला शिक्षकशिष्य नात्या-नेंहि एक प्रकारचा मध्यम संबंध आहे. परंतु दोघांनींहि आपआपली जबाब-दारी मात्र सांभाळली पाहिजे; व आपआपल्या जबाबदारीप्रमाणें दोघांनीं

आपलीं कामेंहि केलीं पाहिजेत. वेदांतांतील दृष्टिसृष्टिवादांत प्रत्येकाची सृष्टि निरनिराळी असल्यामुळें ब्रह्मदृष्टीनें कल्पित व शिष्यदृष्टीनें गुरु सत्य असतो. त्याप्रमाणें गुरूच्या क्रोधारोहणकालीं रुद्रपणा व कामारोहणकालीं कृष्णपणा इत्यादिक द्वितीय भक्तिस्थ प्रकारही शिष्यदृष्टीनें सत्य जरी असले, तरी गुरूला त्याविषयीं कांहींच माहीत नसलें पाहिजे; म्हणजे गुरुदृष्टीनें ते कल्पितच असले पाहिजे."

अलौकिक व्याख्यानमाला. पृ० ५१—५३.

सांसारिकास मुमुक्षु बनवून त्याला पूर्ण सुखस्वातंत्र्याच्या साम्राज्याचा अधिकारी करणें हें जें महाराजांच्या सुहृत्‌शिक्षणाचें रहस्य मागें वर्णन केलें त्याचाच उलगडा व्यवहारांत समतोलता व परमार्थांत एकतानता या दोन तत्त्वांच्या निरूपणानें वर झालेला आहे. संसारी जीवांच्या अंतःकरणाशीं एकरूप झालेली जी अनादि संसारवासना तिलाच गुरुशास्त्राच्या विधीनें धार्मिक प्रेमाच्या शुद्ध प्रवाहांत वळवून आणण्याचें कौशल्य त्यांत उत्तम प्रगट झालें आहे. वर सांगितलेली गुरुशिष्यसंबंधी व्यावहारिक उत्क्रांति किंवा धार्मिक पूर्णता अशाच युक्तीची आहे.

**कामनेचें धार्मिक प्रेमांत रूपांतर**—वस्तुतः प्रेम आणि कामना ह्या वृत्ति परस्पर विरुद्धस्वभावाच्या आहेत व त्यांचें स्वरूप मागें प्रेमवर्णनांत सांगितलें आहे. परंतु वरील युक्तीनें त्यांचें ऐक्य केलें म्हणजे कामनेचेंच धार्मिक प्रेमांत रूपांतर होत असतें. ह्या धार्मिक प्रेमालाच भगवद्गीतेंत "धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ" ह्या वाक्यानें भगवंतानें आपली विभूति म्हटलें आहे. तो भगवंताचा रसपूर्ण अभिप्राय ज्ञानेश्वरीच्या पुढील अमृतोपम ओव्यांनीं सांगतों:—

"भूतांच्या ठायीं काम। तो मी म्हणे आत्माराम। जेणें अर्था-

स्तव धर्म । थोर होय ॥ येऱ्हवीं विकाराचेनि पैसें । करी कीर इंद्रियांच्याचि ऐसें । परी धर्मासी वेखासें । जावों नेदी ॥ जो अ-प्रवृत्तीचा अव्हांटा । सांडूनि विधिचिया निघे वाटा । तेवींचि नियमाचा दिवटा । सवें चाले ॥ काम ऐशिया वोजा प्रवर्ते । म्हणोनि धर्मासि होय पुरते । मोक्ष तीर्थींचे मुक्ते । संसारभोगी ॥ जो श्रुतिगौरवाच्या मांडवीं । कामसृष्टीचा वेल वाढवी । जंव कर्मफळेंसि पालवी । अपवर्गीं टेंके ॥ ज्ञानेश्वरी अ० ७ ओ० ४६ ते ५१.

कामनेच्या विषबिंदूला प्रेमाचा अमृतसिंधु बनविणारा हा धार्मिक प्रेम सुहृद्वृक्षाचा अंकुर होय. गुरुशिष्यप्रेम हा त्या वृक्षाचा सुंदर विस्तार आहे. व्यवहारांत समतोलता व परमार्थांत एकतानता ह्या त्याच्या दोन मुख्य शाखा आहेत. आधिकारिक सुहृत्प्राप्ति हें त्या वृक्षाचें गोड फळ आहे. व पूर्ण सुखस्वातंत्र्य हा त्या फळांतील मधुर रस होय. ह्या अलौकिक वृक्षाच्या एका एका अंगाची पूर्ण ओळख अधिकारानुरूप महाराजांनीं मंडळीला कशी करून दिली व पारमार्थिक एकतानता व व्यावहारिक समतोलता ह्या मुख्य शाखांस त्यांचे हात पुरतील अशा प्रकारचे हक्क वगैरे देण्याचें महाराजांचें औदार्य किती लोकोत्तर होतें याच्या वर्णनाचें प्रतिबिंब त्यांच्याच एका वाक्यांत वर येऊन गेलें आहे. तें वाक्य हें:---एवं बुद्धिमत्तेंत व लोकांना ज्ञानानें थक्क करण्यांत जरी एखादा शिष्य पूर्ण नसला तरी त्याच्याकडून होईल त्यांत व विशेषतः आपल्याला उपयोग असेल त्यांत व तसेंच आपल्याप्रमाणें त्याला ज्या रीतीनें शक्ति येईल त्यांत अपूर्ण शिष्यालाहि हक्क देण्याइतकें औदार्य गुरूंनीं केलें पाहिजे."

ह्या वचनाची सत्यता महाराजांच्या चरित्रांत सर्वत्र दिसून येते. विशेषतः स्त्रीवर्गास त्यांनीं पाठविलेलीं वात्सल्यभावाचीं पत्रें, वासुदेवराव मुळे प्रभृतीस पाठविलेलीं सुहृद्भावाचीं पत्रें, इतर मंडळीस पाठविलेलीं सद्वासनाबोधक पत्रें, "आम्हीं तुम्हाला विद्वत्ता व ब्रह्मनिष्ठता या दोन्ही पक्षानें सारखें नेणार" इत्यादि दिलेलीं आश्वासनें, सांसारिकांकरितां स्त्रीपुरुषचातुर्यादि ओंव्या, व "अंतरीं परमार्थ धरावा । बाहेरी व्यवहार करावा । आवडी भगवंत भजावा । हळुहळु मिळवावा विराग" ॥ इत्यादि प्रकारचा उपदेश, व सरते शेवटीं धर्म, प्रेम व गुर्वाज्ञापालन या तिहींच्या समुच्चयानें गुरुसेवेची शिकवण इत्यादि गोष्टींत महाराजांचें वरील धोरण स्पष्ट दिसून येतें.

**सुहृत्प्राप्तींत उत्पन्न होणारा अवगुण व तो टाळण्याचा उपायः**—परमार्थांत एकतानता व व्यवहारांत समतोलता हीं दोन्हीं तत्त्वें सुहृत्प्राप्तींत सहज येतात. याविषयीं श्रीकृष्णार्जुनांचें प्रसिद्ध उदाहरण देऊन महाराजांनीं विवेचन केलें आहे. त्यांत ते म्हणतात.

श्रीकृष्णार्जुनांचा पुष्कळ जन्मांचा संबंध होता हे "बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ॥ तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप" या वाक्यानें भगवंतानें कबूल केल आहे. व म्हणूनच ते परस्पर सुहृदहि झाले. राज्य मिळवून देण्याच्या कामांत श्रीकृष्णानें, व भूभार उतरण्याच्या कामांत अर्जुनानें, परस्परांना साह्य केलें, ही व्यवहारांत समतोलता दोघांची असून, गीतेच्या हातीं अर्जुनानें आपल्या सर्व वृत्ती दिल्या ही पारमार्थिक एकतानता समजावी. याप्रमाणें ही सुहृत्प्राप्ति भरंवशाची असून न डळमळणारी आहे. तथापि हिच्यामध्यें एक अवगुण उत्पन्न होण्याचा संभव असतो. कांहीं बरोबरीच्या हक्कामुळें केव्हां केव्हां गुरुवचनावर अविश्वास होण्याचा मात्र प्रसंग येतो. परंतु तो प्रसंग गुरूच्या वाक्यानें व त्याच्या दिव्य सामर्थ्यानें टाळण्याशिवाय दुसरा

उपाय नाहीं. याविषयीहि अर्जुनाचें उदाहरणच स्पष्ट आहे. 'मीं सूर्याला हा योग सांगितला' हें श्रीकृष्णाचें म्हणणें सौहार्दामुळें अर्जुनाला न पटून "अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः। कथमेतद्विजानीयाम् त्वमादौ प्रोक्तवानिति॥" (भगवद्गीता) या प्रकारचा त्यानें आशंकून प्रश्न केला तेव्हां "बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन। तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप॥ अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन्। प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया॥ यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥ परित्राणाय साधूनां विनाशय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥ जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः। त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन॥" या श्रीकृष्णवाक्यांनीं, आपलें अज्ञान कबूल करून, अर्जुनाला अविश्वासप्रसंग नाहींसा करावा लागला. व जेव्हां दिव्यदृष्टीनें विश्वरूप पाहिलें तेव्हां तो अविश्वास नाहींसा झाला.

तसेंच मागच्या* व्याख्यानांत प्रेमाविषयीं जी नम्रता सांगितली तीही ह्या सुहृत्प्राप्तींत किंचित् कमी होण्याचा संभव आहे. व तसें झालें असतां मागील व्याख्यानांत सांगितल्याप्रमाणें प्रेम मिळविण्यास अडथळा येत असतो. म्हणून सुहृत्प्राप्तींतहि महात्म्यज्ञान ठेवून, क्षमा मागून, नम्रता मिळवून मागील व्याख्यानांत सांगितलेला प्रेम वाढवीत गेलें पाहिजे. अर्जुनानेंहि असेंच केलें आहे. "सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति। अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि॥ यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु॥ एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम्"
(भगवद्गीता.)

याप्रमाणें आपल्या अविश्वासाची निंदा केली. परंतु क्षमा जी मागितलें ती सुहृत्प्राप्तिसिद्धीच्या भरांतच मागितली. सेवक जसा स्वामीला क्षमा मागतो तशी मागितली नाहीं. तो श्लोक येणेंप्रमाणें:---

"तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीश मीड्यम्। पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम्"॥

---

* 'प्रेमोन्नति' ह्या व्याख्यानांत.

या श्लोकांतील "पिता इव पुत्रस्य" सखा इव सख्युः" इत्यादि वचनें सौहार्द परच आहेत. तथापि सिद्धदीपाच्या प्रथमदीपवत् महात्म्यज्ञान मात्र अर्जुनाचें कायमच होतें. कारण जरी दोघेहि सुहृत् व्यवहारांत समतोल होते, तथापि "करिष्ये वचनं तव" या वाक्यावरून सुहृत्प्राप्तिसिद्धांतीहि भक्तिमय सद्गुरूचें वर्चस्व कबूल करण्याची शिष्याकडे जबाबदारी आहे. उद्धव-गोपिकादिकांचा अविश्वास दिव्य सामर्थ्यावांचून श्रीकृष्णवाक्यानेंच नष्ट झाला."

अलौकिक व्याख्यानमाला. पृ० ५४ ते ५७.

**श्रीगुरूचे जन्मकर्म दिव्य असतात.**—महाराजांच्या वरील वाक्यसंघांत सुहृत्प्राप्तीचें मुख्य हृद्गत एकवटलेलें आहे. त्याचा निष्कर्ष असाः—श्रीगुरूची तनु ही केवळ ब्रह्मचिद्धन साकार असल्यामुळें संपूर्ण दिव्य सामर्थ्यांचें व विद्यांचें तें अधिष्ठान असतें व म्हणूनच त्यांचे जन्मकर्म दिव्य म्हणजे अलौकिक असतात. त्यांचें प्रसन्न वदन नेहमीं भक्तांवर अनुग्रह करण्याला उद्युक्त असतें, त्यांच्या शब्दांत वेदाची मंत्रशक्ति व आईचे प्रेमळ हृदय एकाच वेळीं प्रगट होतें, त्यांच्या दिव्य श्रवणेंद्रियाला अनन्य दीनांची हांक तत्काळ ऐकूं येते व आपल्या स्मृतिगामित्वशक्तीने ते त्यांच्या सोडवणुकीला धांवत येतात, त्यांच्या दिव्य दृष्टीला शिष्याच्या अंतरंगांतली प्रेमाची वाढ दिसत असते व त्या मानानें ते त्याला प्रेमदानहि देतात, त्यांचें अनंत हस्त भक्ताचें दैन्य नाहींसें करून त्याला दिव्य भोग देण्यासाठीं नेहमीं उदार असतात व भक्तार्पित—सर्वस्वासाठीं—त्याच्या प्रेमाच्या मुष्टिभर पोह्यासाठीं आतुरतेनें हपापलेले असतात व शेवटीं "तस्य सर्वं हराम्यहं" असा संकल्प सोडून अधीरपणानें त्याच्या कक्षपुटींतून मर्त्य-भावाची गांठोडी हिरावून घेऊन शाश्वत सुखाची दिव्य सुवर्ण-

नगरी त्याला दान देतात. या नगरीचें वर्णन योगवासिष्ठांत मोठें चित्रमय केल आहे. तसेंच देवनाथांच्या पुढील काव्य-वाणींतहि थोडक्यांत तें मनोरम उतरलें आहे. तें असें:—
" गुरुनाथ वरदकर शिरीं । तेणें तरलोंरे निश्चय हा भवपुरीं । समरसता रसमंजरी । रस देउनियां रोग दवडिला दुरी । आरोग्य देहनगरीं । गुरु आत्मा हा राज्य नगरीचें करी ॥ चाल ॥ बोलाया नाहीं ठाव । बुडालें रूप आणि नांव । वैऱ्याचा जिंकिला गांव । काळाचि खुंटली धांव । हा गुरुकृपेचा भाव ॥ चाल पहिली ॥ गड्या देवनाथ निर्मळ । करीं लाधला नाथकृपेचा फळ ॥ गुरूचें आठवी पदकमळ ॥ "

**महाराजांच्या उपदेशाचें धोरण.**—असे श्रीगुरूचे जन्मकर्म दिव्य असल्यामुळें सलगीनें प्रसंगविशेषीं उत्पन्न झालेला अविश्वास त्यांच्या दिव्यवचनानेंच नाहींसा करून ही सुहृत्प्राप्ति कल्पकता फलद्रूप करण्याचा महाराजांनीं वर उपदेश केला आहे. व्यवहारांत समतोलता व परमार्थांत एकतानता या तत्वाचें बीज तरी वरील उपदेशांतच आहे. गुरुनें शिष्याला हक्क वगैरे देण्याचें औदार्य जें वर सांगितलें त्यांत तरी शिष्याची स्वार्थत्यागाची शक्ति हळुहळु वाढवून सर्वस्वार्पण करण्याचें सामर्थ्य त्याला मिळवून देण्याचीच हातवटी असते. व हें सामर्थ्य दृढ होऊनच जगदुद्धरण करण्यासाठीं गुरुबरोबर अनंत जन्म घेण्याची तयारी होत असते. परमार्थांत एकतानता तर धार्मिक प्रेमा-पासूनच आरंभ होते. इतकेंच कीं ज्ञानपूर्वकालीं ती मर्यादा-

मार्गीय असते व ज्ञानोत्तर काळीं ती पुष्टिमार्गीय होऊन गुरुभक्ति, मधुराद्वैत इ० रूपास येते.

सारांश, परमार्थांत एकतानता म्हणजे गुरुभक्ति व व्यवहारांत समतोलता म्हणजे सेवेची आवडी. व दोन्ही ठिकाणीं श्रीगुरूचें महात्म्यज्ञान जागृत ठेवून अविश्वासाचा—अवज्ञेचा—प्रसंग टाळणें म्हणजे सेवातत्परता होय. हालच महाराजांनीं 'श्रीगुरूचें भक्तिमय वर्चस्व कबूल करणें' म्हटलें आहे. हें भक्तिमय वर्चस्व कबूल करण्याची जाणीव महाराजांनीं आपल्या सुहृत्प्राप्ती-च्या मंडळींत कशी उत्पन्न केली याविषयीं नागपूरचे वेदशास्त्र-संपन्न श्रीनिवासशास्त्री हरिदास यांनीं एके प्रसंगीं आपला अनुभव सांगितला आहे. तेवेळीं त्यांनीं महाराजांच्या ठिकाणीं आपल्यास दिसून आलेलें ब्रह्मत्व, विष्णुत्व व महेशत्व, ज्ञानेश्वरीच्या पहिल्या तेरा ओव्याचें त्यांनीं सुमारें सहा सात महिनेपर्यंत सांगितलेलें निरूपण, थोडक्यांत सर्व शास्त्रांचें त्यांनीं सांगितलेलें स्वरूप, तें आपल्यांस आकलन न झाल्यामुळें आपल्याहून उत्तम अधिकाऱ्यास सांगण्याविषयीं आपण केलेली महाराजांची प्रार्थना, मी तुम्हालाच हें सांगून समजलें असें कबूल करावयास लावीन अशी महाराजांची प्रतिज्ञा, पुढें अध्यारोपापवाद सांगून व्यष्टिदृष्टीनें महाराजांनीं सृष्टीची उत्पत्ति समजावून देणें, संसारांत अडचणी व दुःखें आलीं असतां तीं दूर करून सहवासाच्या आनंदानें सुखी करणें व सद्बोधामृत पाजून संसार मिथ्या कसा याचें नाना दृष्टांतांनीं समर्थन करणें; मुलास (बापूराडीस) क्षयरोग झाला

असतां आपल्या हयातींत त्या रोगाचें स्वसामर्थ्यानें स्तंभन करणें, व स्वतः पैसा आडका खर्चून मुलाचें संगोपन करणें व त्याला आपल्या सहवासांत ओढणें, इ० गोष्टींचें वर्णन केलें. व अशी ही अनधिकाऱ्याला स्वप्रयत्नानें अधिकारी बनविण्याची महाराजांची नाथसंप्रदायाची हातवटी सांगून त्यांचें गुरुत्व ओघानेंच आपल्याकडे आल्यावर महाराजांनीं आपल्यास साधन-मार्गास लावण्याचा उपक्रम कसा केला ? श्रवण, मनन व निदि-ध्यासन त्या तीन पायऱ्या चढण्याला क्रमानें प्रणिपात परिप्रश्न व सेवा ह्या तीन गोष्टींची आवश्यकता किती आहे ? सुहृत्प्राप्ति सिद्धीच्या जोरावर गुरूची संप्राप्ति झाली असतांहि जिज्ञासूला शिष्यत्वांत कसें शिरलें पाहिजे? याविषयीं श्रीकृष्णार्जुनांचें उदाहरण व सरतेशेवटीं श्रीगुरूंच्या वचनप्रभावानें जीवचैतन्य व परमात्म चैतन्य यांचें ऐक्य कळल्यावर " गुरुः साक्षात् परंब्रह्म " याचा शिष्याला अनुभव कसा येतो ? याचें त्यांनीं सुंदर विवेचन केलें व शेवटीं, महाराजांच्या अलौकिक शिक्षणपद्धतीनें व त्यांच्या अनंत उपकारानें आपण बद्ध असून त्याचे अंशतः तरी उतराई होण्याचें कर्तव्य मंडळीवर येऊन पडलें आहे; व महाराजांचे शब्द हेच आपले वेद, त्यांचें ग्रंथ हींच आपलीं पुराणें, त्यांनीं घालून दिलेले नियम व अभ्यास हेच आपले यमनियम, व त्यांची आज्ञा पालन करणें हेच आपले वर्णाश्रम मानून त्यांनीं जसा आपल्याला सुहृत्प्राप्तिपासून आरंभ केला तसेंच आपणहि संपूर्ण जग आपले मित्र मानून मित्राचें हित साधण्याची बुद्धि धरणें

हीच आपल्या कर्तव्याची दिशा कशी ठरूं शकते इत्यादि गोष्टी त्यांनीं प्रेमळ शब्दांनीं श्रोतृसमूहाच्या मनावर बिंबवून दिल्या.

तात्पर्य, सुहृत्प्राप्ति ही धार्मिक प्रेमापासून आपल्या बुद्धीची वाढ करीत करीत सख्यभक्तीनें सहज खेळतमाळत आध्यात्मिक प्रेमाचें शिखर गांठून देणारी कल्पलता होय. व म्हणूनच देवभक्ति-पेक्षांहि श्रेष्ठपतीची मानलेली आहे.

"देवभक्तींत प्रतिमेपासून आरंभ करावा लागत असल्यामुळें खालच्या पायरीचे श्रम अधिक असून श्रीगुरुभक्तींत सचेतन मनुष्य-पणापासूनच आरंभ करावा लागत असल्यामुळें कमी श्रम आहेत. सत्संग हा देवभक्तींतील प्रतिमेचा जडपणा काढून टाकणारा असून गुरुभक्तीच्या समन्वयानें येथेंच आणणारा असल्यामुळें कोणत्याहि रीतीनें तोच साधला पाहिजे. तो जरी दुर्लभ असला व अगम्य असला तरी व्यर्थ जाणार नाहीं. म्हणून तो सत्समागमच साधावा असें श्रीभगवान् नारदाचार्यांचें सूत्र आहे. "महत्संगस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च ॥" "तदेव साध्यतां तदेव साध्यताम्" व देवभक्ति किंवा गुरुभक्ति शेवटीं एकत्र मिळून सर्व प्रेममयत्व फल निष्पन्न होतें. याविषयीं श्रुतिहि प्रमाण आहे. "यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ । तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥

अलौकिक व्याख्यानमाला पृ० ८९.

आतां, सुहृत्प्राप्तीचें किंवा सुहृत्‌शिक्षणाचें अंतिम ध्येय जो आध्यात्मिक प्रेम किंवा पूर्ण सुखस्वातंत्र्य त्याचें स्वरूप महाराजां-च्याच शब्दांनीं सांगतों. ते शब्द हे:—

**सुहृत्प्राप्तीचें मुख्य प्रयोजन**—"प्रेमाची अतिशय वृद्धि होतां होतां अहंकार नाहींसा होऊन प्रेम व प्रेमाला जाणणारा साक्षी जेव्हां एकच राहतो व मग अमुक हा परलोक म्हणून प्रेम करावयाचा व अमुक हा लोक म्हणून प्रेम करावयाचा नाहीं हें सर्व विसरून जाऊन सहज प्रेममयच होऊन राहतें, याला आध्यात्मिक प्रेम म्हणतात. × × × धार्मिक प्रेमापर्यंत पुरुष आला म्हणजे तो केव्हांना केव्हां तरी या आध्यात्मिक प्रेमसागरामध्यें मग्न होणार हें खास." अ० व्याख्यानमाला पृ० ८५.

हा वेदान्तदृष्टीनें विचार झाला. आतां भक्तिदृष्टीनें देवभक्तीचें व गुरुभक्तीचें ऐक्य होऊन भक्तियोगसमाधीनें ज्ञानाची व भक्तीची पूर्णता महाराज येणेंप्रमाणें वर्णन करितातः—

"पुढें पुढें पाषाणाचा ( पाषाणमूर्तीचा ) कठीणपणा काढून मानुषदेहरूपी सुकुमारपणा असा मध्यसंयोगांत प्रियकराविषयींचा असतो, त्यांतालहि अस्थि-मांसादिवत् कठीणपणा काढून केवळ प्रेममय आनंदेदंतारूप खरा सुकुमार शाकार प्राणप्रिय अभिन्न असूनहि प्रेमजन्य संप्रज्ञात समाधींत चुंबनालिंगना-पुरता भिन्न इव भासत असून प्रेमज निर्विकल्प समाधींत तर हास्यमुखांतून आनंदांत मिळून जावें लागतें, व प्रेमही कायमच राहतो. हा भक्तियोगसमाधि घेरंडाचार्यांनीं उत्तम प्रकारचा सांगितला असून ह्याची निर्विकल्पता श्रीमद्भागवत स्कंध ११ अध्या० १४ श्लो० ४६ यांत सांगितली आहे.

ध्यानेनेत्थं सुतीव्रेण युंजतो योगिनो मनः। संयास्यत्याशु निर्वाणं द्रव्यज्ञान-क्रियाभ्रमः ॥ १ ॥

ह्याच ठिकाणीं संयोग असूनही वियोगोपलालन असा खरा प्रेम उत्पन्न होत असून त्या वियोगोपलालनांतच भगवान् ब्रह्मकुमार ह्यांच्या "परमव्याकुलते" चें तत्त्व आहे. मधुसूदनाची प्रेमधारा ह्याच ठिकाणीं मिळत असून ज्ञानेश्वर महाराजांचा 'पांचवा पुरुषार्थ" व जेथें जाण्याकरितां ब्रह्माचे ठिकाणीं पहिलें

प्रस्थान ठेवितात असें श्रीतुकाराममहाराजांचें "गम्य" हीं हेंच आहे. हृदयकमलावरील योगियांचें सुकुमार ध्यान देखील ह्यापेक्षां कोटीपटीनें कठिनात्मक म्हणतां येईल. स्थूल दृष्टीनें पाहतां हे रूप मृदुसंवेगासारखें दिसते; पण खरोखर तें तसें नसून त्यांतील तमाचा तीव्रभाग नाहींसा होऊन सत्त्वतीव्रता झाल्यामुळें आणि सत्त्वाचा हलकेपणा, प्रकाशपणा व सुखपणा यांच्या योगानें, तें अत्यंत सुकुमार मात्र बनलें असतें. म्हणूनच स्थूलदृष्टीवर प्रत्यक्ष चमत्कार दाखविणें म्हणजे, सुकुमार सत्त्वाला तमाच्या योगानें घनरूपांत आणावें लागत असल्यामुळें केवळ पुरुष आपल्या प्रियकराला श्रम होतात असें समजून चमत्कार करीत नाहींत. या आनंदामध्यें उपर्युक्त संप्रज्ञात समाधींत सत्त्वानें रजस्तम नाहींसें झालेले असतात; व निर्विकल्प समाधींत सत्त्वहि नाहींसे होऊन इदंता इव आनंदेदंतारूप अनध्यस्तविवर्त्त अशा भगवंताचाच प्रत्यय असतो. व अलंकाराच्या ज्ञानानें जसा सुवर्णज्ञानाला प्रतिबंध होत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्मज्ञानहि अप्रतिबद्ध असतं; ह्यामुळें सर्व जगच त्याला प्रेममय वाटूं लागतें. हींच उत्तम भक्ति होय.

"सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः। भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः॥" श्रीमद्भागवत स्कंध ११,

श्रीगुरुभक्ति येथेंच आणून पोंचविते." अलौकिक व्याख्यानमाला पृ. ८८-८९.

हें प्रेमाचें शिखर यद्यपि आपणास ज्ञानानें समजलें, तथापि सुहृत्प्राप्तीच्या मार्गानें धार्मिक प्रेमाच्या पायरीपासून श्रीगुरूंच्या रक्षणशिक्षणादि क्रमानें वृत्ति चढविल्यावांचून एकाएकीं ह्या प्रेमसागरांत मग्न होण्याला कोणीच समर्थ नाहीं. एवढ्याकरितां सुहृत्प्राप्तीचें व महाराजांच्या रक्षणशिक्षणादि पद्धतीचें यथामति विवेचन येथपर्यंत झालें.

आतां, दिव्यसामर्थ्याविषयीं श्रीकृष्णार्जुनांचें उदाहरण जसें महाराजांनीं दिलें तसें सामर्थ्य स्वतः महाराजांनींहि मंडळी सुधारण्याकरितां दाखविलें आहे. व त्याचा उल्लेख पूर्वगामी प्रकरणांत

व चालू प्रकरणांत ओघानुसार आलेला आहे. व पुढेंहि अलौक-प्रकरणांत सोपपत्तिक यावयाचा आहे. श्रीकृष्णाप्रमाणें विश्वरूप दाखविण्याची प्रतिज्ञाहि महाराजांनीं वासुदेवराव मुळ्यांच्या पत्रांत केलेली आहे. तें पत्र द्वि० यष्टि उत्तरार्ध पृ० ३१ वर पहावें. तसेंच सप्तम यष्टि पृ० १६ वर विठ्ठलराव केकरे यांच्या पत्रांत महाराजांनीं श्रीकृष्णाचें केवळ भक्त्यैकगम्य अनघ्यस्त स्वरूप उघड करून त्याच्याशीं आपला अत्यंत अभेद "ममापि कृष्णपत्नी-त्वादधिकारस्तथास्ति हि" इ० शब्दांनीं वर्णन केला आहे. यावरून महाराजांचें दिव्य सामर्थ्य व त्यांचे दिव्य जन्मकर्म यांचा उत्तम बोध होतो. व त्यांच्या शब्दांत जशी सर्वज्ञता तशीच सर्वशक्तिमत्ताहि प्रगट दिसून त्यांस वेदाचें सामर्थ्य चढतें. त्यामुळें चमत्कारावांचून त्यांच्या शब्दावरच दृढ विश्वास ठेवणें व त्यांना सर्वस्व अर्पण करून व केवळ तद्वचनपरतंत्र होऊन त्यांची आज्ञा पाळणें हें आपलें उत्तम कर्तव्य ठरतें. ह्या कर्तव्याची जागृतीहि महाराजांनीं "तुम्ही मला खरोखरच प्रेमपाशांत बांधिलें तर मला एक पाऊलहि पुढें निघवणार नाहीं असें मी ज्ञानेश्वर साक्ष घेऊन सांगतों. परंतु माझ्या सर्वज्ञत्वाबद्दल जसा सर्वांचा निश्चय आहे तसा सर्वशक्ति-मत्त्वाबद्दल दिसत नाहीं. * * हे तात, आपण जितका जितका विश्वास मजवर ठेवाल तितक्या तितक्या आपणास या जन्मांत व पुढच्या जन्मांत अनंत प्रचीति येतील" इ० शब्दांनीं मंडळींत उत्पन्न करून दिलेली आहे. व नारायणराव पंडित, हरिभाऊ केवले, वासुदेवराव मुळे, श्रीनिवासशास्त्री हरिदासप्रभृति मंडळी बाह्य

चमत्कारावांचून नुसत्या महाराजांच्या शब्दांवरच त्यांस शेवटपर्यंत चिकटून राहिली आहे. व महाराजांचे चमत्कार पाहूनहि कित्ये-कांचा विश्वास शिथिल झाला, त्यांची महाराजांनीं योग्य कान-उघाडणी केल्याचाहि वृत्तांत मागें आला आहे. तथापि, सुहृत्प्राप्तीची सर्वच मंडळी कांहीं आपल्या मनोगताप्रमाणें तंतोतंत वागण्यास तयार नसतात हें तत्त्व महाराज जाणून होते. व याविषयीं त्यांच्या लहानशा आत्मचरित्रांत पुढील उल्लेख आहे:—"पूर्व जन्मींचा जो मीं संबंध सांगितला तो कांहीं खोटा सांगितला नाहीं. आणि जोपर्यंत पूर्वजन्माची स्मृति नाहीं, तोंपर्यंत तो खोटा वाटणेंहि साहजिक आहे. शिवाय पूर्वजन्मींचा स्नेही असला म्हणजे तो या जन्मांतहि आपल्या अनुरोधानें वागला पाहिजे असा कांहीं शास्त्रनियम नाहीं. * * * माझ्यांत थोडेसे दोष असले तरी मी मोठा भगवद्भक्त विद्वान् असा मंडळीला वाटूं लागल्यामुळें मला त्यांना सोडवेना व माझ्याप्रमाणें त्यांच्याच्यानें वागवेहिना अशी स्थिति होती. तथापि मला धर्मग्रंथ लिहिण्याची अपेक्षा असल्यामुळें मंडळीला दूर पाठविण्याचें माझें धैर्य झालें नाहीं."

**मंडळीचा स्वार्थत्याग**—तात्पर्य, अत्यंत वचनपरतंत्र होऊन आज्ञा पाळण्यांत जरी सर्वांची समानता नसली तथापि घरदार सोडून महाराजांच्या सहवासांत त्यांस लेखनवाचनादि कार्यांत सहाय करण्यांत, त्यांच्या उत्सवादि प्रसंगांत विभाग घेण्यांत, सत्संगार्थ त्यांस मंडळीसह घरीं बोलावून त्यांची वरदळ सोसण्यांत, त्यांचे ग्रंथ छापण्यांत, इ० विविध कार्यांत कांहीं मंडळीची जा

परस्पर सहानुभूति, अनुकूलता व स्वार्थत्याग दिसून आला, त्या-बद्दल त्यांचा महाराजांविषयीं पूर्वजन्मार्जित निष्काम प्रेमच दिसून येतो.

विशेषत: सौ० मनकरणिका आईचा निस्सीम पतिभक्ति व गुरु-प्रेम; सौ० रंगुबाई, यमुनाआई, दुर्गाआईप्रभृति मातृमंडळाचा वात्सल्य प्रेम; हरिभाऊ केवले, वासुदेवराव मुळे, श्रीनिवासशास्त्री, गणपत खंडो भालेराव, गोविंदराव राजुरकरप्रभृति मंडळीची सख्य-भक्ति; महाराजांच्या लेखकवाचकमंडळीस जेवूं घालण्याकरितां कर्ज करणारे, आपल्या वैद्यविज्ञानाचा त्यांस लाभ देऊन त्यांच्या प्रकृतीस जपणारे व जीवाची पर्वा न बाळगतां महाराजांची अहोरात्र सेवा करणारे नानाजी कविमंडन यांचा जबर स्वार्थत्याग; स्त्रीपुत्रादिकांचा मोह सोडून व महाराजांच्या सतत सहवासांत राहून त्यांस आपल्या मधुर गायनकलेनें रिझविणारे व्यंकटराव; विठ्ठलराव केकरे यांचा वर्णनीय एकनिष्ठपणा; महाराजांच्या प्रेमासाठीं, गोविंदशास्त्री पंच-भाईसारख्या महारोग्याची उत्तम शुश्रुषा करून, त्यांच्या लस वाह-णाऱ्या पायाच्या दुर्गंधयुक्त पट्ट्या धुवून व त्यांचीं वस्त्रेंपात्रें सोज्वळ करून पूजा सांगण्याकरितां त्यास कात्यायनीच्या वाळवंटांत पाठंगु-ळीस वाहून नेणाऱ्या गंगाधरपंत मुळ्यांचा सेवानुराग; गोविंद रामचंद्र भक्त व मारोतीभाऊ वाटखेडकर यांची सेवातत्परता; स्वत: जागा झाडून झुडून महाराजांना शौचकूप तयार करून देणारे इंदुकांत केकरे; घरच्या माणसांनीं महाराजांची केलेली निंदा ऐकतांच तत्काळ जेवणावरून उठून जाणारे गंपुनाना; महाराज कोठेंहि असले तरी

वेळांत वेळ काढून त्यांच्या परिचारकर्माचा लाभ घेणारे दिनुभाऊ गोखले; इ० इ० विविध प्रेमगोष्टी महाराजांच्या सुहृत्प्राप्ति कथानकांत संस्मरणीय आहेत. व ही मंडळींची निष्काम सेवा—हा त्यांचा निष्काम धर्म—ज्याचा त्याच्या दृष्टीनें स्वल्प असला तरी त्यांस आधिकारिक सिद्धिरूप मोठें फल देणारा आहे यांत संशय नाहीं.

हा जसा मंडळीचा निष्काम प्रेम महाराजांच्या ठिकाणीं आहे, तसाच महाराजांचाहि निरपेक्ष प्रेम किंवा "अहेतुक पक्षपात" मंडळीच्या ठिकाणीं आहे ही गोष्ट चालू प्रकरणांतील महाराजांच्या रक्षणशिक्षणादि वर्णनावरून दिसून आलीच आहे. तसेंच, चालू प्रकरणारंभीं भक्तिसुधेच्या संतर्पणाची विभागी म्हणून वासुदेवराव मुळेप्रभृति जी मंडळी सांगितली आहे, त्यांस महाराजांनीं प्रिय पुत्र म्हणून त्यांच्या उद्धाराविषयीं आपल्या ज्ञानराज माउलीची मोठ्या कळकळीनें करुणा भाकली आहे. तो अभंग असा:—

आळंदीपर्यंत घालीन लोळण । परी न घे मन मुक्तिकडे ॥ १ ॥
भोगावे वाटती विषाराच नर्क । परी तो हीनार्क मोक्ष नको॥२॥
तुझा नाहीं जेथें दास ज्ञानेश्वरा । ऐसा तूंहि बरा न वाटसी ॥३॥
काय बोलूं आतां पुरे ही सलगी । धरोनियां आंगीं पायीं ठेवा ॥४॥
माझ्या प्रिय-पुत्रां वैराग्याची सवे । नाहीं तुझे पाय सा.क्ष यासी ॥५॥
परी तुझें नांव देयावें तयांसी । म्हणोनि कष्टासी सोशियलें ॥६॥
संवत्सर केला जिवापाड श्रम । परी तुझा प्रेम दिला कांहीं ॥७॥
सकळांसहित येईन अलकावती । पाहीन मी मूर्ति तुमची डोळां ॥८॥

देहाचे परमाणु काढूनि वेगळे । पूजीन सगळे शिलावृक्ष ॥९॥
नियपुत्रांलागीं आणीन देऊळीं । मी तों द्वारपाळीं राहीन द्वारीं ॥१०॥
एवढीच आशा पूर्ण वा करावी । अन्य नच द्यावी सिद्धि मुक्ति ॥११॥
इ० इ० अभंगाची गाथा अ० १४५८

हा महाराजांचा स्नेहात्मक तंतु वरील मंडळीच्या जन्मांतरीय धार्मिक प्रेमानेंच विणला गेला आहे, हें यावरून निर्विवाद सिद्ध होतें, नाहींतर, महाराजांची ही दया मोहात्मक ठरेल, व दयेंत मोह नसावा या त्यांच्याच उपदेशाला विरोध येईल. तोहि अभंग येथें देतो:—साधूंचें लक्षण मुख्य भूतदया । आणिक विषया शिवूं नये ॥ १ ॥ परिदयेमाजी मोह न पडावा । नाहीं तरी गोवा संसाराचा ॥ २ ॥ जडभरत तो हरिणीगर्भा गेला । दयेनें घातला मोहजाळीं ॥ ३ ॥ आपुलें वैराग्य राखोनि सोज्वळ । व्हावें दयाशीळ दीनावरी ॥ ४ ॥ दीपाचें काजळ विझवीत ज्योति । तैसी सत्ववृत्ति जरी दया ॥ ५ ॥ तरी मोहरूपें होय तमोमय । उपजवि भय कोंवळिया ॥ ६ ॥ ज्ञानेश्वर तात वळलिया वीण । उगा वाटे शीण सत्ववृत्ति ॥ ७ ॥ गाथा अभंग १६८५

अस्तु. पूर्वोक्त नियपुत्रांपैकीं लेखक, वाचक, व सहायक मंडळीची कामगिरी व स्वार्थत्याग महाराजांनीं आपल्या संप्रदाय सुरतरूंत कबूल करून व संप्रदायमालिकेंत त्यांस नवपंचकाचा अधिकारप्रदान करून त्यांचा सन्मान केलेला आहे व अशा रीतीनें " परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यं " या संतस्वभावाला अनुसरून सद्गुरुवचनैकशरणत्वानें आधिकारिकत्व मिळविण्या

त्यांस उत्तेजन दिलें आहे. तीं संप्रदायसुरतरूंतील वचनें येणेंप्रमाणें आहेतः—अगाध माझी मती । येथ विवाद नाहीं निश्चिती । परि स्वकर्म चक्षुषसंपत्ति । प्रहरिली आहे ॥ म्हणूनी जिहीं सहाय केलें । ग्रंथ लिहिले वाचिले । शूद्रसामान्ये तिरस्कारिले । नाहीं मातें ॥ तयाचे स्मरण प्रसिद्धी । करावें पैं मज आधीं । विपर्यय करितां त्रिशुद्धि । कल्याणहानि पैं होय ॥ × × ×

श्लोकः—वाचकं लेखकं वंदे गुरुं नारायणं हरिं । दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥ १ ॥ गुरुमिति सर्वत्र संबध्यते । रुढिरेषां च नाम्नां वै कल्पिता मत्सुहृत्स्वपि । पूर्वा सम्यक देवर्षाढर्गुरुबुध्यात्र युज्यते ॥ २ ॥ संस्मरेद्वित्तदातृंश्च जन्मनाभादिकांस्तथा । नमस्कारेण मंत्रेण तेषां नामयुतेन च ॥ ३ ॥ नारदोऽपि यथा जैनो शैवे प्रोक्तस्तथापेहि । न जहाति निजं रूपं स्मृतिगामित्वमेव हि ॥४॥ तथा पापामोहयोगात् यदि कश्चिन्निजे पदे । विरक्तः स्यात्तर्हि तस्य स्मृतिं नैव त्यजेद्बुधः ॥ ५ ॥ यतःसम्यक्तया जातास्ते सर्वे त्ह्युपकारिणः । मम ज्ञानप्रदानाय लेखनैर्वाचनैरपि ॥ ६ ॥ इदं षट्कं सदा गेयं मत्कुमारैर्मयापि हि । एतं नियममुत्सृज्य ये पठंति कृतिं मम ॥ ते संप्रदायविद्वेषात् सत्यं भ्रश्यंति मार्गतः । ये पुनः षट्कमेतत्तु स्मृत्वा स्मृत्वा पठंति वै । ते त्वैहिकं सुखं भुक्त्वा पारमैश्वमान्पुयुः ॥ ८ ॥

ह्या सर्व गोष्टींवरून महाराजांचे ठिकाणीं असलेलें "पापान्निवारयति योजयति हिताय । गुह्यं च गूहति गुणान्प्रकटीकरोति । आपद्गतं न च जहाति ददाति काले । सन्मित्रलक्षणमिदं प्रवदंति सन्तः ॥" किंवा "अहेतुः पक्षपातो यस्तस्य नास्ति प्रतिक्रिया । सहि स्नेहात्मकस्तंतुरंतर्भूतानि सीव्यति ॥" हें सुहृलक्षण व मंडळीच्या ठिकाणीं असलेली जन्मांतरीय सुहृत्सिद्धि ह्या दोन्ही गोष्टी उत्तम रीतीनें सिद्ध होतात.

## बाबाजी महाराज.

आतां सरते शेवटीं, उत्तम धार्मिक प्रेमानें सर्वस्व त्यागापर्यंत मजल मारण्याची सद्वासना एकाच जन्मांत तीव्र केली असतां गुरुकृपेनें बुद्धियोग कसा प्राप्त होतो याचें एक उदाहरण देऊन हें प्रकरण आटपूं.

हें उदाहरण म्हणजे नारायणराव पैकाजी पंडित यांचें होय. यांची मूळ वस्ती चंद्रपूरची. ( चांदा ) यांचें इंग्रजी शिक्षण एफ. ए. पर्यंत झालेलें आहे. घरीं तीर्थरूप. दोघे बंधु वगैरे कुटुंबांतली मंडळी आहे. यांचे वडील बंधु आकोला येथें डे० क्लार्क आफ कोर्ट आहेत. त्यांची मातोश्री. नुकतीच दोन वर्षांपूर्वी संपली. महाराजांकडे आल्यापासून यांनीं मंडळीचीं धोतरें वगैरे धुण्याच्या अत्यंत कनिष्ट सेवेपासून मोठ्या आवडीनें सुरवात केला. लेखनवाचनादि कामांतहि यांनीं लवकरच हरिभाऊस मागें टाकलें. मंडळींत कोणी आजारी पडल्यास त्याची उत्तम शुश्रुषा व औषध पथ्यपाणी वगैरेची व्यवस्था ठेवण्याच्याहि कामांत त्यांची साहजिक प्रवृत्ति व न कंटाळण्याचा सद्गुण दिसून आला. व महाराजांची सेवा करण्यांत तर अहोरात्र निद्रा व क्षुधातृषादि देहधर्महि जिंकून अश्रांत श्रम करण्याची यांची आवडो दिसून आली व धर्म, प्रेम व आज्ञापालन या तिन्ही गुणांचा मेळ करून हे सद्गुरुसेवा आवडीनें करूं लागले. यांचें लग्न झालेलें होतें म्हणून आपल्या धर्मपत्नीसहि यांनीं सत्संगतीचा लाभ करून देऊन तिला परमार्थाचे वळण दिलें. पुढें

अर्थातच महाराजांच्या सेवेप्रीत्यर्थ यांनीं सरकारी नोकरीवर व त्याबरोबरच ऐहिक धनमानाच्या उत्कर्षावर पाणी सोडलें. तीर्थरूपांचा रोष व सोयऱ्याधायऱ्यांचे व इष्टमित्रांचे वाग्बाण सहन केले. व महाराजांची एकनिष्ठ सेवा करूं लागले. इतका जीवभाव सेवेला विकल्यावर महाराजांसारखी कनवाळु माउली त्यांस वश झाली यांत काय नवल ? " मी पंडितला वश झालों आहे " असें महाराज एकवेळ मिलिंदाजवळ बोलले होते. शिष्य अनन्यगतिक झाल्यावर गुरुहि त्याला सर्वस्वदान देत असतात हा नियमच आहे. " तुका म्हणे ठाव पाइका निराळा । नाहीं स्वामीस्थळा गेल्यावीण ॥ " " प्रभुत्व तरि हेंच कीं करुनि दे कृपादान तें। स्वसाम्य यदुपार्जनें मिरविजे स्वपादानतें ॥ " इ० संतवचनें याविषयीं प्रसिद्धच आहेत. नानाप्रकारानें महाराजांनीं यांची कसोटी पाहिली व आपल्या उत्कृष्ट शिक्षणक्रमांत शास्त्रांचीं गुह्यतत्वें याच्या बुद्धिस्थ करून दिलीं. त्यामुळें यांची बुद्धि वेदोज्वल होऊन पूर्वीं आडनांवाचे जे पंडित होते ते आतां खरो-खरच पंडित झाले. व " अंतरीं वेधिला ब्रह्मबोधें । बाहेरी चाले जनाचे छंदें । मुख न विटाळे नीच शब्दें । तोचि पंडित जाणिजे ॥ " × × " विदुर म्हणे जो आस्तिक गुरुवेदोक्तीं जयास विश्वास । मीपण ज्यास न शिवलें तो पंडित मान्य होय विश्वास ॥ " " गलिताहंकृति जाणे बंधामोक्षासि अनुभवीं चढला । तो पंडित इतर नव्हे जरि पुष्कळ शास्त्र सर्वही पढला ॥ " इ० यथार्थ पंडित लक्षणांस पात्र झाले. परंतु, महाराजांच्या—सद्गुरू-

च्या—दृष्टीनें त्यांची योग्यता याहूनहि अधिक आहे. महाराज साधुबोधांत म्हणतातः—

" अन्नाचेंच दूध होतें, पण तें आईचे स्तनमध्यें जामीन असल्यावांचून होत नाहीं; त्याप्रमाणें सारसान्निवेश करतां येतो, पण तो उपदेशावांचून करतां येत नाहीं, कारण सर्वांची बुद्धि विकारी आहे; म्हणून जेवढा गुरूनें सारसन्निवेश आपल्या हातीं दिला असेल तेवढ्याचाच समन्वय आपल्याला करतां आला म्हणजे कृतकृत्यता झाली. क्षीर करणारी जी असेल तिच्यावर कढी करण्याची जबाबदारी कोणीहि देत नाहीं. तिनें आपली क्षीर अर्धीकच्ची ठेवूं नये म्हणजे झालें. त्याप्रमाणें ज्या वृत्तींत ज्ञेयध्येयविचारास्तव जितका सारसन्निवेश गुरूनें हातीं दिला असेल तितक्याचा समन्वय करतां आला कीं तो महापंडित झाला; नाहींतर ब्राह्मण सर्वाध्यापक म्हणून चांभाराला जोडे शिवणें देखील त्यानां शिकवावें लागेल. " साधुबोध पृ० १७४

हा सारसन्निवेश महाराजांनीं पंडितजींच्या हातीं दिला आहे, म्हणून त्यांना वरील लक्षणाप्रमाणें महापंडित म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

पंडितजीला मिळालेला हा सारसान्निवेश किंवा समन्वयशक्ति किती अप्रतीम आहे हें त्यांनीं कोल्हापूर येथील वेदशा० संपन्न हुपरीकर शास्त्री यांच्या " श्रीशंकराचार्य, विद्यारण्य व श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्या मताचें तात्पर्य " या निबंधावर जे समीक्षा-

लेख मुमुक्षुपत्रांत प्रसिद्ध केले आहेत त्यांवरून सहज कल्पना येईल. हा विषय प्रथम महाराजांनींच हातीं घेतला होता. व त्याचा उल्लेख उमरावती प्रकरणांत शके १८३६ संवत्सरवर्णनांत आलेला आहे. हुपरीकर शास्त्र्यांनीं आपल्या निबंधांत "ज्ञानेश्वर महाराज मायेचा अंगिकार करीत नाहींत म्हणून विद्यारण्य व शंकराचार्य यांच्या मताहून ज्ञानेश्वर महाराजांचें वेदान्तमत स्वतंत्र आहे." असें विधान केलें आहे. त्यावर महाराजांनीं ता० १५ आक्टोबर १९१४ च्या मुमुक्षूंत लेख लिहून "शंकराचार्यमतांत व तातमतांत भेद नाहीं असें विवरणादि पुराव्यानिशीं सिद्ध करण्यास मी तयार आहे" असें प्रसिद्ध केलें होतें. त्यानंतर हुपरीकरांनीं पुन्हां महाराजांस एक पत्र लिहून वर्तमानपत्रांतून हा वाद चालविण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु ते वेळीं महाराजांची प्रकृति फारच गळाली होती व तेथून लवकरच पुणें मुक्कामीं त्यांची दृश्य मूर्ति अंतर्धान पावली. यामुळें तो प्रश्न तसाच राहिला. पुढें पंडितांनीं उत्तम गुरुपुत्राचें कर्तव्य म्हणून तो प्रश्न हातीं घेतला. व ता० १ सप्टेंबर १९१७ च्या मुमुक्षूंत महाराजांची बाजू पुराव्यानिशीं मांडून हुपरीकर शास्त्री यांस उत्तराविषयीं विनंती केली. त्याचें उत्तर ता० १ नोव्हेंबरच्या अंकांत येऊन त्यावर ता० २१ जानेवारी १९१८, १ फेब्रुवारी, २१ फेब्रुवारी व ११ मार्च १९१८. या अंकांत पंडित यांनीं लेख लिहून आपलें म्हणणें सप्रमाण सिद्ध केलें. परंतु मध्यंतरीं हुपरीकरांनीं कोल्हापूर येथील ज्ञानसागर पत्राच्या ता०

२५ फेब्रु० १९१८ च्या अंकांत आपले कांहीं आक्षेप प्रसिद्ध केले व पुढील विधानें केलीं " नारायण पंडितांनीं आमच्या मागील शंकांचें निरसन न करितां नवीन लेख लिहिला आहे. × × ज्यांना अमृतानुभव वाचूनहि समाधान वाटत नाहीं त्यांचें समाधान दुसऱ्याकडून कसें होणार ? " इ० इ० यावर पंडितजींनीं पुन्हां तारीख २१ मार्च १९१८ च्या मुमुक्षूंत उत्तर लिहिलें. तें येणेप्रमाणें:—" अमृतानुभव वाचून मर्म समजणें मजसारख्या पामरास दुर्बोध असल्यास त्यांत नवल तें कसलें ? पण अमृतानुभव झाल्यापासून तुकाराम, एकनाथादि संतशिरोमणींनीं त्याचीं कितितरी पारायणें केलींत; पण त्यांतील वेदान्त भगवान् शंकराचार्यांच्या वेदान्ताहून किंवा श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं केलेल्या ज्ञानेश्वरींतील वेदान्ताहून भिन्न आहे असें मात्र कोणी सांगून किंवा प्रतिपादून ठेवलें नाहीं. योगवासिष्ठांतहि ज्ञानाच्या सात भूमिका सांगून ज्या सत्त्वापत्ति नांवाच्या भूमिकेवर ज्ञान होतें तेथून शेवटील चवथ्या भूमिकेपर्यंत आत्मानुभव सारखाच राहतो. दृष्ट सौख्य मात्र भिन्न असतें असें सांगितलें आहे. ब्रह्मसूत्रांतहि मुक्तींत सातिशयत्व रहात नाहीं असेंच सांगितलें आहे. याप्रमाणें मागें झालेल्या सर्व संतांचें व ग्रंथांचें ऐकमत्य असून अमृतानुभव वाचून वे० शा० संपन्न हुपरीकर शास्त्री महाराजांचा सर्व सन्तविरोधी अनुभव कसा ? याचेंच नवल वाटतें. विवाद सुरु ठेवल्यास कांहीं फलनिष्पत्ति होणार नाहीं असें शास्त्रीबोवा म्हणतात. आग्रह धरून बसल्यास फलनिष्पत्ति होणार नाहीं हें खरें आहे

तरी पण कोणाचें प्रतिपादन वेदान्तास व युक्तीस धरून आहे हें भगवान् आचार्यांचे ग्रंथ, श्रीज्ञानेश्वर महाराजांचे ग्रंथ व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असलेला आमचा वाद जे वाचक वाचून पाहतील त्यांना कळून येईल. आतां शास्त्रीबोवांच्या आक्षेपांकडे वळूं." असें म्हणून शास्त्रीमहाराजांच्या सर्व आक्षेपांस त्यांनीं योग्य उत्तरें दिलीं. यावर पुन्हां शास्त्रीमहाराजांकडून उत्तर प्रसिद्ध झालें नाहीं. अस्तु.

या सारसन्निवेशाच्या देणगीबरोबरच त्याचा मूळ बीजकोश जें मधुराद्वैत त्याचाहि विकास यथार्थतच पंडितजीच्या अंतःकरणांत झाला. हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. त्यामुळें महाराजांचीं मधुराद्वैतविषयक मतें बरोबर समजण्यांत व समजावून देण्यांत जसा त्यांचा उत्तम बुद्धियोग दिसून येतो, तसेच महाराजांचे प्रतिवार्षिक कात्यायन्यादि उत्सव व एकादशी, शिवरात्रि, सोमवारादि व्रतें पुत्रधर्मानें पाळून त्यांचा उपासनामार्ग चालविण्यांतहि संपूर्ण योगज्ञानाची विश्रामभूमिका जी सद्गुरुभक्ति ती त्यांच्या ठिकाणीं दिसून येते. व त्या उत्सवादि प्रसंगीं नानाचिन्मय पुष्पांचे पूजासंभार निर्माण करून श्रीगुरुमूर्तीला समर्पण करण्यांत त्यांची प्रवीणता दिसून येते. याप्रमाणें "मी तुम्हांला श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ या दोन्ही पक्षानें सारखें नेणार" ही आपली प्रतिज्ञा महाराजांनीं पंडितांच्या बाबतींत एकाच जन्मांत पूर्ण करून दाखविली यांत संशय नाहीं.

संप्रदायदृष्टीनें कुलीन पुत्राला साजणारी ही पंडितजीची करणी

पाहून तुकाराममहाराजांच्या पुढील अभंगांचें स्मरण होतें. ते अभंग हे:—देवा ऐसा शिष्य देई। ब्रह्मज्ञानीं निपुण पाही ॥१॥ जो का भावाचा आगळा । भक्तिप्रेमाचा पुतळा ॥ २ ॥ ऐसी युक्ति ज्याला जाणे । तेथें वैराग्यचें ठाणें ॥३॥ ऐसा झाला हो शरीरीं । तुका निंबलोण करी ॥४॥ कृपा करावी भगवंतें । ऐसा शिष्य द्यावा मातें ॥१॥ माझें व्रत जो चालवी । त्यासि द्यावें त्वां पालवी ॥२॥ व्हावा ब्रह्मज्ञानी गुंडा । तिहीं लोकीं ज्याचा झेंडा ॥ तुका तुका हांका मारी । माझ्या विठोबाच्या द्वारीं ॥ ४ ॥

पंडितजीच्या अंतरांत असलेल्या सद्गुरुभक्तीचा सौरभ बाहेर व्यक्त करण्यासाठीं त्यांच्या बुद्धींत कवित्वस्फूर्तीचाहि नवीन उदय झालेला आहे. व महाराजांच्या सूक्तिरत्नावलि ग्रंथांचें निरूपण करतांना जशीं मधुराद्वैताचीं उत्तम तत्वें व वेदान्तसिद्धांत त्यांच्या सांगण्यांत येतात तशींच तीं त्यांच्या कवितेंतहि प्रक्रियारूपानें सुंदर उमटतात.

शिवाय, महाराजांवर त्यांनीं केलेल्या आरत्या, स्तोत्रें हीं फार करुणाजनक असून त्यांनीं केलेल्या अभंगांतहि करुणा, महाराजांची रक्षणशिक्षणादि पद्धति, व वृत्तिविद्या, गुरुबंधूविषयीं सहोदर प्रेम व उच्च भावना इ० प्रेमळ वृत्तींचा समुच्चय दिसून येतो. पंडितांचे हे अभंग म्हणजे महाराजांच्या सुहृतशिक्षणाचें व वृत्तिविद्येचें यथा-योग्य मार्मिक शब्दचित्र असून तें त्यांनीं स्वानुभवाच्या कथांनीं सुभूषित केलें असल्यामुळें या सुहृत्प्राप्ति प्रकरणाला शिरोभूषण झालें आहे. म्हणून त्यांतल्या बऱ्याच अभंगांचा संग्रह शेवटीं जोडलेल्या

दुसऱ्या पुरवणींत केला आहे तो पहावा.

हा सारा बुद्धियोग किंवा ही दिव्य योगदृष्टि जी पंडितजीला मिळाली ती त्यांच्या सेवेचें गोड फळ असून महाराजांनीं ती त्यांस अर्जुनाच्या दिव्यदृष्टिप्रमाणेंच स्वसामर्थ्यानें देऊन आपलें योगैश्वर्य प्रगट दाखविलें यांत संशय नाहीं. तो अलौकिक प्रकार असा आहे.

पुण्यास महाराजांची दृश्यमूर्ति अंतर्धान झाल्यानंतर पंडितजी त्यांच्या अस्थि घेऊन प्रयागला गेले व त्रिवेणींत अस्थि विसर्जन केल्या. तेच दिवशीं रात्रौ श्रीमहाराजांनीं स्वप्नांत पंडितजीला दर्शन दिलें व एक पुटी ( पुडी ) प्रसाद देऊन बोलले कीं तूं या पुडींतलें भस्म नित्य सेवन करीत जा; म्हणजे तुला माझे ग्रंथ समजतील. सकाळीं पंडित जागे होऊन पाहतात तों त्यास ती पुडी बिछान्यावरच दिसली. व श्रींच्या आज्ञेप्रमाणें त्यांतलें भस्म त्यांनीं नित्य थोडथोडें ग्रहण केलें. त्याचा परिणाम महाराजांच्या सांगण्याप्रमाणेंच झाला हें सांगणें नको.

ह्या अलौकिक प्रकारावरून महाराजांचें सर्वशक्तिमत्व प्रत्यक्ष दिसून येतें, सानन्य दीन होऊन सद्गुरूची सेवा केली असतां नियमादृष्ट कसें फळतें तें स्पष्ट होतें, श्रीगुरु आत्मविद्येच्या रूपानें शिष्याच्या हृदयांत कसे प्रगट होतात तें उत्तम समजतें. "तुम्ही मला खरोखरच प्रेमपाशांत बांधिलें तर मला एक पाऊलहि पुढें निघवणार नाहीं" असें मी ज्ञानेश्वर साक्ष घेऊन सांगतों." ह्या महाराजांच्या प्रतिज्ञेचा अनुभव येतो, " आघवियाचि दैवां। जन्म-

भूमि हे सेवा" । हें ज्ञानेश्वरमहाराजांचें तत्व हृदयांत "ठसतें, अवो सद्गुरुचिये कृपादृष्टि । तुझें कारुण्य जयातें अधिष्ठी । तो सकळ विद्यांचिये पिटीं । धात्रा होय" ॥ हा गुरुकृपेचा प्रभाव यथार्थ प्रगटतो, सत्सेवेनें व गुरुकृपेनें शाळेंत न जातां बुद्धीला जन्मोजन्मीं शिक्षण मिळत जातें हा नियम अबाधित ठरतो, श्रीगुरुकृपाबलानें शंकराचार्यांचे शिष्य आनंदगिरी प्रसिद्ध तोटकाचार्य झाले व तुकाराममहाराजांच्या शिष्या मातोश्री बहेणाबाई ह्या श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ झाल्या—ह्या जुन्या उदाहरणांत एका नव्या उदाहरणाची भर पडते, व सत्सेवेवरी "संताचे संगतीं मनोमार्ग गती । आकळावा श्रीपती येणें पंथें" ॥ ह्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या अलोक सिद्धांताचें रहस्य समजण्यास मार्ग सांपडतो.

आपल्या अलोक सामर्थ्याचा असा प्रभाव दाखवावयाचा होता म्हणूनच कीं काय कोण जाणे "पंडितची बुद्धि उत्तम आहे, पण माझ्या कामांत गुंतल्यामुळें ती दडपून गेली आहे" असें एक वेळ महाराज बोलले होते.

महाराजांचे ग्रंथ निरूपण करते वेळीं, कविताप्रबंध काळीं, व सामान्य शास्त्रचर्चा करितांना पंडितजींच्या वाणींतून ज्या निजभावाच्या संप्रदायखुणा प्रगट होत असतात, तीं त्यांच्या सांप्रदायिक बंधुवर्गास महाराजांच्याच कृपेचीं रसाळ फळें वाटतात, त्यामुळें ते त्यांस गुरुस्थानीं पूज्य मानून त्यांचा मान राखतात, "बाबाजी महाराज" म्हणून त्यांस संबोधन करतात, संप्रदायधर्माच्या विषयांत त्यांचा विचार घेतात, व सहोदर प्रेमानें त्यांचें

भूषण मानून व महाराजांच्या ग्रंथांचें अन्योन्य प्रबोधन करून सद्गुरुप्रेम वाढवीत असतात. अस्तु.

याप्रमाणें हें सुहृत्प्राप्ति प्रकरण येथें संपलें. या प्रकरणापासून महाराजांच्या चरित्राच्या उत्तरखंडास आरंभ झालेला आहे. हा उत्तर प्रदेश अधिक विचारप्रधान असल्यामुळें त्याचा लेखनमार्ग अल्पबुद्धि मिलिंदाला अवघड वाटत आहे. तथापि, महाराजांच्या कृपेनें, बाबाजीमहाराजांचें पाठबळ असल्यामुळें तो मार्ग निश्चित-पणानें आक्रमण करण्यास त्यास हुरूप वाटत आहे.

आतां, या पुढील अलोक प्रकरणांत, सुहृत्प्राप्ति ही सत्वगुणाच्या आंतर ऐश्वर्यांतील सिद्धि कशी आहे, अलोकवादाचा व तिचा काय संबंध आहे, सुहृत्प्राप्तींत मनोमार्ग गतीनें भगवत्प्राप्ति सहज कशी होते, व महाराजांच्या शिक्षणक्रमांत त्यांच्या अलौकिक शक्तीचा लाभ मंडळीला कसा मिळत गेला, इत्यादि अलोक सिद्धांतांचें सोपपत्तिक विवेचन यथामति करूं.

सांप्रत, श्रीमहाराजांच्या अतुल कृपाबलानें संपूर्ण झालेलें हें सुहृत्प्राप्तिनामक पांचवें प्रकरण त्यांच्या चरणारविंदीं समर्पण असो.

**हरिः ॐ तत्सद् सर्वत्र यशस्वी श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराज की जय.**

सुहृत्प्राप्ति प्रकरण समाप्त.